Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १४/ २०१४** **दिनांक ११.०९.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०२.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक ११.०९.२०१४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २८३२/ २०१४, दिनांक १० सप्टेंबर, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.११.०९.२०१४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २८.०८.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.७४४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

---

**विषय नं.०२** **जमाखर्च तक्ता माहे मे, जुन- २०१४.**

माहे, मे, जुन- २०१४ मधील अनुक्रमे जमा रु.६५,३०,०२,२९३/- व रु.१,२१,२१,८०,४९६/- आणि खर्च रु.१५,०९,४८,४४५/- व रु.२९,८६,७९,१५५/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.७४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त जमाखर्च तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०३** **संस्थान कर्मचाऱ्यांच्या गणवेश शिलाईकामी प्राप्त ई-निविदातील मुळ निविदा (Financial Bid) उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.१८,००,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०२.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक १८३ अन्वये संस्थान कर्मचा-यांना गणवेश देणेसाठी प्रथमतः ड्रेस डिझाईनरच्या सल्ल्याने कापडाची कंपनी, रंग व कोड नंबर यांची निवड करुन कापड उत्पादक कंपनीकडून/ अधिकृत विक्रेत्याकडून विहित पद्धतीने कापड खरेदी करणेत यावे व तद्नंतर फक्त गणवेश शिलाईसाठी कोटेशन मागविणेत येऊन, कर्मचा-यांची मापे घेऊन, गणवेश तयार करणेत यावे, असे ठरले. तसेच उपरोक्तकामी येणा-या रु.२१,३२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार कापड व साडया खरेदीकामी प्रक्रिया राबवून कापड खरेदी करण्यात आले आहे. दिनांक ०८.०१.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४ नुसार संस्थान कर्मचा-यांना गणवेश शिलाईसाठी कापड/ साडया खरेदीकामी, तसेच गणवेश शिलाईकामी वाढीव येणा-या रक्कम रु.२४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी" असे ठरले. त्यानुसार सदरचा प्रस्ताव वशी-०५ विभागाकडे मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी पाठविण्यात आला. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक १८३

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नुसार दुस-या टप्प्यात गणवेश शिलाईकामी दिनांक १०.०१.२०१४ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली असून दिनांक १०.०१.२०१४ ते दिनांक २०.०१.२०१४ दरम्यान निविदा विक्री करण्यात आलेली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक २३.०१.२०१४ अशी ठेवण्यात आलेली होती. मुदतीअंती गणवेश शिलाईकामी ०५ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. मात्र मा.उच्च न्यायालयाची मान्यता नसल्याने सदरच्या निविदा उघडण्याची प्रक्रिया स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

दिनांक ०२.०५.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडून गणवेश कापड खरेदी व शिलाईस व त्याकामी येणारे रक्कम रु.४५,३२,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती, त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे नमुद केलेले होते.

We expect the Committee to widely publish advertisement for the purposes of purchasing uniforms, duly stitched and ensure that quality is maintained.

Notices for inviting such tenders in respect of the issues in both the applications (Nos.3684/2014 and 3685/2014) shall be published in daily Marathi Newspapers, Particularly Maharashtra Times, Loksatta, Lokmat and other news papers having wide circulation. Additionally, the tenders shall be published in Times of India, Indian Express (Mumbai editions).

मात्र मा.उच्च न्यायालयाने आदेशात नमुद केलेल्या वर्तमानपत्रात जाहिरात देणेकामी अंदाजे रु.४,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित असलेबाबत जनसंपर्क कार्यालयाने कळविले होते. त्यामुळे मा.उच्च न्यायालयात फेर याचिका सादर करण्यात आलेली होती.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दिनांक ११.०७.२०१४ रोजीचे आदेशामध्ये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आदेशामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

Considering the aforesaid aspect, the order dated 2nd May, 2014 in Civil Application No.3685 of 2014, to the extent of inviting tenders for stitching of uniforms is modified and the Applicant is allowed to invite tenders by publication in widely circulated Regional Newspapers having circulation at Ahmednagar and Nashik.

खरेदी विभागाकडील दिनांक ०६.०५.२०१४ रोजीचे टिपणीन्वये गणवेश शिलाईकामी फेर निविदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे. गणवेश शिलाईकामी प्रति नग अंदाजे रु.५००/- प्रमाणे अंदाजे रु.१८,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे, त्यामुळे सदर शिलाईकामी ई-निविदा प्रसिद्ध करणे क्रम प्राप्त आहे.

त्यानुसार गणवेश शिलाईकामी ई-निविदेचा व वर्तमानपत्रातील जाहिरातीचा मसुदा सामान्य प्रशासन विभाग वशी-०५ यांचेकडून मान्य करुन जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच ई-निविदा प्रक्रियेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत (आय.टी.विभाग) कार्यवाही करण्यात आलेली आहे. ई-निविदा प्रक्रियेबाबतची अंतिम मुदत दि.३०.०८.२०१४ अशी ठेवण्यात आलेली होती. मुदतीअंती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ०५ निविदाधारकांच्या निविदा Upload झालेल्या आहेत. दिनांक ०१.०९.२०१४ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त निविदांतील तांत्रिक लिफाफे उघडण्यात आलेले आहेत. त्याचा तपशिल सोबतच्या तक्त्यामध्ये जोडलेला आहे.

तरी संस्थान कर्मचा-यांना गणवेश शिलाईकामी सोबतच्या तांत्रीक लिफाफयाचे तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे पात्र पाच निविदाधारकांच्या प्राप्त मुळ ई-निविदा (Financial Bid) माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तज्ञ व्यक्तीमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून न्युनतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेस निर्णयार्थ सादर.

संस्थान कर्मचाऱ्यांच्या गणवेश शिलाईकामी प्राप्त ई-निविदांमधील मुळ निविदा (Financial Bid) आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| Sr. no. | Description of Work / Item (S) | No.of Qty. | Stitch Well Mens Wear | M/s Asha | Suvarna Hi-Tech Garments | R. K. Collection | Nitin Garments |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Half Safari (for Administrative Officer) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Shirt-2 Pocket, Back side Center Cut, Right side straight Design. Suit Cutting. Employee : 6 | 12 | 575.00 | 685.00 | 751.00 | 475.00 | 415.00 |
| 2 | Half Safari (for Superitendent, HOD, Accounts Officer, Engineers Power House and Construction Dept., I.T.Supervisor, Sr.Accountant, Agri.Officer, P.R.O., Supervisor Mumbai Office etc.) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Shirt-2 Pocket, Back side Center Cut, Right side straight Design. Suit Cutting. Employee : 60 | 120 Nos. | 575.00 | 685.00 | 751.00 | 475.00 | 415.00 |
| 3 | Half Safari (for Asst.Labour Officer, Supervisor, Sr.Clerk, Clerk-Typist, Coupon Seller) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket Shirt-1 Pocket, Back side Center Cut, Right side straight Design. Suit Cutting. Employee : 230 | 460 Nos. | 575.00 | 685.00 | 751.00 | 475.00 | 415.00 |
| 4 | Half Safari (for Welder, Fiter, Refrigeration, Filter Operator, Plumber, Telephone Operator, Pumpman, CCTV Operator, Motor Mechanical, Technical Asst. etc.) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Shirt-1 Pocket, Back side Center Cut, Right side straight Design. Suit Cutting. Employee : 115 | 230 Nos. | 350.00 | 385.00 | 451.00 | 325.00 | 365.00 |
| 5 | Full Safari (for Driver) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Full Shirt-1 Pocket, Suit Cutting. Employee : 34 | 68 Nos. | 350.00 | 405.00 | 451.00 | 350.00 | 365.00 |
| 6 | Half Safari (for Peon, Attendant, Xerox Operator etc.) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Shirt-1 Pocket, Suit Cutting. Employee : 1016 | 2032 Nos. | 350.00 | 385.00 | 451.00 | 325.00 | 365.00 |
| 7 | Half Safari (for Wardboy) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Shirt-1 Pocket, Suit Cutting. Employee : 31 | 62 Nos. | 350.00 | 385.00 | 451.00 | 325.00 | 365.00 |
| 8 | Half Safari (for Security Employees) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Broad Belt Loops,Shirt-2 Pocket, Shoulder Belt, Suit Cutting Employee : 160 | 320 Nos. | 400.00 | 425.00 | 501.00 | 375.00 | 415.00 |
| 9 | Half Safari (for Sanitation Employees) Desc. : Pant-2 Side Pocket, 1 Back Pocket & 1 Inner Pocket, Shirt-1 Pocket, Suit Cutting. Employee : 163 | 326 Nos. | 350.00 | 385.00 | 451.00 | 325.00 | 365.00 |

**निर्णय क्र.७४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारकांना, दरांमध्ये आणखी सुट मिळणेकरिता मा.कार्यकारी अधिकारी/ मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर बोलविणेत यावे व त्यांचेकडून अंतीम निम्नतम दर घेण्यात येऊन, त्या दरानुसार त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०४ मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.३०,००,०००/-)**

**प्रस्ताव-** **अधिनियम-२००४ मधील तरतुदः-** १७ (२) (झ).

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.-** दि.१७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६८२.

**प्रस्ताविकः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०९/२०१३ चे सभेतील निर्णय क्रं.६८२ अन्वये, श्री साईनाथ रक्तपेढीकरीता नवीन ब्लड डोनेशन व्हॅन बनविणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून टाटा-LP912/49 या मॉडेलच्या बस चेसी खरेदी करणेस तसेच सदर वाहनावर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



बॉडीबांधणीचे कामाकरीता बॉडीबिल्डर्स यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.३०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सदर प्रस्ताव खर्चास मान्यता मिळणे कामी विधी विभागाने ॲड. संजय चौकीदार यांचेमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडून मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मान्यतेनुसार, नवीन ब्लड डोनेशन व्हॅन बनविणे कामी टाटा-LP912/49 या मॉडेलची बस चेसी करीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून जा.नं.एसएसएस/ वाहन/ १८६८/ २०१४ दि.१७/०७/२०१४ ने तसेच बॉडीबांधणी करीता बॉडीबिल्डर यांचेकडून जा.नं.एसएसएस/ वाहन/१८६७/२०१४ दि.१७/०७/२०१४ ने कोटेशन बोलाविण्यात आली होती.वाहन चेसी कोटेशन पाठविणे करीता दि.२४/०७/२०१४ व बॉडी बांधणी कोटेशन पाठविणे करीता दि.१०/०८/२०१४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे.

**अ) टाटा- LP912/49 चेसी करीता प्राप्त कोटेशन्स** :-

| अ.नं. | पार्टीचे नांव | आवक नंबर / दिनांक | |
|---|---|---|---|
| ०१ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ६२१४-१३/०७/२०१४ | बंद कोटेशन |
| ०२ | मे. शुभयान मोटर्स प्रा. लि. अहमदनगर | ६५१९-१८/०७/२०१४ | बंद कोटेशन |
| ०३ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ७८४८-०७/०८/२०१४ | ई-मेल कोटेशन |

**ब) बॉडी बांधणी करीता प्राप्त कोटेशन**

| अ.नं. | पार्टीचे नांव | आवक नंबर/ दिनांक | |
|---|---|---|---|
| ०१ | सिगमा ॲटो क्राफ्ट प्रा. लि., ठाणे | ६८५०-२३/०७/२०१४ | बंद कोटेशन |
| ०२ | चिंतामणी मोटर्स, सांगली | ७३३३-३१/०७/२०१४ | खुले कोटेशऩ |
| ०३ | अल्फा ॲटो, सातारा | ८२६३-१३/०८/२०१४ | बंद कोटेशन |

**मागणी-** तरी वरील प्रमाणे प्राप्त कोटेशन उघडुन नवीन मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन खरेदी बाबत निर्णय होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन तयार करणेसाठी टाटा- LP-९१२/ ४९ चेसी खरेदीकामी ०३ व बॉडी बांधणी करीता ०३ प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभसमोर उघडणेत येऊन, त्यांच्या मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

(अ) टाटा- LP-९१२/ ४९ चेसी खरेदी करीताचा तुलनात्मक तक्ता-

| अ. नं. | पार्टीचे नाव | निविदेमधील मुळ दर टॅक्ससह रु. |
|---|---|---|
| १ | मे.स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ९,५७,६२५/- |
| २ | मे.शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | **९,४७,६४९/-** |
| ३ | मे.स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ९,७१,२५६/- |

(ब) बॉडी बांधणी करीताचा तुलनात्मक तक्ता-

| अ. नं. | पार्टीचे नाव | निविदेमधील मुळ दर टॅक्ससह रु. |
|---|---|---|
| १ | सिगमा ॲटो क्राफ्ट प्रा.लि., ठाणे | २८,३७,१५३/- |
| २ | चिंतामणी मोटर्स, सांगली | २४,९४,४७५/- |
| ३ | अल्फा ॲटो, सातारा | **१८,५०,०००/-** |

**निर्णय क्र.७४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ व ब तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारकांना, दरांमध्ये आणखी सुट मिळणेकरिता मा.कार्यकारी अधिकारी/ मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर बोलविणेत यावे व त्यांचेकडून अंतीम निम्नतम दर घेण्यात येऊन, त्या दरानुसार त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदी करणेकामी प्राप्त ई-कमर्शियल निविदा उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.१८,०३,४७९/-)**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समिति सभा दि.१८/१०/२०१३ रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांकरीता गणवेष खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.१८,०३,४७९/-चे खर्चास, व

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांकरीता खरेदीकामी आपला वार्ताहर-मुंबई, पुढारी-पुणे, पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि.१७/०३/२०१४ ते २९/०३/२०१४ पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होते तर दि.०१/०४/२०१४ अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांकरीता गणवेष खरेदीकामी एकुण ०३ सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०३ |
| २ | मुंबई कार्यालय | -- |
| | एकुण निविदा | ०३ |

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| १ | मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर | (२ बंद निविदा प्राप्त दि.०१/०४/२०१४) |
| २ | मे.तुलसी एम्पोरीयम | (२ बंद निविदा प्राप्त दि.०१/०४/२०१४) |
| ३ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | (२ बंद निविदा प्राप्त दि.०१/०४/२०१४) |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश, तांत्रिक,कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** सदरच्या तांत्रिक बंद निविदा दि.०४/०४/२०१४ रोजी वैदयकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात येऊन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली त्यानुसार त्यांनी निविदेसोबत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर केलेली असुन त्या सर्व पात्र आहे. त्यामुळे सर्व ३ हि ई कमर्शियल निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यास व निविदा धारकांशी चर्चा/वाटाघाटीसाठी करुन निर्णय घेणेस मान्यता असावी.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ ई-कमर्शियल निविदा आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यांचे मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Description of Work/ Item (s) | Qty. | Unt | Rajendra Cloth Stores | M.B.Trading Company | Tulsi Emporium |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Amount | Amount | Amount |
| 1 | Full Apran & Half Apran] Colour White, Type of Cloth Polyister 67% + Cotton 33% Brand – Raymond | 1960 | Mts. | **4,01,800/-** | 4,76,280/- | 4,13,560/- |
| 2 | Salwar/Kudta-Colour-Badami, Type of Cloth-Polyister 67% + Cotton 33% Shirting Brand – Raymond | 1710 | Mts. | **1,79,550/-** | 2,22,300/- | 2,22,300/- |
| 3 | Shirt Colour Grey (Shirting) Type of Cloth-Polyister 67% + Cotton 33% Shirting | 48 | Mts. | **5,040/-** | 6,480/- | 6,240/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Brand – Raymond | | | | | |
| 4 | Pant-Colour- Nave Blue. Type of Cloth- Polyister 67% + Cotton 33% Shirting Brand – Raymond | 30 | Mts. | **6,150/-** | 7,290/- | 6,330/- |
| 5 | Shirt- Colour Badami (Shirting) Type of Cloth- Polyister 67% + Cotton 33% Shirting Brand – Raymond | 88 | Mts. | **9,240/-** | 11,880/- | 11,440/- |
| 6 | Pant- Colour Chokletti, Type of Cloth- Polyister 67% + Cotton 33% Shirting Brand – Raymond | 55 | Mts. | **11,275/-** | 13,365/- | 11,605/- |
| 7 | Shirt- Colour Sky Blue (Shirting) Type of Cloth- Polyister 67% + Cotton 33% Shirting Brand – Raymond | 50 | Mts. | **5,250/-** | 6,750/- | 6,500/- |
| 8 | Pant-Colour- Nave Blue. Type of Cloth- Polyister 67% + Cotton 33% Shirting Brand – Raymond | 25 | Mts. | **5,125/-** | 6,075/- | 5,275/- |

**निर्णय क्र.७४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारकांना, दरांमध्ये आणखी सुट मिळणेकरिता मा.कार्यकारी अधिकारी/ मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर बोलविणेत यावे व त्यांचेकडून अंतीम निम्नतम दर घेण्यात येऊन, त्या दरानुसार त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०६ द्वारावती भक्तनिवास इमारतीच्या पुर्व व पश्चिमेकडील मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद ः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्ताविकः व्दारावती भक्तनिवास इमारतीचे परिसरात जवळ जवळ सर्वच ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविल्यामुळे भक्तांची चांगली सोय झालेली आहे. तसेच या भागात साफसफाई ठेवण्यास मदत झाली आहे. परंतू इमारतीचे पुर्वेकडील भागात सेप्टीक टॅंक जवळचे भागात सिवरजे ट्रीटमेंट प्लॅंट प्रस्तावितअसल्याने या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले नाहीत तसेच पश्चिमेकडील वळणरस्ता क्र. ०५ चे पुर्वेकडील मोकळ्या जागेतही पेव्हिंग ब्लॉक बसविणे बाकी आहे. सदरहु मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले तर त्या ठिकाणी स्वच्छता राहील तसेच तिथे भक्तांना विश्रांती घेणे सोयीचे होऊन परिसरातील रस्त्यावरील गर्दी कमी होणेस मदत होईल.

मागणीः मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजीचे स्थळ भेटीदरम्यान व्दारावती इमारतीचेपरिसरातील उपरोक्त प्रमाणे मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

प्रस्तावः व्दारावती भक्तनिवास इमारतीचे परिसरातील उपरोक्तप्रमाणे मोकळ्या जागेत पेव्हिंग बसवून घेणेकामी इकडील विभागामार्फत सन २०१३-१४ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार सदरहू कामी रुपये ९,३७,३१२/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



विभागाचा अभिप्रायः व्दारावती भक्तनिवास इमारतीचे परिसरातील पुर्व व पश्चिमेकडील मोकळ्या भागात पेव्हिंग ब्लॉक्स बसविल्यास सदरचा भाग सुशोभित दिसेल. या भागामध्ये भक्तांना विश्रांतीसाठी अतिरीक्त जागा उपलब्ध होऊन रस्त्यावरील गर्दी कमी होणेस तसेच स्वच्छता राहण्यास मदत होईल असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये ९,३७,३१२/- मात्रचे खर्चास व सदरचेकामविहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीच्या पुर्व व पश्चिमेकडील मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,३७,३१२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्य गटातील भू-संपादनाची आवश्यकता असलेल्या ०७ रस्त्यांचे भू-संपादन व विकसन करणेकामी अपेक्षित वाढीव खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद ः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः

१. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.२६३ दि.२४/०४/२००६.
२. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.१६ (ब) दि.१०/०१/२०१०.
३. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.५३८ दि.२४/०७/२०११.
४. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.७०६ दि.२४/०९/२००६.
५. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.७८ दि.०८/०१/२०१४.

प्रस्तावनाः शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते विकसीत करणेचेकामास तत्कालीन मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र.२६३ दि.२४/०४/२००६ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

या रस्ते विकास प्रकल्पाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयान्वये देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अकरा रस्ते विकसीत करणेकामी प्रस्तावास तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विकास कामांबाबत दि.०२/०७/२००८ रोजीचे बैठकीत मान्यता दिलेली असून, दि.१९/०९/२००८ रोजीचे शासन निर्णयान्वये एकुण रु.६५ कोटी अंदाजित खर्चापैकी रु.२८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सदरहू प्रकल्प लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने या प्रकल्पातील पाच रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत व उर्वरीत सहा रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेस मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली.

भूसंपादन कार्यवाहीसाठी लागलेला कालावधी, बाजारातील वाढते दर, रस्त्यांचे तांत्रिक तरतूदीतील बदल व लांबी-रुंदीतील बदलामुळे खर्चात वाढ होत असल्याने सुधारीत रु.८८ कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी तत्कालीन विधी व न्याय मंत्री (महाराष्ट्र शासन) मा.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



राधाकृष्ण विखे पा. यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार या प्रकल्पाचे वाढीव खर्चासह एकुण रु. ८८ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मा. विधी व न्याय मंत्री व मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे ठरले आहे. सदर बैठकीत ठरलेप्रमाणे सुधारीतप्रस्ताव (रुपये ८८ कोटी खर्चाचा) इकडील पत्र क्र. ७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये सादर करणेत आलेला असून, याकामी शासनाचे विधी व न्याय विभागाच्या विविध पत्रान्वये मागविण्यात आलेल्या पुर्तता/ खुलासे करण्यात आलेले आहेत.

तसेच याकामी दि. ०७/०१/२०१४ रोजी रु.८८.६७ कोटी खर्चाचा सुधारीत प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत आला असून, मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. अद्याप सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही. दरम्यान तत्कालीन मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र. ६४० दि. ०७/०८/२०१० अन्वये ठरल्यानुसार काम सुरु ठेवण्यात आले असून, आजअखेर सदरहू प्रकल्पांवर रु. ६६.९८ कोटी रक्कम खर्च करणेत आलेली आहे.

प्रस्ताव ः शिर्डी नगरपंचातीनेदि. १६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील २३ रस्ते विकसीत करणेकामी ढोबळ मानाने ०६ रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु. ४३.७३ कोटी व २३ रस्त्यांचे विकसनासाठी रु. ८२.८३ कोटी असा एकुण १२६.१०० कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५३८ अन्वये एकुण रु. १२६.१०० कोटी खर्चास मान्यता देण्यात आली असून, याकामी खालील प्रमाणे निर्णय पारीत झाला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणा-या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि. मी. लांबीचा) व पिंपळवाडी रस्ता ५६५ मी. ऐवजी १ कि. मी. पर्यंत समावेश करुन, प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत आली.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०६ नुसार व्दितीय प्राधान्य गटातील ज्या रस्त्यांना भूसंपादनाची आवश्यकता नाही व साईभक्त/ नागरीकांचे दैनंदिन वापरात जे १७ रस्ते आहेत ते प्रथमतः विकसीत करणेबाबत कार्यवाही करणेस, भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांचे मोजणीकामी मोजणी फी संस्थानतर्फे अदा करणेत यावी तसेच याकामी अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले आहे. त्यानुसार इकडील जा. नं. ३५५९/२०११ दि. ०७/१०/२०११ रोजीचे प्रस्तावान्वये भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्त्यांचे विकसनासाठी अंदाजे रु. ३५ कोटी निधी उपलब्ध करुन देणेस व सदर रस्ते संस्थानच्या माध्यमातून थेट विकसीत करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला आहे.

तसेच सदरहू प्रकल्पातील भूसंपादनाची आवश्यकता असलेले उर्वरीत सात रस्त्यांपैकी ०६ रस्त्यांचे भूसंपादन व विकसनासाठी येणारे अंदाजे रु. १०१.०१० कोटी खर्चास मान्यता मिळणेकामी इकडील जा. नं. १००/२०१२ दि. ०४/०४/२०१२ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाकडील जा. क्र. सासंवि-२०११/ ५१४/ प्र.क्र. ७४ का. सोळा, दि.२१/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये सदर रस्त्यांचा समावेश सन २०१८ श्रीं चे समाधी शताब्दी महोत्सव-कृती आराखड्यात समाविष्ट करणेबाबत कळविले होते. याबाबतची वस्तुस्थिती व सदर प्रकल्पास मान्यता देणेबाबत इकडील जा. क्र. ३९८६/ २०१३ दि. ०४/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आली आहे.

प्रस्तुत प्रकरणांचा पाठपुरावा करणेकामी संस्थानचे उपकार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) व शाखा अभियंता हे दि. ०६/०१/२०१४ ते दि. ०८/०१/२०१४ या कालावधीत विधी व

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे गेले होते. त्यावेळेस मा. कार्यासन अधिकारी यांनी सदरहू कामी येणारे सुधारीत खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही नसलेले व साईभक्तांचे व स्थानिक नागरीकांचे वापरातील १७ रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेकामी (सल्लागार फीसह) सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजेंट प्रा. लि., पुणे यांनी दि. ०७/०१/२०१४ रोजी सादर केलेले अंदाजपत्रकानुसार मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७८, दि. ०८/०१/२०१४ अन्वये रु.४७,०२,४४,९७८/- इतक्या सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार रस्त्यांचे विकसनांसाठीअंदाजे रु. ४७.०२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे इकडील जा. नं. ४६२०/२०१४ दि. ०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला आहे.

या प्रस्तावाबाबत मा. कार्यसन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०११ /५१४/ प्र. क्र. ७४/का. सोळा, दि. ३१/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविल्यानुसार सदरहू १७ रस्त्यांची अंदाजपत्रके तपासणीसाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे सादर करणेत आली असून, त्यांनी सदरहू अंदाजपत्रकांची तपासणी करुन अव्वर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केले आहेत.

उर्वरीत सात रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे कामासाठी मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४ अन्वये खालीलप्रमाणे रु. १११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार इकडील जा. नं. ४६६७/२०१४ दि. १०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रकल्पातंर्गत सहा रस्त्यांचे कामासाठी येणारे रु. १११.४६५ खर्चाचा सुधारीत प्रस्ताव विधी व न्याय विभाग यांचकडे सादर करणेत आला असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | रक्कम रुपये (कोटी) |
|---|---|---|
| ०१. | सहा रस्त्यांचे भूसपंादन करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील दि. २१/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविलेला खर्च | ५४.२६ |
| ०२. | उपरोक्त प्रमाणे सहा रस्ते विकसीत करणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि. १६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये ढोबळ मानाने कळविलेला खर्च | ५७.२८५ |
| एकुण अपेक्षित खर्च रुपये (०१+०२) | | १११.५४५ कोटी |

सदर प्रस्तावाबाबत मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०१४ /२४/प्र. क्र. १२ / का-सोळा, दि. १८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता असणारे ७ रस्ते विकसीत करण्याबाबतच्या प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालयाच्या सिव्हील अप्लीकेशन क्रमांक १२०५६ /२०१२ दि. १६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी असे कळविले आहे. त्यानुसार इकडील जा. क्र. ५९८९/ २०१४ दि. २४/०३/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरहू शिर्डी नगरपंचायत यांना सात रस्त्यांचे भूसंपादन व विकसन खर्चाची सविस्तर माहिती सादर करणेबाबत कळविणेत आले. अद्याप त्यापैकी फक्त भूसंपादन खर्चाची माहिती उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचात, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या व त्या पत्राची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली असून, विकसन व अनुषंगीक खर्चाची सविस्तर माहिती शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून प्राप्त झालेली नाही. दरम्यान रु. १११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मान्यता देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



विधी विभागामार्फत अर्ज सादर करणेस इकडील दि. २६/०४/२०१४ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता देणेत आली असून विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

आता, उपरोक्त सात रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील दि. २१/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये रु. ५४.२६ कोटी खर्च कळविला होता. आता, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचात, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या पत्र क्र. ७८/२०१४ दि. ०४/०६/२०१४ अन्वये भूसंपादन खर्च रु. ५४.२६ कोटी ऐवजी खालील तपशीलाप्रमाणे रु. १,५०,१८,८८,७९७/- इतका कळविलेला आहे.

नविन भूसंपादन कायदा सन २०१३ दि. ०१/०१/२०१४ पासून लागू करण्यात आला असल्याने या कायद्याचे कलम २४ नुसार भूसंपादनांची मोबदला रक्कम जमीन मालकांना या कायद्यातील शेड्युल १ प्रमाणे तसेच कलम २६ ते ३० प्रमाणे हिशोबीत करुन द्यावी लागणार आहे. एसआर नं. १ ते ३ व ६ या चार प्रकरणात यांची कलम ६ ची अधिसुचना सन २०१३ मध्ये प्रसिध्द केलेली आहे. सन २०१३ मध्ये शिघ्रसियध्द गणकदर तक्त्याप्रमाणे त्यांचा मुल्यदर ग्राह्य धरुन संभाव्य मोबदला देय रक्कम हिशोबित केली आहे तसेच एसआर नं. ४/१२ व ५/१२ या प्रकरणात कलम ६ ची अधिसुचना सन २०१४ मध्ये प्रसिध्द करण्यात येईल, त्यामुळे या प्रकरणात सन २०१४ चे शिघ्रसिध्द गणकदर ग्राह्य धरुन संभाव्य मोबदला देय रक्कम हिशोबित केली आहे याबाबत एकूण देय रकमेबाबतचा तक्ता तयार केला असून सोबत जोडून दिला आहे.

नविन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे हिशोबीत केलेली एसआर नं. १/१२ ते ६/१२ या सहा भूसंपादन प्रकरणातील एकुण रक्कम खालील प्रमाणे येते.

| अ. नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१. | शिघ्रसिध्द गणकदराप्रमाणे देय मोबदला | ६५,१०,९१,२७८/- |
| ०२. | वरील रकमेवर देय दिलासा रक्कम १००% प्रमाणे | ६५,१०,९१,२७८/- |
| ०३. | अतिरीक्त घटक १२% प्रमाणे २४ महिन्यांसाठी | १५,५९,६१,९०७/- |
| ०४. | आस्थापना खर्चाची रक्कम ३% प्रमाणे (वरील ०१ ते ०३ चे एकुण रकमेवर) | ४,३७,४४,३३४/- |
| एकुण रक्कम. | | १,५०,१८,८८,७९७/- |

सदरहु प्रकल्पातील सहा रस्त्यांचे भूसंपादन व विकसनासाठी ढोबळमानाने रु. १११.५८५ कोटी खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७८ अन्वये मान्यता देणेत आली असून त्यानुसार सदरहू प्रकल्पाचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी दि. १०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला आहे. विधी व न्याय विभागाचे दि. १८/०२/२०१४ रोजीचे पत्रानुसार सदरहु खर्चास मान्यता देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे विधी विभागामार्फत अर्ज सादर करणेस इकडील दि. २६/०४/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आली असून विधी विभागामार्फत दि. २५/०७/२०१४ रोजी उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे परवानगी मिळणेसाठी अर्ज सादर केला आहे.

दि. ०४/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या सहा रस्त्यांचे भूसंपादनासाठी रुपये ५४.२६ कोटी रकमे ऐवजी रुपये १,५०,१८,८८,७९७/- इतकी रक्कम कळविलेली आहे. या रकमेत सहा रस्त्यांचे विकसन खर्च व ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि. मी. लांबीचा) भूसंपादन व विकसन खर्च समाविष्ट नाही.

तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि. १४/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, व्दितीय प्राधान्य गटातील सहा रस्त्यांचे भूसंपादनासाठी वरीलप्रमाणे रु.१,५०,१८,८८,७९७/- खर्च असून, रस्ता क्र. ०७ (४५ मीटर रुंदीचा रस्ता) याची विकसन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



विभाग (जागतिक बँक विभाग) असल्याने या रस्त्याचा भूसंपादन व विकसन खर्च त्यांचेकडून मागितला असून, अद्याप प्राप्त झालेला नाही. सहा रस्त्यांचे भूसंपादनासाठी साधारणः दिड ते दोन वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. तसेच सदर रस्त्याचे रुंदीनुसार डिझाईन करुन रस्त्यास आवश्यक असणा-या बाबींचे (Utility Services) सर्व्हेक्षण करणे आवश्यक राहील. त्यासाठी प्रकल्प सल्लागार यांचेकडून सर्व्हेक्षण व डिझाईन करुन घेणे आवश्यक आहे. भूसंपादन झाल्यानंतर त्या वर्षीच्या दरसूची नुसार व रस्त्याच्या आवश्यक लागणा-या बाबी डीझाईननुसार सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक राहील. तरी याबाबत रस्ते विकसनाचे सविस्तर अंदाजपत्रके रस्त्याची जागा ताब्यात आलेनंतर तयार करणे आवश्यक राहील.

विभागाचा अभिप्राय ः शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये सदर केलेले रु.१२६.१० कोटी खर्चाचे प्रस्तावात सहा रस्त्यांचे भूसंपादनासाठी ढोबळमानाने रु.४३.७३ कोटी खर्च नमूद केला होता. त्यानंतर मा. उपविभागीय अधिकारी, भाग श्रीरामपूर यांनी दि.२१/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये सदरहू कामी खर्च रु.५४.२६ कोटी इतका कळिवला होता. आता, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि. ०४/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये रु.१,५०,१८,८८,७९७/- इतका खर्च अपेक्षित असलेचे कळविले आहे. याव्यतिरीक्त ४५ मीटर रुंदीचा बायपास रस्त्याचा भूसंपादन खर्च सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून प्राप्त झालेला नाही.

तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१४/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविल्यानुसार सदरहू रस्त्यांचे भूसंपादन होवून रस्त्यांचा ताबा मिळणेस दिड ते दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदरहू रस्त्यांची भूसंपादन कार्यवाही पूर्ण होऊन रस्ते उपलब्ध झालेनंतर त्यावेळचे दरसूचीनुसार रस्त्यांचे विकसनाचे सविस्तर अंदाजपत्रके करणे आवश्यक राहील. करीता प्रथमतः भूसंपादन कार्यवाही पूर्ण होऊन रस्ते ताब्यात मिळणे आवश्यक असल्याने, तुर्त मा. उच्च न्यायालयामध्ये सादर करणेत आलेला रु.१११.५४५ कोटी रकमेचा प्रस्ताव मागे घेवून, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांना भूसंपादनासाठी अदा करावयाच्या रु.१,५०,१८,८८,७९७/- खर्चास मान्यता मिळणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अर्ज सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी प्रस्तावितकामी येणाऱ्या रु.१११.५४५ कोटी मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज सादर केलेला असून अद्यापपर्यंत या अर्जावर काहीही निर्णय झालेला नाही. मा.औरंगाबाद खंडपीठाकडे याबाबत पाठपुरावा करणेत यावा व मा.औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी मिळाल्यानंतर वाढीव रकमेचा प्रस्ताव समिती समोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **समाधी मंदिर परिसरात एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:- "21 (1) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईलः-

(ख) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे,''

प्रस्तावनाः- समाधी मंदिर परिसरात एम.एस. स्ट्रक्चर उभारणी करुन पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन कायमस्वरुपी छताची उभारणी करणेकामीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि.२१ जून २०१३ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.४४२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



''... यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.क्र. १ चे ''समाधीमंदिर उत्तर बाजुकडील'' छत उभारणीचे काम श्री. राजीव मेहता, नवि दिल्ली हे देणगी दाखल करणार होते. याबाबत त्यांना विचारणा केली तथापी त्यांचेकडून प्रतिसाद नसल्याने समाधी मंदिर परिसरात प्रस्तावात नमूद केलेल्या ठिकाणी एम.एस. स्ट्रक्चर वापरुन, रिमुव्हेबल मंडप उभारणेकामी साईआश्रम प्रकल्पासाठी स्ट्रक्चरल डिझाईन सेवा दिलेले कन्सल्टंट श्री. आर.आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून स्ट्रक्चरल डिझाईन घेऊन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले''

वर नमूद व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे जा.नं.३२७८, दि.२१/१०/२०१३ रोजीचे पत्राव्दारे श्री आर.आर. कुलकर्णी, पुणे यांची सदर कामासाठी स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेत आली. त्यानुसार श्री.आर.आर. कुलकर्णी पुणे यांनी शिर्डी येथील मंदिर परिसराची समक्ष पहाणी करुन दि.२७/११/२०१३ चे ई- पत्राव्दारे एकूण आठ शेडसचे स्ट्रक्चरल डिझाईन व एस्टीमेट सादर केले आहे. त्यानुसार एकूण ३०९०३ चौ.फुट क्षेत्रामध्ये शेडस् उभारणेसाठी श्री.आर.आर. कुलकर्णी यांनी सादर केलेल्या एस्टीमेटनुसार अंदाजे रु.१,४६,१८,१२०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.१,४६,१८,१२०/- मात्रचे खर्चास, तसेच त्यासाठी परवानगी मिळणेकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील अँप्लिकेशन दाखल करणेसाठी मा.त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील नि.क्र.९५० अन्वये मान्यता देण्यात आली. त्यानुसार मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात Civil Application No.1776/ 2014, in Public Interest Litigation No.18/2011 दि.२६/०२/२०१४ अन्वये दाखल करणेत आला. त्यावर मा. उच्च न्यायलय यांचा दि.२६/०२/२०१४ रोजी आदेश झालेला असून तो सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे. सदर आदेशात या कामासाठी संस्थान व्यवस्थापन समितीने या क्षेत्रातील तज्ञांचे मत व सल्ला घेणे अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे.

संस्थानमार्फत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग व मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. संस्थानचे सध्याचे मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर येथील आवश्यक बाबींचा साईभक्तांच्या आवश्यकतेनुसार सांगोपांग विचार करुन आर्किटेक्ट माथुर अँण्ड काप्रे असो. नवी दिल्ली यांचेमार्फत आरखडे तयार करणेत आले आहेत. त्यामुळे वर नमूद मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार याबाबत सर्वांगिण अभ्यास करुन सल्ला देणेबाबत आर्किटेक्ट माथुर अँण्ड काप्रे, नवि दिल्ली यांना जा. क्र. एसएसएसटी/बांधकाम/३४२/२०१४ दि.२१/०४/२०१४ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. त्यांनी दि.१८/०८/२०१४ रोजीचे पत्राने अभिप्राय सादर केला असून त्यांचे पत्र सोबत अवलोकनार्थ ठेवले आहे.

आर्किटेक्ट माथूर अँण्ड काप्रे यांनी त्यांचे अभिप्रायानुसार विषयांकीत शेडस् चे कामासाठी खालील चार प्रकार सुचविले आहेत.

| Option No. | Details | Preliminary Estimated Cost |
|---|---|---|
| 1 | Fixed Covering<br>PROS: Cost effective, will allow just the right amount of sun light required through out the year, waterproof. No need to remove or refix hence no storage required. Fans and public address system can be installed on the frame.<br>CONS: Like a permanent structure. Whether permanent cover right through the year is desired or not and if so at that cost? | Rs. 2.93 Crore |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| 2 | Removable covering<br>PROS: Cost effective, will allow just the right amount of sun light required, waterproof. Fans and public address system can be installed on the frame. Possible to remove the fabric after every event and reinstall for the next occasion in a matter of a couple of hours.<br>CONS: Storage of covering material required. Refixing the right way every time will be quite a task. | Rs. 2.93 Crore |
| 3 | Retractable manual operation<br>PROS: Fabric cover can be retracted manually and the whole space is opened up for enjoying weather and openness. No storage required for the fabric as it stay folded on the structure itself.<br>CONS: The folded fabric remains visible the year round. Retracting manually can be a task as the areas are huge. | Rs. 3.38 Crore |
| 4 | Retractable motorised operation<br>PROS: Most comfortable way of operation. No special staff required to open or close the fabric roof. All operations of covering and opening can be within a matter of minutes. In fact the system can be operated on a hourly basis when required.<br>CONS: The folded fabric remains visible the year round. Retracting manually can be a task as the areas are huge. The most expensive vis a vis the other options almost twice the cost of the first option. | Rs. 4.95 Crore |

आर्किटेक्ट यांचे अभिप्रायानुसार Retractable motorised Operated PVC Fabric Shed उभारणे योग्य होईल. अशा प्रकारचे शेड उभारल्यास आवश्यकता भासल्यास शेडचे छत उघडणे व पुन्हा बंद करणे अत्यंत कमी वेळेत व कमी मनुष्यबळात करता येईल. याकामी अंदाजे रु.४.९५ कोटी मात्र खर्च येईल असे कळविले आहे.

संस्थान परिसरात विविध सात ठिकाणी उभारणेचे PVC Fabric Shed पैकी खालील ठिकाणीं आर्किटेक्ट यांनी उपरोक्त प्रमाणे नमूद केलेले पर्याय क्र. ०२ नुसार Removable Covering शेड उभारता येतील. यासाठी अंदाजे रु.२.५० कोटी मात्र खर्च येईल.

1. समाधि मंदिरातून बाहेर पडण्याच्या मार्गावर.
2. समाधि मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंड येथील मोकळ्या जागेत.
3. समाधि मंदिराचे पूर्वेकडील (गेट नं. ०३ चे बाहेरील बाजूस) १६ आर जागेत.
4. गेट नं.०२ जवळील उदी काउंटर समोर.
5. श्रीं चे गुरुस्थान समोरील मोकळ्या जागेत.
6. नंदादिप व दत्त मंदिर समोर.

तसेच आर्किटेक्ट यांनी नमूद केलेले पर्याय क्र.०४ नुसार खालील ठिकाणी Retractable motorised Operated PVC Fabric Shed उभारणे योग्य होईल असे मत आहे. यासाठी अंदाजे रु.०.८० कोटी मात्र खर्च येईल.

1. समाधि मंदिराचे उत्तर बाजूकडील रस्ता.

उपरोक्त प्रमाणे विविध सात ठिकाणी PVC Fabric Shed उभारणेकामी येणा-या एकूण रु.३.३० कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडेस सिव्हील अर्ज दाखल करावा लागेल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी त्यासाठी मा.त्रीसदस्य समितीचे मान्यतेने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडेस सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या नवीन दर्शन क्यु कॉम्प्लेक्स तयार करणेचे प्रयोजन आहे, तसेच मंदिर परिसरामध्ये मोकळी जागा कमी असल्यामुळे प्रस्तावित छत उभारणी केल्यास खेळती हवा राहणार नाही व परिक्रमा मार्गास अर्थ उरत नाही, यामुळे मंदिर परिसरामध्ये एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत उभारणेत येऊ नये, फक्त गेट नं.०३ समोरील संस्थानचे १६ गुंठे जागेत सदरहू छत उभारणी करणेसाठीचा प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव ॲल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट– कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावनाः- मंदिर परिसरातील देणगी काऊंटर काऊंटर नं. ०२ समोर श्री साईबाबा दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो 'श्री' चे जीवन चरीत्रावर आधारीत पुस्तके विक्रीसाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून बुकस्टॉल काऊंटर चालू करण्यात आले आहे.

संस्थान प्रकाशीत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका ही साधारणतः दिवाळी व नाताळच्या सुट्टीच्या गर्दीत विक्रीसाठी उपलब्ध होत असते. यावेळी दैनंदिनी/ दिनदर्शिका व पुस्तके यांचे बॉक्स मोठ्या प्रमाणात विक्री काऊंटर कॅबीन मध्ये ठेवलेले असतात. त्यामुळे विक्री काऊंटर मधील जागा अपुरी पडते. तसेच दैनंदिनी/ दिनदर्शिका, श्रींचे जीवन चरीत्रावर आधारीत पुस्तके विक्रीकामी ग्राहक यांना सुलभता मिळावी म्हणून विक्री काऊंटरवर संगणकीकरण करणे प्रस्तावीत आहे. याकामी उपरोक्त विषयांकीत कामे करणेकरीता दि.११/०८/२०१४ व दि.२३/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये प्रकाशने विभागाने कळविले आहे.

प्रस्तावः- वरील विषयांकीत काउंटरला दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके साठविणेकामी रुमची साईज वाढविणेकरीता ॲल्युमिनिअम पार्टीशन करणे तसेच संगणकीकरण करणेकामी कांऊटर तयार करणे या कामांसाठी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing supplying and fixing in position anodised extruded alluminium partition | 50.00 | M2 | 2096.00 | 1,04,800.00 |
| 02 | Providing and Fixing in position door shutter of required size in anodised extruded allminium sections | 1.95 | M2 | 4,274.00 | 8,334.30 |
| 03 | Providing and Fixing in position computer counter with Drawers In plywood and laminate | 06.65 | RMT | 15000.00 | 99,750.00 |
| | Total Rs. | | | | 2,12,884.30 |

तरी दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव अल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर तयार करणेकामी उपरोक्त तपशिलाप्रमाणे येणारे अंदाजे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रु.२,१२,८८४/- मात्रचे खर्चास व सदरचे काम करणेसाठी वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे सिलबंद निविदा मागविणेकरीता मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रकाशने विभागाकडील दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव ॲल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,१२,८८४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **शिर्डी लगत असलेल्या गावांमधील जमीन वापराची व नियोजित/ प्रस्तावित विकास क्षेत्राची सद्यस्थिती दर्शविणाऱ्या नकाशासह संगणकीय कार्यप्रणाली तयार करणे सेवेचे अंतिम बिल अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) महाराष्ट्र प्रदेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र. टीपीएस-१६०८/९८१/प्र.क्र१०९/०९/नवि दि.१९/०४/२०११ चे अधिसूचनेनुसार ''शिर्डी'' नागरी विकास प्राधिकरणाची'' स्थपना करण्यात आली आहे.

याबाबत नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे दि.०३/०८/२०११ रोजी मा.ना. राधाकृष्ण विखे पा.मंत्री कृषी व पणन यांचे अध्यक्षतेखाली व श्री.टी.सी. बेंजामीन प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे उपस्थितीत शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाचे कामाकाजाबाबत बैठक झाली. या बैठकीमध्ये निर्णय क्र.६ अन्वये प्राधिकरणांतर्गत येणा-या क्षेत्राचा सुनियोजीत विकास आराखडा तयार करणेकामी प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत नगरविकास सचीवांच्या अध्यक्षतेखाली समितीने प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करावी. सदर सल्लागाराकरवी प्राधिकरणासाठी Vision document व CAP तयार करण्यात यावे. नेमण्यात येणा-या सल्लागाराची फी ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी द्यावी असे ठरले आहे.

शिर्डी विकास प्राधिकरणातील उपरोक्त गावांचा नियोजनबध्द विकास करणेसाठी सदर गावांची सद्यस्थिती दर्शविणारा नकाशा व त्या अनुषंगाने संगणकीय कार्यप्रणाली तयार करुन घेणे आवश्यक आहे. शिर्डी लगत असलेलया गांवामध्ये नियोजीत विकास प्रकल्प राबविण्याचे दृष्टीने संस्थानला उपयोगी ठरेल या दृष्टीने सदर गावांमधिल जमिनींचा सद्यस्थिती दर्शविणारा नकाशा व त्या अनुषंगाने संगणकीय कार्यप्रणाली तयार करुन घेणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र.९०४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

''उपरोक्त प्रस्तावावर आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी लगत असलेल्या गावांमध्ये नियोजित विकास प्रकल्प राबविण्याचे दृष्टीने संस्थानला भविष्यात उपयोगी ठरेल यादृष्टीने आणि शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाचे कामासाठी उपयुक्त असणारी माहिती लवकरात लवकर उपलब्ध व्हावी या दृष्टीने, मे. देवरे धामणे आर्किटेक्ट, नाशिक यांचेकडून त्यांनी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे नकाशांसह संगणकीय कार्यप्रणाली तयारककरुन घेणेत यावी. मे. देवरे धामणे आर्किटेक्ट,नाशिक यांची प्रस्तावित केलेल्या रक्कम रुपये १२ लाख मात्र अधिक सेवाकर या सेवाशुल्कामध्ये सवलत देणेबाबत त्यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करुन रक्कम रु.१०,९७,५००/- मात्र (सेवा कर अतिरिक्त) रकमेस काम करणेची तयारी दर्शविली आहे. त्यानुसार सदर कमी केलेल्या रकमेस मान्यता देणेत आली. या रकमेस वरील काम त्यांचेकडून करुन घेण्यात यावे, तसेच दरम्यानचे कालावधीत मा. शासनाकडे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.''

त्यानुसार आर्किटेक्ट देवरे धामणे, आर्किटेक्टस् नाशिक यांना जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/४५६३/२०११, दि.०६/१२/२०११ अन्वये कार्यादेश देणेत आला आहे. याकामी आर्किटेक्ट यांचेशी दि.१८/०४/२०१२ रोजी करारनामा करणेत आला असून करारनाम्यातील अटी शर्ती नुसार पहिले दोन टप्प्यांचे फी पोटी रक्कम रु.४,८४,२१७/- मात्र अदा करणेत आलेली आहे.

ब) श्री साईबाबांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त संस्थानतर्फे ''**श्रीसाईंचे शतक महोत्सवी पूण्यतिथी वर्षे दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१९ ऑक्टोंबर,२०१८ (विजया दशमी)**'' अखेर साजरा करण्याचे नियोजन आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साईबाबांच्या शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षात लाखो साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देतील. तसेच शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव काळात ३० ते ४० लाख साईभक्त श्री साईबाबांचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे व नवीन सुविधा उभारणे अत्यावश्यक आहे.यामध्ये प्रामुख्याने खालिल पायाभूत सुविधांचा समावेश असणे गरजेचे आहे.

१. शिर्डी शहरातील अंतर्गत रस्ते व शिर्डीला जोडणारे राज्यमार्ग व इतर प्रमुख रस्ते रुंदीकरण व विकसीत करणे.
२. शिर्डी शहर व लगतचे परिसरात वाहतळांची निर्मिती करणे.
३. शिर्डी शहर व लगतचे परिसरात पुरेशा सार्वजनीक प्रसाधनगृहांची उभारणी करणे.
४. संभाव्य गर्दी विचारात घेऊन सक्षम पाणीपूरवठा व्यवस्था निर्माण करणे.
५. घनकचरा व्यवस्थापन व मलनिःसारण व्यवस्था करणे.
६. विद्युत वितरण व्यवस्थेचे नूतनीकरण व विस्तारीकरण करणे.

यापुर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे अध्यक्ष यांनी दि.०७/१२/२०१० चे निवेदनाव्दारे सन्मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडेस सन २०१७ -२०१८ मधिल शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त विकास प्रकल्प राबवविणेसाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलबध करुन देणेसाठी विनंती केली होती.

श्री साईंचे शतक महोत्सवी पूण्यतिथी वर्षे साजरे करणेसाठी पूर्वतयारी करण्याचे दृष्टीने कृती आराखडा तयर करणेबाबत महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. सासंवि-२०१३/ प्र.क्र.१/१३/ का.सोळा, दि.१९/०१/२०१३ व सासंवि-२०१३सं.क्र.१८६/का.सोळा दि.१५/०४/२०१३ रोजीचे पत्राने संस्थानला कळविणेत आले होते. यावर संस्थानमार्फत तयार करणेत आलेला प्राथमिक कृती आराखडा जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/७३६/२०१३ रोजीचे पत्राने शासनाकडे सादर केला आहे.

शिर्डी परिसरातील जमीन वापराचीव नियोजीत/ प्रस्तावित विकास क्षेत्राची सद्यस्थिती दर्शविणा-या नकाशासह संगणकीय कार्यप्रणाली तयार केल्यास शताब्दी निमित्त करावयाची नियोजीत / प्रस्तावीत विकास कामे ठरविण्यात व ते राबविण्यात मोठी मदत होणार आहे.

क) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार संस्थानचे जा.क्र. एसएसएसटी/बांधकाम/६१४६/२०१२, दि.०७/०३/२०१२ रोजीचे पत्राने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेस्तव विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर क्र.सासंवि/०१२/सां.क्र.१२५/का.सोळा, दि.१२/०४/२०१२ रोजीचे पत्राने शासनाने काही मुद्यांबाबत खुलासा विचारणा केली होती. संस्थानचे जा.क्र. एसएसएसटी/ बांधकाम/ १३२३/ २०१२, दि.२७/०१/२०१२ रोजीचे पत्राने शासनाने विचारलेल्या मुद्यांबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करणेत आला आहे.

| अ.नं. | मुद्दा | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी नागरी विकास प्राधिकरणामार्फत करण्यता येणारे कामावरील खर्च कोणामार्फत करण्यात येणार आहे. त्याचे प्रमाण/ हिस्सा निश्चित करण्यात आला आहे किंवा कसे, असल्यास त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देऊन भक्तांचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थानचे कोणकोणते कामांचा त्यामध्ये समावेश आहे व त्यासाठी एकूण किती खर्च अपेक्षीत आहे. हे सविस्तरपणे स्पष्ट | याबाबत तपशिल अद्याप निश्चत करण्यता आलेला नाही. तसेच प्राधिकरण अथवा संस्थान यांचेतर्फे याबाबत निर्णय घेणेत आलेला नाही. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| | व्हावे. | |
| ०२ | शिर्डी नागरी विकास प्राधिकरणांतर्गत येणारे विकास कामासाठी नकाशासह संगणीकय कार्यप्रणाली तयार करण्याचे प्रस्तावित आहे. सदर खर्च विकास प्राधिकरणाकडून का करण्यात येत नाही हे स्पष्ट करण्यात यावे. | दि.०३/०८/२०११ रोजी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे मा. नामदार श्री. राधाकृष्ण विखे पा. मंत्री, कृषी व पणन यांचे अध्यक्षतेखाली व श्री. टी.सी.बेंजामीन, प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे उपस्थितीत शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाची बैठक झाली होती. या बैठकीत प्राधिकरणांतर्गत येणा-या गावांचा सुनियोजीत आराखडा तयार करणेकामी सल्लागाराकरवी प्राधिकरणासाठी Vision Document व CDP तयार करणेत यावा व त्यासाठी नेमण्यात येणा-या सल्लागाराची फी ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, |
| | | शिर्डी यांनी द्यावी असे ठरले आहे. शिर्डी नागरी विकास प्राधिकरणासाठी अद्याप निधी मंजूर झालेला नसल्याने सदर सल्लागार फी खर्च संस्थानमार्फत अदा करण्यात येत आहे. |
| ०३ | नकाशासह कार्यप्रणाली तयार केल्यास श्री साईबाबा संस्थानास त्याचा काशाप्रकारे उपयोग होणार आहे. ज्या गावांचा यामध्ये समावेश आहे. त्याठिकाणी संस्थानचे मालकीच्या जमिनी, मालमत्ता आहेत किंवा कसे,असल्यास त्यांचा तपशिल देण्यात यावा. | शिर्डी नागरी विकास प्राधिकरणात समावेश असलेल्या १२ ग्रामपंचायत, ०१ नगरपरिषद व ०१ नगरपंचायत असणा-या गावांपैकी खालील पाच गावांमध्ये संस्थानच्या जमिनी आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. <br> (तक्ता खाली) <br> उपरोक्त जमिनींमध्ये संस्थानचे विविध विकास प्रकल्प राबविणेकरीता नियोजन करणे, पायाभूत सुविधांची आखणी करणे, संस्थानतर्फे प्राधिकरण क्षेत्रात इतरत्र जमिनी खरेदी करणे इत्यादी कामकाजासाठी जमिनीची सद्यस्थिती (existing land use map) व विकास योजना प्रस्ताव दर्शविणारा नकाशा व त्या अनुषंगाने संगणकीय कार्यप्रणाली तयार करणे याचा संस्थानला उपयोग होणार आहे. |
| ०४ | सदरील कामासाठी मे. देवरे धामणे आर्किटेक्टस्, नाशिक यांचीच निवड करण्याची कारणमिमांसा स्पष्ट होत नाही. अशाप्रकारे काम देण्यापूर्वी विहित पध्दतीचा (निविदा, दरकरार) इत्यादी | • मे. देवरे धामणे आर्किटेक्टस् नाशिक यांना नगरचना क्षेत्रातील कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे. <br> • नाशिक महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या एकूण ९१९३१ हेक्टर क्षेत्रासाठी (६ तालुके, ११६ गावे, १ महानगर पालीका, ०३ नगर |

| अ.क्र. | गांवाचे नांव | क्षेत्रफळ | | |
|---|---|---|---|---|
| | | हेक्टर | आर | चौ.मी. |
| ०१ | शिर्डी | ३८ | ६४ | २९.३२ |
| ०२ | निमगांव को-हाळे | ५१ | १९ | ००.०० |
| ०३ | कनकुरी | ०५ | ३२ | १६.०० |
| ०४ | रुई | ०७ | ३२ | ००.०० |
| ०५ | को-हाळे | ०१ | ६२ | ००.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| | पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला दिसून येत नाही. मे. देवरे यांचे दर कशाचे अधारे निश्‍चत करण्यात आले हे स्पष्ट करण्यात यावे व निविदा पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्यास तशी कार्यवाही करण्याबाबत विचार करण्यात यावा. | परिषदा) बेस मॅप तयार केलेला असून त्याला ग्लोबल कोऑर्डीनेशन दिलेले आहेत. सेटेलाईट इमेजरीशी लिंक केले आहेत. सर्व मंजूर लेआऊट टाकलेले आहेत व झोनिंग रिझर्वेशन दर्शविलेले आहेत.<br>• शासनाचे नगरविकास विभागाव्दारे नियुक्त नाशिक महानगरपालिका विकास आराखडा तांत्रिक समिती, सटाणा शहराची प्रारुप विकास योजना नियोजन समिती आणि शिर्डी शहराच्या वाढीव हद्दीची प्रारुप विकास योजना नियोजन समितीचे सदस्य म्हणून काम केले आहे.<br>• मे. देवेर धामणे यांनी त्यांनी प्रस्तावात सदर कामासाठी रु.१२ लक्ष मात्र अधिक सेवाकर इतक्या फीची मागणी केलेली होती.<br>याबाबत दि.१९/११/२०११ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत फीमध्ये सवलत देणेबाबत त्यांचेशी चर्चा करणेत आली असता, त्यांनी दर कमी करुन रक्कम रु.१०,९७,५००/- मात्र (सेवा कर अतिरिक्त) रकमेस काम करणेची तयारी दर्शविली. त्यानुसार सदरकामी केलेल्या रकमेस मान्यता देणेत आली. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०५ | व्यवस्थापन समितीचे ठरावामध्ये मे. देवरे यांच्याकडून काम करुन घेण्यात यावे व दरम्यानचे कालावधीत शासनाकडे मान्यतेस्व प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले असल्याचे नमूद केले आहे. सदर काम मे. देवरे यांना देण्यात येवून काम सुरु करण्यात आले आहे किंवा कसे, असल्यास शासनाच्या मान्यतेची प्रतिक्षा का करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा. | दि.१९/११/२०११ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ९०४ अन्वये ठरल्यानुसार मे. देवरे धामणे यांना जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/ ४५६३/२०११, दि.०६/१२/२०११ अन्वये विषयांकीत कामाचा नेमणूक आदेश देणेत आलेला आहे. देवरे धमाणे आर्किटेक्ट यांनी प्रत्यक्षात कामास सुरुवात केली असून प्राधिकरणात समावेश असणा-या गावांचा मुळ नकाशा (Base Map) तयार केला आहे. तसेच आता नगररचना विभागामार्फत या गावांचे मंजूर अभिन्यास प्राप्त करुन संगणकीय कार्यप्रणालीला संलग्न करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. |

विषयांकित प्रस्ताव अद्याप शासनस्तरावर मान्यतेच्या प्रतिक्षेत आहे.

ड) मे देवेरे धामणे आर्किटेक्ट्स् यांनी शिर्डी नागरी विकास प्राधिकरणात समावेश असणा-या १२ गावे, ०१ नगरपंचायत व ०१ नगरपरिषद असलेल्या शहरांचे हद्दींचा मुळ नकाशा (Base Map) तयार केला आहे. तसेच त्यांचेशी दि.१८/०४/२०१२ रोजी केलेल्या करारनाम्यानुसार मुळ नकाशा Google Earth बरोबर लिंक केलेला आहे. आर्किटेक्ट यांनी करारनाम्यानुसार User Manual, नकाशांच्या हार्ड कॉपीज व Software Training, दिलेले आहे. त्यास अनुसुरु मे.देवेर धामणे, आर्किटेक्टस्, नाशिक यांनी त्यांचे दि.२५/०६/२०१४ रोजीचे अंतिम बिलाव्दारे सदर कामासाठी उर्वरीत रु.७,३९,८९१/- मात्रची खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

**Details of the Bill**

| Sr. No. | Particulars | Fees Due | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Stage -1 :- On issue of Work Order | 20% of the total fees payable | 219,500.00 |
| 2 | Stage -2 :- On submission of base map for verification. | 20% of the total fees payable | 219,500.00 |
| 3 | Stage-3 :- After linking the map to the Google Earth | 30% of the total fees payable | 329,250.00 |
| 4 | Stage-4 :- After submission of the final product to the Sansthan | 30% of the total fees payable | 329,250.00 |
| | Total amount Rs. : | | 1,097,500.00 |
| | Less amount paid previously Rs. : | | 439,000.00 |
| | Total amount Rs. : | | 658,500.00 |
| | Add service Tax 12.36% Rs.: | | 81,391.00 |
| | **Total amount Payable Rs. :** | | **739,891.00** |

तरी उपरोक्त तपशिलाप्रमाणे आर्किटेक्ट यांना करारनाम्यानुसार अंतिम बिलापोटी सर्व्हीस टॅक्ससह एकूण रक्कम रु.७,३९,८९१/- मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी लगत असलेल्या गावांमधील जमीन वापराची व नियोजित/ प्रस्तावित विकास क्षेत्राची सद्यस्थिती दर्शविणाऱ्या नकाशासह संगणकीय कार्यप्रणाली तयार करणेच्या सेवेचे अंतिम बिल रु.७,३९,८९१/- मात्र मे.देवरे धामणे आर्किटेक्टस् यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.११** **स्टेनलेस स्टिल वॉल हँगर खरेदीसाठी वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः- २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावनाः- या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते त्या अनुषंगाने.

साईआश्रम भक्तनिवास येथील निवासी रुम मध्ये भक्तांचे कपडे अडकविण्यासाठी स्टेनलेस स्टिल वॉल हँगर ६ हुकाचे खरेदीबाबत या विभागाकडील दि.१९/०८/२०१३ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

१) दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७६० नुसार स्टेनलेस स्टिलचे६ हुकाचे वॉल हँगर नग १५५० विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणे व या कामी येणा-या अंदाजे रु.१,४७,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार

२) जा. नं. एसएसएस/वशी-साईआश्रमभक्तनिवास/४६५८/२०१४ दि.०९/०१/२०१४ अन्वये १३ पुरवठा धारकांकडून दरपत्रके मागविण्यात येऊन ३ पुरवठा धारकांची दरपत्रके प्राप्त झाली होती.

३) प्राप्त झालेली दरपत्रके मा. उपसमितीचे दि.०३/०२/२०१४ चे सभेपुढे उघडण्यात येऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता सादर करण्यात आला होता.

४) तुलनात्मक तक्ता व स्टेनलेस स्टिल ६ हुकाचे वॉल हँगर चा नमुना बांधकाम विभागाकडून मान्य करुन मे.सोमवंशी हार्डवेअर राहाता यांचे न्यूनतम दर रु.७५/- प्रमाणे १५५० नगासाठी रु.१,१६,२५०/- चे खर्चास व संबंधीत दरपत्रक धारकास पुरवठा आदेश देणेबाबत दि.०३/०३/२०१४ चे मा. उपसमिती सभेतील इतिवृत्त व दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१७४ नुसार मान्यता देण्यात आलेली होती.

५) त्यानुसार जा.नं. एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/८८७/२०१४ दि.२१/०५/२०१४ अन्वये मे. सोमवंशी हार्डवेअर राहाता यांना १५५० नग स्टेनलेस स्टिल वॉल हँगर पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

तथापि, संबंधीत पार्टीला माल पाठविण्याबाबत वारंवार तगादा करुनही उपरोक्त पुरवठाधारक यांनी सदर मालाचा पुरवठा केला नाही. पुरवठा धारकाने आम्हाला होलसेल व्यापा-याने माल पुरवठा करण्यास असमर्थता दाखवल्यामुळे नाईलाजाने आम्हाला आपणास मालाचा पुरवठा करू शकत नाही असे पत्र दिले. त्यानुसारमा. प्रशासकीय अधिकारी यांनी दि.०६/०८/२०१४ रोजी घेतलेल्या विभाग प्रमुखाच्या सभेत मे. सोमवंशी हार्डवेअर राहाता यांना ब्लॅक लिस्टेड करणे व या पुढे त्यांना संस्थानकडून कुठलाही पुरवठा आदेश दिला जाणार नाही असे पत्र देणेबाबत सुचना केलीत्यानुसारमे.सोमवंशी हार्डवेअर राहाता यांना दि.२१/०८/२०१४ रोजी तसे पत्र देण्यात आले आहे.

या कामी नव्याने प्रस्ताव सादर करावा लागणार आहे असे नम्र मत असून त्या कामी निविदा विक्री प्रक्रीयाचे शेड्यूल सोबत अवलोकनार्थ सादर करीत आहे.

प्रस्तावः- या खरेदीसाठी दि.०३/०२/२०१४ रोजी उघडण्यात आलेल्या दरपत्रकातील L2 मे.ॲडव्हेंचरमॅट्रेस, अहमदनगर यांचे दर प्रती नग रु.२७५/- असून मे. सोमवंशी हार्डवेअर राहाता व मे. ॲडव्हेंचर मॅट्रेस, अहमदनगर यांचे दरात प्रती नग रु.२००/- ची तफावत असल्याने याकामी रू.२००×१५५० नग = रु.३,१०,०००/- मात्र इतक्या वाढीव खर्चासह रूपये ४,२६,२५०/- वर अधिक अंदाजे१०% किंमतीमध्ये वाढ गृहीत धरून रूपये ४२,६२५/- यासह अंदाजे रूपये ४,६८,८७५/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. यातून यापुर्वी दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७६०.अन्वये खर्चास मान्यता मिळालेली रक्कम रु.१,१६,२५०/- ही

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम रु.३,५२,६२५/- या वाढीव रकमेच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्तावमा.त्रीसदस्यीयव्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा लागणार आहे.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः- सदरचे काम करणे आवश्यक असून, याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१ (ग) मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार मा. त्रीसदस्यीय समितीची मान्यता घेतल्यानंतर सदर खरेदीचे काम, खरेदी विभागामार्फत निविदा विक्री करुन खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी स्टेनलेस स्टिल वॉल हँगर १५५० नग खरेदीसाठी अंदाजे वाढीव खर्च रक्कम रु.३,५२,६२५/- मात्र अपेक्षित आहे. तरी सदरचे साहीत्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी अंदाजे वाढीव रक्कम रु.३,५२,६२५/- मात्रचे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.७५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील खोल्यामध्ये बसविणेसाठी आवश्यक असलेले १५५० नग स्टेनलेस स्टिल वॉल हँगर खरेदीसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५२,६२५/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी पुर्वी पुरवठा आदेश दिलेले मे.सोमवंशी हार्डवेअर, राहाता यांनी हँगरचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली असल्यामुळे त्यांचा ब्लॅक लिस्ट मध्ये समावेश करणेत यावा व यापुढे संस्थानचे कोणतेही काम त्यांना देण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.१२ श्री पुण्यतिथी उत्सव- २०१४ किर्तनकार व कलाकार निश्चत करणे, बिदागी निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री पुण्यतिथी उत्सव २०१४ हा दि.२/१०/२०१४ ते दि.४/१०/२०१४ असा तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रमः-** उत्सवात ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन कार्यक्रम होत असतात. मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ३ दिवसाचे किर्तनासाठी रु. ९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. परंतु श्री पुण्यतिथी उत्सव २०१३ हा तीन दिवसांचा उत्सव असल्यामुळे कीर्तनकारास ९००१/- मानधन देता येईल. खालील १ कीर्तनकारांने श्री पुण्यतिथी उत्सव- २०१४ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेला आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | किर्तनकार नांव |
|---|---|
| १ | कीर्तन केसरी ह.भ.प.श्री.मनोहरबुवा बा.दीक्षित<br>वृंदावन एन-१२, डी-१८/७<br>स्वामी विवेकानंदनगर, हडको ,<br>औरंगाबाद ( महाराष्ट्र ) ४३१ ००३<br>मो.नं.९४०३१२७६१३ |

उपरोक्त पैकी किर्तन कार्यक्रम कोणास द्यावा या बाबतचा निर्णय त्रिसदस्यीय समितीचे सभेत घ्यावा लागेल.

**ब) कलाकार कार्यक्रम :**

पुण्यतिथी उत्सव ३ दिवसाचा असल्याने किमान ३ कार्यक्रम आयोजित करावे लागतात. पुण्यतिथी उत्सव २०१४ चे उत्सवात कार्यक्रम मिळणेकामी खालीलप्रमाणे अर्ज आलेले आहे. त्यापैकी अ.नं.१ ते ४ यांनी विनामुल्य कार्यक्रम करण्याची मागणी केलेली आहे. अ.नं. ५ यांनी मानधनाचा उल्लेख केलेला नाही. अ.नं. ६ ते ९ यांनी मानधनाचा उल्लेख केलेला आहे.

३ दिवसाचे खालील नमूद केलेल्या ३ कलाकारांना कार्यक्रम देता येईल.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.सत्यनारायण नायर<br>(भजन आणि गजल गायक ) | भजन आणि गजल | | विनामुल्य |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एच.नं.०७, यशोदा विहार, चुना भट्टी, कोलार रोड, भोपाल. मो.नं.०९४२५०११३०७ | | | |
| २ | सौ.रागिणी जितेंद्र कामतीकर<br>२ पद्यविश्व गॅलेक्झी अपार्ट. रामेश्वर नगर, गंगापूररोड, नाशिक. मो.नं.९८२२६५५०४०, ९८८११०९५०४५ | गायन कार्यक्रम | | विनामुल्य |
| ३ | राजू पटनाला<br>श्री साई संतसंग, शिर्डी साई बाबा मंदिर फटाशील जी.एम.सी.न्यू कॉलनी गुवाहाटी, आसाम<br>मो.नं. ०९०८५८६११२० | नृत्य कार्यक्रम | | विनामुल्य |
| ४ | श्री.श्रावण माधव चौधरी<br>मु.पो.डोऱ्हाळे ता.राहाता, जि.अहमदनगर<br>मो.नं. ९६०४७९७१३८ | साईकथाअमृत | | विनामुल्य |
| ५ | श्री.अलोक मिश्रा<br>साई मंगल ,सोपान ,ए-७० ,न्यू अशोकनगर, दिल्ली -९६ ,मो.नं.९८११४९३२१ | साईभजन संध्या | | पत्रात मानधनाचा उल्लेख नाही. |
| ६ | लोककलावंत प्रविण सुर्यवंशी<br>१३००, कसबा पेठ, पवळे चौक,<br>प्रथमेश हाईटस् , पुणे ११.<br>मो.नं. ९८२२६४६८६९ | लोककला महाराष्ट्राची | २५ | मानधन २०,०००/- प्रवास भाडे |
| ७ | पं.कैलास हरेकृष्णा दास<br>७९, प्रशांतनगर, हनुमान मंदिराजवळ, कटोल रोड, नागपूर. मो.नं.०९८२३ | मधुर भक्तीमय साई संध्या कार्यक्रम | | ५१०००/- हजार रुपये किंवा संस्थान देईल जे ते ही मान्य राहील. |
| ८ | जे.जगन मोहन राव,<br>डि.नं. ४/३४८, राजूपेठ मछलीपटम्<br>मो.नं.९३४६४७०७८७ | श्री रामकृष्ण नाटय (तलगु भाषा) | | १५०००/- |
| ९ | जी.व्ही.व्ही.सत्यनारायणा<br>जनरल सेक्रेटरी , कला सागर, हैद्राबाद.<br>मो.नं. ९४४००६४८८२ | श्री शिर्डी साई लिला नाटक, (तेलगु भाषा) | | ५००००/- |

अ.नं.३ चा कार्यक्रम श्री रामनवमी उत्सव २०१४ मध्ये झालेला आहे. अ.नं.७ चा कार्यक्रम श्री रामनवमी उत्सव २०१३ मध्ये झालेला आहे .

उपरोक्त श्री पुण्यतिथी २०१४ चे उत्सव ३ दिवसाचे कालावधीसाठी कलाकार व त्यांचे देय मानधन प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७५५ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या वर्षातील तीनही उत्सवांकरिता किर्तनकारांचे पॅनल तयार करणेत यावे. त्यामध्ये श्री रामनवमी उत्सवाकरिता सालाबादप्रमाणे श्रीमद सद्‌गुरु श्री.दासगणु महाराज प्रतिष्ठाण, गोरटे, ता.उमरी, जि.नांदेड यांचे प्रतिनिधी यांना, श्री गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता ह.भ.प. माधवराव तुकारामपंत आजेगावकर यांना तसेच ह.भ.प. गंगाधर नरहर व्यासबुवा अथवा ह.भ.प. मंदार गंगाधर व्यास यांना श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करिता कायमस्वरुपी पॅनलवर ठेवण्यात यावे. श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करिता जर दोन्हीही किर्तनकार उपलब्ध नसतील तर ज्या किर्तनकारांचे अर्ज येतील त्यामधील किर्तनकाराची निवड करणेत यावी.**

**सध्या श्री पुण्यतिथी उत्सव- २०१४ निमित्त किर्तन कार्यक्रमासाठी कीर्तन केसरी ह.भ.प.श्री.मनोहरबुवा बा.दीक्षित यांचा एकमेव अर्ज प्राप्त झालेला असल्यामुळे ०३ दिवसाचे**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**कालावधीमध्ये किर्तनकार म्हणून कीर्तन केसरी ह.भ.प.श्री.मनोहरबुवा बा.दीक्षित यांना निमंत्रित करणेत यावे व त्यांना रु.९००१/- मात्र बिदागी देण्यात यावी.**

**कलाकारांचे संदर्भात अ.नं.०१ श्री.सत्यनारायण नायर व अ.नं.०२ सौ.रागिणी कामतीकर यांनी विनामुल्य आपले कार्यक्रम सादर करण्याची इच्छा व्यक्त केलेली असल्याने व अ.नं.४ श्री.श्रावण माधव चौधरी हेही विनामुल्य कार्यक्रम सादर करण्याची इच्छा व्यक्त करत असून ते स्थानिक कलाकार असल्याने या तीन कलाकरांना कार्यक्रम सादर करण्यास परवानगी देण्यात आली.**

**तसेच यापुढे कलाकारांचे बाबतीत, उत्सवाचे अगोदर अशा प्रकारच्या सेवेची जाहीरात विविध माध्यमाद्वारे प्रसिध्द करणेत येऊन, विनामुल्य कार्यक्रम सेवा सादर करण्यास तयार आहात काय अशा विचारणेसह आपणास किती वेळ उपलब्ध करुन पाहिजे याविषयी अर्जाद्वारे माहिती कलाकारांकडून घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.१३** **ॲड. बाळासाहेब ऊर्फ रावसाहेब शंकरराव जपे, रा.कोपरगाव यांनी त्यांचा मुलगा प्रितम जपे याच्या वैद्यकिय शिक्षणास आर्थिक मदत मिळणेकरीता सन- १९९८-९९ मध्ये सादर केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याबाबत तक्रार.**

**प्रस्ताव-** सन १९९८-९९ मध्ये मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने उच्च शिक्षणासाठी (वैद्यकीय, इंजिनिरींग, व्यावसायिक) स्क्रुटीनी फॉर्म तयार करण्यात आलेला होता. सदरच्या फॉर्ममध्ये पालकाच्या उत्पन्नाची मर्यादा रु. ९०,०००/- (नव्वद हजार) पर्यंत असावी व उत्पन्नाचा दाखला मा.तहसिलदार यांचा असावा असे निकष होते. ॲड. बाळासाहेब ऊर्फ रावसाहेब शंकरराव जपे यांनी स्क्रुटीनी फॉर्म प्रमाणे मा.तहसिलदार कोपरगांव यांचा सन १९९८-९९ चा रु.६०,०००/- (साठ हजार) उत्पन्नाचा दाखला व इतर सर्व कागदपत्रे सादर केलेले असल्याने त्यांना दि.३१.०५.१९९९ रोजी मुलाच्या शिक्षणासाठी रु.८३,७६३/- शैक्षणिक मदतीचा धनादेश देण्यात आलेला होता.

संस्थानने ॲड.जपे यांना जा.नं.एसएसएस,वशी-३/६३२५/९९, दि.१९.०७.१९९९ चे पत्राने, "आपण इनकम टॅक्स भरता का? आपल्याकडे टी.व्ही., रेफ्रिजेटर, ए.सी.मशीन, वाशिंग मशीन, या वस्तु आहेत काय? तसेच वहान, घर व जमीन आहे काय? याबाबत विचारणा केली होती. त्यास अनुसरुन ॲड. जपे यांनी त्याचे दि.२७.०७.१९९९ चे पत्राने कळविले आहे की, संस्थानचे ट्रस्टी यांनी घेतलेला निर्णय, कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेला निर्णय व तहसीलदार यांनी दिलेला दाखला सत्य आहे किंवा दुरान्वये तक्रार करणारा सत्य आहे. संस्थानने पत्रात विचारलेल्या बाबींवरुन उत्पन्नाचे मुल्यांकन करता येणार नाही. माझ्याकडे एक फोन आहे. घर व एक मारुती कार आहे त्यासाठी बँकेचे कर्ज घेतलेले आहे. त्याच्या पुराव्यादाखल गौतम बँक व बँक ऑफ इंडिया कोपरगांव यांचे पत्र जोडलेले आहे. तसेच शेती व वकीलीच्या उत्पन्नाचा उत्पन्नाच्या दाखल्यामध्ये समावेश केलेला आहे." असे कळविले आहे.

त्यानंतर संस्थानने जा.नं.एसएसएस, वशी-३/७०७५/९९, दि.०५.०८.१९९९ अन्वये, ॲड जपे यांना पत्र देऊन, "आपणास दिलेल्या दि.१९.०७.१९९९ चे पत्रोत्तरातील माहिती व तपशील ध्यानात घेता प्रथम दर्शनी अस स्पष्ट निष्कर्ष निघतो की, आपले वार्षिक उत्पन्न रु.९० हजारापेक्षा खचितच जास्त आहे. परिणामतः आपले मुलाला संस्थानने मंजुर केलेल्या संदर्भाधिन मदतीची रक्कम देय्यच नव्हती. म्हणुन हे पत्र मिळाल्यापासून तीन दिवसाच्या आत आपण संपुर्ण रक्कम संस्थाननला परत करावी, आपण वेळीच सदरची रक्कम जमा न केल्यास आपण सादर केलेल्या वार्षिक उत्पन्नासंबंधीचे तहसीलदार कोपरगांव यांचेकडील प्रमाणपत्राबाबत सखोल चौकशी व पडताळणी करणे आणि आपणकडून सदर रक्कम वसूल करण्यासाठी योग्य ती पूढील सर्वतोपरी कार्यवाही करणे शिवाय दुसरा पर्याय उरणार नाही, याची जबाबदारी/परिणाम सर्वस्वी आपलेवर राहतील, असे कळविले होते.

ॲड.जपे यांनी मुलाच्या शिक्षणासाठी घेतलेली रक्कम तीन दिवसाच्या आत जमा केलेली नाही. संस्थानने त्याबाबत ॲड.जपे यांचेवर पुढील कोणतीही कार्यवाही केली नाही. ॲड. जपे यांनी १४ वर्षानंतर दि.२१.०२.२०१४ रोजी सदरची रक्कम रु.८३,७६७/- संस्थानचे एज्युकेशन फंडामध्ये भरलेले आहेत.

अर्जदार यांची मागणी:- सौ.सुलोचना कोल्हे, रा.कोपरगांव यांनी दि.१८.११.२०१३ पासुन माहीती अधिकार अधिनियम २००५ अन्वये वेगवेळया ७ अर्जाने "ॲड.जपे रा.कोपरगांव यांच्या मुलाला सन १९९९ मध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी रु.८३,७६७/- दिलेल्या आर्थिक मदतीबाबतच्या कागदपत्रांची मागणी केली होती. सौ.कोल्हे यांना मुदतीत मागणी केलेले (संस्थानकडे उपलब्ध असलेले) कागदपत्रे दिलेले आहेत.

आता सौ.कोल्हे यांनी दि.१९.०५.२०१४, दि.२५.०६.२०१४, १०.०८.२०१४ व दि.१९.०८.२०१४ चे तक्रार अर्जाने ॲड.जपे यांनी उत्पनाची खोटी माहिती देऊन मा.तहसीलदार कोपरगांव यांचा उत्पन्नाचा दाखला

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



घेऊन, मुलागा प्रितम जपे याच्या शिक्षणासाठी घेतलेली रक्कम तीन दिवसात जमा करणेसाठी संस्थानने दि.०५.०८.१९९९ रोजी कळवुनही सदरची रक्कम तीन दिवसात जमा न करता, ती रक्कम १४ वर्षानंतर दि.२१.०२.२१४ रोजी जमा केलेली आहे.

सौ.कोल्हे यांनी वरील तक्रारीमधुन खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

१) ॲड.जपे यांना संस्थानने दि.०५.०८.१९९९ रोजी पत्र देऊन, मुलाच्या शिक्षणासाठी घेतलेली संपुर्ण रक्कम तीन दिवसात सस्थानला जमा केलेली नाही. त्यामुळे संस्थानने ॲड.जपे यांचेवर पुढील कार्यवाही का केली नाही. याबाबतची माहिती मागितली आहे.

२) ॲड. जपे यांनी संस्थानची आर्थिक फसवणुक केलेली असल्याने त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करणे.

विभागाचा अभिप्रायः- ॲड. जपे यांच्या फाईलचे व तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे निष्कर्ष निघतो.

१) ॲ.जपे यांनी शैक्षणिक मदतीकरीता संस्थानने तयार केलेल्या स्क्रुटीनी फॉर्मप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांना शैक्षणिक मदत मंजुर करण्यात आलेली होती.

२) उत्पन्नाचा दाखला देण्याचे अधिकार शासनाने मा.तहसिलदार यांना प्रदान केलेले असल्यामुळे, उत्पन्नाच्या दाखल्याबाबत संस्थानला चौकशी अथवा पडताळणी करता येणार नाही.

३) दिनांक ०५.०८.१९९९ चे पत्रानुसार ॲड.जपे यांनी शिक्षणासाठी घेतलेली रक्कम तीन दिवसात रक्कम जमा केली नाही म्हणुन, ॲड. जपे यांचेवर पुढे करण्यात येणारी कार्यवाही का थांबविली, याबाबतचे पेपर सदरच्या फाईलला नसल्यामुळे कार्यवाही थांबविण्याच्या कारणाची माहिती होत नाही. (तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी व मा.प्रशासकीय अधिकारी आज संस्थान सेवेत नाही. त्यामुळे कार्यवाही थांबविण्याचे कारण माहीत होत नाही.)

४) ॲड.जपे यांचे घरातील वस्तु व स्थावर मालमत्ते संबंधी संस्थानने दि.०५.०८.१९९९ रोजी दिलेल्या पत्रोत्तरात ॲड.जपे यांचेकडे एक फोन असून बँकेचे कर्ज घेऊन घर बांधलेले आहे तसेच बँकेचे कर्ज घेऊन एक मारुती कार घेतलेली आहे. त्याच्या पुराव्यादाखल गौतम बॅक व बँक ऑफ इंडिया यांचे पत्र जोडलेले आहे.

५) सौ.कोल्हे यांच्या दि.१९.०५.२०१४ च्या तक्रार अर्जानुसार, संस्थानला ॲड जपे यांची C.I.D. किंवा त्याप्रकारची चौकशी करता येत नसल्याची दि.०४.०७.२०१४ रोजीची मा. अध्यक्ष महोदय यांची स्वाक्षरी असलेल्या टिपणी प्रत सौ.कोल्हे यांना दिलेली आहे.

६) सौ. कोल्हे यांनी दि.१९.०८.२०१४ च्या तक्रार अर्जात असेही नमुद केलेले आहे की, ॲड.जपे यांनी माझ्या शेजारी नियमबाहय बांधकाम सुरु केलेले असल्यामुळे मला नैसर्गिक हवा, पाणी, संरक्षण हे स्वातंत्र्य धोक्यात आलेले आहे.

अ) उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता संस्थानला ॲड.जपे यांचेवर कोणत्याही प्रकारची कायदेशिर कार्यवाही करता येणार नाही, असे सौ.कोल्हे यांना कळविता येईल.

किंवा

ब) उपरोक्त विषयी निर्णय घेण्याचा अधिकार मा.व्यवस्थापन समितीला असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.७५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड. बाळासाहेब ऊर्फ रावसाहेब शंकरराव जपे, रा.कोपरगाव यांचेवर उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करण्याचा अधिकार समितीला नाही, अर्जदाराने याबाबत योग्य त्या ठिकाणी दाद मागावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

**विषय नं.१४ अग्नीशामक वाहनाची बॉडीबांधणीचे काम देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडील दि.२१/०५/२०१४ रोजीचे टिपणीनुसार, संस्थानचे फायर विभागास अग्नीशमक वाहन (फोमटेंडर) घेणेस तसेच फोमटेंडर खरेदी बाबत आवश्यक त्या सर्व गोष्टीची पुर्तता वाहन विभागामार्फत करणेस मान्यता देणेत आलेली आहे. फोमटेंडर घेणेसाठी चेसी खरेदी करुन आपणास आवश्यक त्या सर्व उपकरणांसह बॉडीबांधणी करुन घ्यावी लागणार असलेने श्री साईबाबा संस्थान करीता अग्नीशामक वाहन खरेदी करावयाचे असलेबाबत साईभक्त श्री मिरपुरी यांना कळविले असता त्यांनी सदर वाहनाकरीता आवश्यक असलेली चेसी मे.लक्ष्मी इंटरनॅशनल, लॉस एंजेलिस, यु.एस.अे. या नांवे देणगी देत असलेबाबत दि.०३/०६/२०१४ चे पत्राने कळविले

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



होते. त्यानुसार दि.२३/०८/२०१४ रोजी आयशर कंपनीचे एक चेसी वाहन (मॉडेल-20.16CWC PS CR BSIII) संस्थानचे ताब्यात दिलेली असुन त्यांना दि.२६/०८/२०१४ रोजी सदर चेसी वाहनाची देणगी पावती दिलेली आहे.

सदर आयशर कंपनीचे चेसी वाहनावर अग्नीशमक वाहनाची (फोमटेंडर) बॉडीबांधणी बाबत देवी फायर सर्व्हीसेस, सोलापुरचे मालक श्री दिलीप राऊत यांना विचारणा केली असता, सदर चेसीवर अग्नीशामक वाहनाची (फोमटेंडर) बॉडीबांधणीचे काम देणगी स्वरुपात चेसी ताब्यात मिळालेपासुन ०४ महिण्यात वाहनाची बॉडीबांधणी करुन देण्यास तयार आहे. असे दि.०४/०९/२०१४ चे पत्राने कळविलेले आहे.

तरी देवी फायर सर्व्हिसेस, सोलापुरचे मालक, साईभक्त, श्री दिलीप राऊत यांचेकडून आयशर कंपनीचे चेसी वाहन (मॉडेल-20.16CWC PS CR BSIII) वाहनावर अग्नीशामक वाहन (फोमटेंडर) ची बॉडीबांधणीचे काम देणगी स्वरुपात करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मंजुरीसाठी सादर.

**निर्णय क्र.७५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.दिलीप राऊत, सोलापुर हे अग्नीशामक वाहनाची बॉडीबांधणीचे, शासकीय दराने रु.१९,६०,०००/- मात्र किमतीचे काम देणगी स्वरुपात करुन देणार आहेत. त्यांचेकडून सदरहू काम देणगीदाखल करुन घेण्यात यावे व आयशर कंपनीचे चेसी वाहन (मॉडेल-२०.१६CWC PS CR BS-III) तात्काळ त्यांचेकडे पाठविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख/ फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५ मंदिर परिसरातील सुरक्षा यंत्रणेसाठी बसविण्यात आलेल्या बॅगेजेस स्कॅनरसाठी मे.व्हेन्टेज कंपनी यांचेमार्फत ऑपरेटर घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने साईभक्ताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अद्यावत स्वरुपाची सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत केली आहे. त्यामध्ये संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस सीसीटीव्ही कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व दर्शन रांगेतील साईभक्तांकडे असलेल्या बॅगा, पर्स चेक करण्यासाठी ०२ बॅगेजेस स्कॅनर मशीन, डिएफएमडी, एचएचएमडी, टर्न स्टाईल इत्यादी तांत्रिक साहित्य बसविण्यात आलेले आहे. सदर यंत्रणा संस्थानने ४.५ कोटी खर्च करुन विकसीत करण्यात आली आहे.

सदर ०२ बॅगेजेस स्कॅनर मशीन हे मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्यु.सोल्युशन प्रा.लि.,दिल्ली यांचेमार्फत दर्शन लाईनकडे बसविण्यात आले आहे. सदर बॅगेजेस स्कॅनरद्वारे दर्शन लाईनमधुन येणारे साईभक्तांच्या बॅगा, पर्स, पिशव्या इ. वस्तु चेक करणे व त्यात कोणतीही अपरिहार्य वस्तु सापडल्यास ते सुरक्षा कर्मचारी व सुपरवायझर यांना कळविण्यात येते. त्यासाठी संरक्षण विभागामार्फत कंत्राटी सुरक्षा कर्मचारी नेमण्यात आलेले आहे. परंतु ते पुर्णवेळ बॅगेजेस स्कॅनरसाठी न वापरता, दर्शन हॉलमधील गर्दीवर नियंत्रण ठेवणेचे काम पाहत असतो, असे निदर्शनास आले आहे. बॅगेजेस स्कॅनर मशीन कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांकडुन योग्यरित्या वापर होत नसल्याचे, त्याचे पुरवठाधारक मे.व्हेन्टेज कंपनी यांच्या तक्रारी आहे.

तसेच सुरक्षा यंत्रणेचे ऑडीटचे कामकाज पहाणारे श्री ढगे, कंन्सलटंट यांना देण्यात आलेले होते. बॅगेजेस स्कॅनर सुरक्षा रक्षकामार्फत न वापरता तांत्रिक ज्ञान असलेले कर्मचारी वापरणेबाबत अहवाल कळविलेला आहे. त्यानुसार, मे.व्हेन्टेज यांचा सदर कामकाजासाठी प्रस्ताव मागितला असता त्यांनी एका ऑपरेटरसाठी एकत्रित रक्कम रु.१०,०००/- + Tax प्रतिमहा इतका खर्च कळविलेला आहे. तरी प्राथमिक स्वरुपात, त्यांचे मार्फत एका बॅगेजेस स्कॅनरसाठी तीन ऑपरेटर (दोन श्फ्टसाठी दोन व जनरल श्फ्टमध्ये एक) पुढील दोन वर्षाकरीता घेण्यात यावा असे नम्र मत आहे. तसेच भविष्यात त्यांची सेवा पाहुन, दुस-या बॅगेजेस स्कॅनर मशीनसाठी यथा-अवकाश निर्णय घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे एका बॅगेजेस स्कॅनरसाठी मे. व्हेन्टेज कंपनी यांचेमार्फत ०३ ऑपरेटर घेणेस व त्यासाठी येणारे खर्चाचे मान्यतेसाठी सदरचा विषय मा. त्रिसदरस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील सुरक्षा यंत्रणेसाठी बसविण्यात आलेल्या बॅगेजेस स्कॅनर ऑपरेट करणेसाठी ०३ तांत्रिक कुशल कर्मचारी, सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही सेल प्रमुख/ कामगार विभाग)

---

**विषय नं.१६ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम.चे जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी दि. १३/०८/२०१४ रोजीचे पत्राने ए.टी.एम. साठी संस्थाचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागेस दि.२८/०७/२०१४ पासून पुढे मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियास मा. त्रिसदस्य समितीचे दि.०४/११/२०१३ चे सभेत विषय नं. ११ निर्णय क्र. ८८४ अन्वये रोजीचे निर्णयास अनुसरुन मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३६८६/२०१४ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. ०२/०५/२०१४ रोजी खालील प्रमाणे आदेश केलेला आहे.

"By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions."

उपरोक्त आदेशास अनुसरुन स्टेट बँक ऑफ इंडियास ए.टी.एम. जागेसाठी जा.क्र. एसएसएस वशी-विधी/ ८१२/२०१४ दि. १५/०५/२०१४ चे आदेशाने दि. २८/०७/२०१३ ते दि. २७/०७/२०१४ अखेर एक वर्षाचे कालवधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. सदरची मुदत दि. २७/०७/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे, त्याबाबतचा करारनामा करण्यात आलेला आहे. आता स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी ए.टी.एम. साठी साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागेस दि.२८/०७/२०१४ पासून पुढे मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

**संस्थान अधिनियम २००४: -** कलम १७ (३) नुसार विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही, अशा आशयाचा आहे.

**मा.उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे निर्देश:-** ६ **(अ)** मध्ये- shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.२-trust ; असा असून त्यात संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये.

**(ब)** मध्ये- shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.२ - Trust; असा असून त्यात संस्थान मार्फत कोणत्याही प्रकारचे अचल मालमत्तेच्या खरेदीचे कॉंट्रॅक्ट किंवा करारनामे करु नये, असा आदेश झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त संस्थान अधिनियम व मा. उच्च न्यायालयाचे दि. ०२/०५/२०१४ रोजीचे आदेशाचा विचार करता, स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागा ए.टी.एम. साठी दि.२८/०७/२०१४ पासून पुढे एक वर्षासाठी दि. २७/०७/२०१५ अखेर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु. ३,९६० + रु. ३९६/- (१०%) = ४,३५६/- (अक्षरी रु. चार हजार तीनशे छप्पन मात्र) आकारण्यात येवून व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देता येईल निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१७** **श्री साईनाथ रुग्णालयातील ENT Micro Motor Unit चे दुरुस्तीबाबत, मे.ट्रेक मेडिकल प्रॉडक्ट, मुंबई यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये व संदर्भीय पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालयाचे कान,नाक,घसा शस्त्रक्रिया विभागाकरीता Richard Wolf Micromotor Set- ०१ एकुण रुपये ७,८५,५२६/- इतक्या रकमेत मे.एस बी डायनामेड प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणेत आले होते. सध्या उपरोक्त सेटमधील हॅन्डपीस व मोटार दुरुस्ती करीता मे.ड्रेक मेडिकल प्रॉडक्ट, मुंबई या अधिकृत सर्व्हिस डीलर यांचेकडे पाठविण्यात आले होते. सदर कंपणीने हॅन्डपीस व मोटार दुरुस्ती करीता तीन वेगवेळया प्रकारचे कोटेशन पाठवुन विहित पध्दतीने मंजुरी घेऊन त्यातील रक्कम रुपये १,१२,३१३/- मात्रचे कोटेशन ऑर्डर नुसार सेटमधील हॅंन्डपीस व मोटार दुरुस्तीकामी त्यांना आगाऊ रक्कम रु. १,१२,३१३/- मात्रचा धनादेश त्यांना देणेत आला होता. परंतु कंपनीने सेटमधील हॅंन्डपीस व मोटार दुरुस्ती करुन देणेऐवजी त्यांनी पर्यायी मायक्रोमीटर सध्या वापराकरीता दिलेली आहे.परंतु ई-एन.टी.सर्जन यांनी सदर मायक्रोमोटर अती गरम (overheated) होत असल्याने त्याव्दारे शस्त्रक्रिया करता येत नाहीत. म्हणुन शस्त्रक्रिया बंद ठेवल्या आहे.असे उपरोक्त दि.२६/०६/२०१४ व दि.१५/०७/२०१४ चे टिपणीने कळविले आहे. तसेच सदर कंपनी विरुध्द् कायदेशिर कार्यवाही करावी असे ही कळविलेले आहे.

मे.ड्रेक मेडिकल प्रॉडक्ट, मुंबई, या कंपनीस याबाबत वारंवार सेटमधील हॅंन्डपीस व मोटार दुरुस्ती करुन मिळणेकामी वेळोवेळी टेलिफोन व्दारे व, १)No.SSS/SSH/BME/WS-६१४१/२०१४,Date-०१/०१/२०१४,२) No.SSS/SSH/BME/WS-७२२७/२०१४, Date-१२/०२/२०१४,३) No.SSS/ SSH/ BME/ WS-७७३५/२०१४, Date-१०/०३/२०१४,४)No.SSS/SSH/BME/WS-१४४१/ २०१४, Date- ०८/०७/२०१४ रोजीचे पत्राव्दारे पाठपुरावा केला असता कंपनीने अद्याप पावेतो हॅंन्डपीस व मोटार दुरुस्ती करुन दिलेली नाही व त्याबाबत कोणताही प्रतीसाद दिलेला नाही.

तरी सदर कंपनी मे.ड्रेक मेडिकल प्रॉडक्ट, मुंबई यांचे विरुध्द् कायदेशिर कार्यवाही करणेचे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.७६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संबंधित कंपनीला कायदेशीर नोटीस देण्यात यावी. या नोटीसचा मसुदा मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडून मान्य करुन घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१८** **भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

भांडार विभागाचे रोलींग शटर हे ब-याच वेळेस खराब झाल्याने वेळोवेळी दुरुस्त केलेले आहे. पुन्हा खराब झाल्यास दुरुस्ती करणेस अडचणी येऊ नये म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन शटर तयार करुन बसविणे गरजेचे असल्याने भांडार विभागाने मागणी केलेली आहेत. सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून टेंडर मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे. याकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१). | रोलींग शटर, ( गेअरसहित) साईज :- १३' X १३' | १६९ स्क्वेअर फुट | रु. ३००/- (प्रति स्क्वेअर फुट) | रु. ५०,७००/- |
| | | | **एकुण :-** | **रु. ५०,७००.००** |

उपरोक्तप्रमाणे भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५०,७००/- इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेसाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन टेंडर मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५०,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **श्री साईप्रसादालय एच.टी. कन्झ्युमर नं.१६५१८९००६५४० चा विद्युतभार वाढवून घेणेकरीता महाराष्ट्र राज्य बील वितरण कंपनीकडे विद्युत चार्जेस भरणे व करंट ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेकामी प्रस्ताव मान्यतेसाठी फेर सादर.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. या वीजपुरवठयाकरीता ४५० KW (४५० KVA) इतका वीजभार मंजूर आहे.

परंतू आता त्याठिकाणी साईटेक प्रोजेक्ट मशिनरी, R.O.Plant मशिनरी तसेच श्री साई प्रसादालयामधील चपाती तयार करण्याच्या मशिनरी इ.मशिनरींमध्ये वाढ झालेली असल्याने तसेच दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत असल्याने मशिनरी सतत कार्यान्वित असतात. या कारणाने प्रसादालयाचा एकुण वीजभार हा ४५० KW (४५० KVA) वरुन ५५० KW (५५०KVA) च्या आसपास गेलेला आहे. सदरील ठिकाणच्या वीज जोडणीचा वीजभार वाढवून घेणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने संस्थानला पत्र क्र.SE/ANRC/TECH/१५९३६ दि.२७-०८-२०१३ चे पत्रान्वये कळविलेले आहे.

म.रा.वि.वि.कंपनीने पत्र क्र.SE/ANRC/TECH/०९४७८ दि.१०-०६-२०१४ नुसार वाढीव विद्युत भारापोटी सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम व इतर चार्जेस भरणेविषयी कळविलेले आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Description | Amount |
|---|---|---|
| A | 1.3 Supervision Charges | 1,834.00 |
| B | S.C. Charges | 290.00 |
| C | Additional Security Deposit | 10,46,085.00 |
| D | Cost of Agreement | 400.00 |
| E | Applications & Registration Fee | 1,700.00 |
| | **Total Amount :-** | **10,50,309.00** |

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रु.१०,५०,३०९/- इतकी रक्कम भरावी लागणार आहे.

सबस्टेशनचा इलेक्ट्रीकल लोड वाढल्यामुळे सध्याच्या असलेल्या २५ / ५A च्या C.T. काढून त्याठिकाणी नविन जादा क्षमतेच्या (५०/ ५A) च्या C.T. बसविणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने कळविलेले असल्याने आपणास नविन ५० / ५ A C.T. खरेदी करुन बसवाव्या लागणार आहेत. नविन C.T. बसविणेच्या कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Supplying, erecting, testing commissioning 11 KV H.T.3 CTS having C.T. ratio 50/5 Amp and tated output 10 VA for existing Metering Cubical (Without Meter) approved by MSEDCL | 03 | 17500/- | 52,500/- |
| 02) | Sundries Suchas Cable Trench, LA, Nutbolts, Washers, Jumper & Minor Fabrication | LS | 8000/- | 8,000/- |
| | | | Total Rs. | 60,500/- |

नविन जादा क्षमतेच्या (५० / ५ A) C.T. बसविणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अंदाजपत्रकानुसार एकुण खर्च अंदाजे रक्कम रुपये ६०,५००/- इतका खर्च येणार आहे. सदरील C.T. विद्युत ठेकेदार / उत्पादक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसवाव्या लागणार आहेत.

तरी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रुपये १०,५०,३०९/- इतकी रक्कम सिक्युरिटी डिपॉझिट व इतर चार्जेस भरणे व नविन वाढीव क्षमतेच्या (५० / ५ A) C.T. विद्युत ठेकेदार / उत्पादक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसविणेकामी येणा-या रक्कम रुपये ६०,५००/- मात्र खर्चास असे दोन्ही मिळून एकुण रु.११,१०,८०९/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेकामी उपरोक्त प्रस्ताव दि.१७.०७.२०१४ चे व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र २२ अन्वये सादर करण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.५८६ अन्वये सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन, नवीन सुधारीत प्रस्ताव तयार करणेत यावा, असे ठरले.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानुसार श्री साई प्रसादालय एच.टी.कन्झ्युमर नं.१६५१८९००६५४० संदर्भात दि.११.०७.२०१४ रोजी मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, अहमदनगर यांचे कार्यालयात समक्ष जाऊन अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट व इतर चार्जेस कमी करणेकामी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की सिक्युरीटी डिपॉझिटची रक्कम ही म.रा.वि.वितरण कंपनीच्या नियमानुसार असून ती कमी होऊ शकत नाही. संस्थानला आम्ही कळविलेली रक्कम भरावीच लागेल सदर रक्कम दिलेल्या मुदतीत भरली नाही तर सदर ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडीत होईल असे सांगितले. तरी श्री साईप्रसादालय येथील वीजपुरवठा खंडीत होऊ नये म्हणून तातडीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रुपये १०,५०,३०९/- इतकी रक्कम सिक्युरिटी डिपॉझिट व इतर चार्जेस भरणे व नविन वाढीव क्षमतेच्या (५० / ५ A) C.T. विद्युत ठेकेदार/ उत्पादक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसविणेकामी येणा-या रक्कम रुपये ६०,५००/- मात्र खर्चास असे दोन्ही मिळून एकुण रु.११,१०,८०९/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव फेर सादर करीत आहोत त्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू रक्कम अनामत म्हणून भरावयाची असल्याने, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **द्वारावती भक्तनिवास इमारती समोरील रोडचे पूर्व-पश्चिम बाजूस लोखंडी गेट बसविणे व पूर्व बाजूचे वॉल कम्पाऊंडवर (नांदूखी रोड) लोखंडी जाळी बसविणे तसेच समोरील दर्शन बाजूस लोखंडी जाळीचे वॉल कंपाऊंड करणे व साईभक्तांच्या गाडया पार्कीगसाठी इन व आऊट गेट तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

०१).व्दारावती भक्तनिवास इमारती समोरील रोडचे पूर्व-पश्चिम बाजूस लोखंडी गेट जाळी तयार करुन बसविणे. ०२).व्दारावती भक्तनिवास इमारतीचे पूर्व बाजूचे वॉल कंपाऊंडवर (नांदुर्खी रोड) लोखंडी जाळी तयार करुन बसविणे तसेच ०३).व्दारावती भक्तनिवास इमारतीचे समोरील दर्शन बाजूस लोखंडी जाळीचे वॉल कंपाऊंड करुन बसविणेकामी व्दारावती भक्तनिवास विभागाने मागणी केलेली आहेत. सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून टेंडर मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे. याकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१). | एम.एस.अँगल, साईजः- ३५ X ३५ X ५ एम.एम. | २५७४किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. २,०५,९२०.०० |
| ०२). | एम.एस.अँगल, साईजः- २५ X २५ X ५ एम.एम. | ७५० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,६०,०००.०० |
| ०३). | एम.एस.अँगल, साईजः- ४० X ४० X ५ एम.एम. | ५५० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,४४,०००.०० |
| ०४). | एम.एस.अँगल, साईजः- ४० X ४० X ६ एम.एम. | ३७० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,२९,६००.०० |
| ०५). | एम.एस.स्क्वेअर जाळी, साईज :- २५ X २५ X ४ एम.एम. (४' उंचीची) | ४५० र.फूट | रु.२१०/- (प्रति र.फू) | रु. ०,९४,५००.०० |
| ०६). | एम.एस.स्क्वेअर बार, साईजः- १० एम.एम. | ३९३५किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ३,१४,८००.०० |
| ०७). | एम.एस.राऊंड पाईप, साईजः- ५० X ३ एम.एम. | ५४० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,४३,२००.०० |
| ०८). | एम.एस.राऊंड पाईप, साईजः- २५ X ३ एम.एम. | २० किलो | रु.८५/- (प्रति किलो) | रु. ०,०१,७००.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९). | एम.एस.राऊंड टिकली, साईज:- ५० X ३ एम.एम. | १५ किलो. | रु.१२०/- (प्रति किलो) | रु. ०,०१,८००.०० |
| १०). | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईज:- २५ X ५ एम.एम. | ७४ किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,०५,९२०.०० |
| ११). | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईज:- ३० X ५ एम.एम. | ८० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,०६,४००.०० |
| १२). | एम.एस. स्क्वेअर पाईप, साईज:- ५०X५०X३ एम.एम. | ५५० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,४४,०००.०० |
| १३). | एम.एस. स्क्वेअर पाईप, साईज:- ३०X३०X३ एम.एम. | ५०० किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,४०,०००.०० |
| १४). | एम.एस.सी चॅनेल, साईज:- १००X ५० X ५ एम.एम. | ३२५ किलो. | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०,२६,०००.०० |
| १५). | एम.एस.शीट, साईज:- १६ गेज. | २०० किलो. | रु.९०/- (प्रति किलो) | रु. ०,१८,०००.०० |
| १६). | बेअरींग व्हील (व्ही आकार), साईज :- ५० एम.एम. | १२ नग. | रु.१५०/- (प्रति नग) | रु. ०,०१,८००.०० |
| १७). | बेअरींग व्हील, साईज:- २५ एम.एम. | ३० नग. | रु.५०/- (प्रति नग) | रु. ०,०१,५००.०० |
| १८). | एम.एस.बट बिजागरी, साईज:- ६'' हेवी | १४ नग | रु.१००/- (प्रति नग) | रु. ०,०१,४००.०० |
| १९). | स्टेनलेस स्टील ऑल्ड्रॉप, साईज:- १२'' हेवी | ०३ नग | रु.४००/- (प्रति नग) | रु. ०,०१,२००.०० |
| २०). | एशियन मेक कलर, स्मो ग्रे | ५० लि. | रु.३५०/- (प्रति लि.) | रु. ०,१७,५००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु.९,५९,२४०.००** |

उपरोक्तप्रमाणे ०१). व्दारावती भक्तनिवास इमारती समोरील रोडचे पूर्व-पश्चिम बाजूस लोखंडी गेट जाळी तयार करुन बसविणे. ०२). व्दारावती भक्तनिवास इमारतीचे पूर्व बाजूचे वॉल कंपाऊंडवर (नांदुर्खी रोड) लोखंडी जाळी तयार करुन बसविणे तसेच ०३). व्दारावती भक्तनिवास इमारतीचे समोरील दर्शन बाजूस लोखंडी जाळीचे वॉल कंपाऊंड करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ९,५९,२४०/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेली कामे करुन घेणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन टेंडर मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.९,५९,२४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **Flame Proof (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मंदिर परीसर, साईनगर, धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम, श्री साई प्रसादालय, साईआश्रम व कनकुरी साठवण तलाव याठिकाणी विद्युत पुरवठयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. या विद्युत पुरवठयाचे पर्यायी व्यवस्थेकरीता प्रत्येक ठिकाणी विविध क्षमतेचे एकुण १८ नग जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. या जनरेटरसेटचे डिझेल टॅंक मध्ये डिझेल भरणेकरीता इलेक्ट्रीकल मोटार पंपसेटचा वापर करावा लागतो. सध्या वापरात असलेले डिझेल मोटार पंपसेट हे साध्या पध्दतीचे पाणी भरण्याचे पंपसेट आहेत. त्यामुळे मोटार पंप सेट चालू असतांना काही कारणास्तव

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



इलेक्ट्रीक मोटार पंपसेटची वाईडींग जळाल्यास डिझेलमुळे आग लागून मोठया स्वरुपाची अपघाताची घटना घडू शकते. याकरीता सदरील इलेक्ट्रीक पंपसेट हे फ्लेम प्रुफ (आग प्रतिबंधक)असणे गरजेचे असल्याने सदरील कामी आपणास पुढीलप्रमाणे फ्लेम प्रुफ इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट खरेदी करुन बसवावे लागणार आहे.

| Sr.No | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Crompton Make, Flame Proof, Self Priming Pump 220 Volt, 1 Phase KW/HP=0.75/1.00 | 09 Nos. | Rs. 25,000/- | Rs. 2,25,000/- |
| | | | Total :- | Rs. 2,25,000/- |

उपरोक्त प्रमाणे सर्व जनरेटरसेट कक्षाचे फ्लेम प्रुफ (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल पम्प सेट खरेदी करुन बसविणेकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,२५,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे बेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Flame Proof (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट खरेदी करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन टेंडर मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **शैक्षणिक संकुल (आयटीआय, इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्याशाळा) परिसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधिल तरतूद क्र.२१-१(क) नुसार समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन संस्थानचे अंतर्गत दुरध्वनी व्यवस्थेकरीता मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे साईबाबा भक्तनिवासस्थान५०० रुम येथे सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली असुन या दुरध्वनी यंत्रणेतुन संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम इमारतीतील कार्यालयात व प्रत्येक मजल्यावर मदतनीस यांचे करीता तसेच शैक्षणिक संकुल (आयटीआय, कन्याशाळा, इंग्लिश मिडीयम स्कुल) तसेच अधिकारी व डॉक्टर्स स्टॉफ क्वॉर्टर्स इत्यादी ठिकाणी जवळपास १०० दुरध्वनी नंबर देण्यात आलेले आहेत.उपरोक्त ठिकाणी यापुर्वी कमी क्षमतेच्या दुरध्वनी केबल अंडरग्राउंड टाकलेल्या असुन साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम येथिन दुरध्वनी यंत्रणेतुन शैक्षणिक संकुल (आयटीआय, कन्या शाळा व इंग्लिशमिडीयम स्कुल) पर्यंत फक्त २० पेअरची दुरध्वनी केबलला एका ठिकाणी जॉईंट देवुन केबल अंडरग्राउंड टाकलेली आहे.त्या केबलवरुन उपरोक्त ठिकाणी १२ दुरध्वनी नंबर देण्यात आलेले आहेत. उपरोक्त संदर्भानुसार आयटीआय विभागानेसहा ठिकाणी दुरध्वनी नंबर चालु करुन देण्याची मागणी केलेली आहे. सदरचे फोन चालु करणेसाठी सदरची केबल चेक केली असता दुसरीकडील साईडला उर्वरीत आठ पेअरचे कनेक्शन मिळत नाही व काही नंबरवर खरखर आवाज येत आहे.त्यामुळे यापुर्वी टाकलेली जॉईंटची २० पेअरची दुरध्वनी केबल जॉईंटच्या ठिकाणी खराब झालेली आहे असे प्रत्यक्ष पडताळणी केली असता निदर्शनास येत आहे.तसेच आयटीआय विभागात सगळीकडे सिमेंटचे ब्लॉक बसविलेले असल्याने केबल जॉईंट कोणत्याठिकाणी आहे हेही समजत नाही.व तेथिल जमिनही खोदुन जुन्या केबलला जॉईंट देणे भविष्यात त्रासदायक ठरु शकते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



याकरीतासाईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम येथिन दुरध्वनी यंत्रणेपासुन(आयटीआय) वर्कशॉपचे दुरध्वनी जक्शंन बॉक्सपर्यंत ५० पेअरची नविनआरमड अखंडदुरध्वनी केबल अंडरग्राऊंड टाकल्यास आयटीआय विभागाचे मागणीप्रमाणे सहा ठिकाणी दुरध्वनी देता येणे शक्य होईल तसेच सध्याचे चालु असलेले १२ दुरध्वनी नंबर हेही नविन केबलवर टाकता येईल व भविष्यात शैक्षणिक संकुलाकडे नविन दुरध्वनी नंबर देण्याचे ठरल्यास ते देता येणे शक्य होईल.सदरील काम हे ठेकेदार यांचेकडुन कोटेशन मागवुन करुन घ्यावे लागणार आहे.त्याकरीता करावे लागणारे टेलीफोन कामाचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Sr.No | CSR.No | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-10-16 | Supplying & erecting Jelly filled armoured telephone cable 50 pair with 0.5 mm dia laid in provided trench as per specification No.WG-TW | 400 Mtr. | 362.25 | 1,44,900.00 |
| 02 | 1-11-16 | Supplying erecting & commissioning Junction Box suitable for 50 pair as per specification No.WG-TW | 01 Nos. | 1311.45 | 1311.45 |
| 03 | 1-11-31 | Supplying installing testing & commissioning approved type push button telephone instrument desk top/wall mount unit as per specification in approved manner. | 06 Nos. | 700.35 | 4202.10 |
| 04 | 16-1-2 | Making the trench in Hard Murum Tar road of suitable width and depth as per IS for laying provided telephone cable up to 10 sq mm complete.As per specification No.CA-EX-NC-TR | 300 Mtr. | 160.65 | 48,195.00 |
| 05 | 7-6-5 | Supplying & laying (including excavation) 15 cm dia RCC Hume Pipe with coupling collar of standard thickness at required depth up to 90 cm below road/ground surface, for enclosing provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet) | 100 Mtr. | 665.70 | 66,570.00 |
| | | | Total Amount | | 2,65,178.55 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी उपरोक्त प्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम येथिन दुरध्वनी यंत्रणेपासुन (आयटीआय) वर्कशॉपचे दुरध्वनी जक्शंन बॉक्सपर्यंत ५० पेअरची नविनआरमड अखंड दुरध्वनी केबल अंडरग्राऊंड टाकणेसाठी व सदरचे काम बाहेरील ठेकेदाराकडुन कोटेशनमागवुन करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २,६५,१७९/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करणेस मान्यता असावी. आदेशासाठी व मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.७६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू अंडरग्राऊण्ड केबल ही अंतर्गत दुरध्वनीची (Intercom) असल्यामुळे प्रस्तावित कामास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३ दि.२९.११.२०१४ ते दि.२८.११.२०१५ अखेर द्वारावती इमारतीमधील टिव्हींच्या टाटास्काय कनेक्शनची वार्षिक रिचार्ज फी भरणेकरीता मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती इमारतीत असलेल्या ८० व्हिआयपी रूम मध्ये उतरलेल्या साईभक्तांना टिव्हीवर बातम्या व इतर चॅनेल पाहता यावे यासाठी दि.०४/०७/२०१० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.५८१ नुसार ८० कनेक्शन घेणेसाठी डिश, शटल बॉक्स व इन्टॉलेशनसह रू.२,८१,६००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्याप्रमाणे द्वारावती ८० नग टाटास्काय शटल बॉक्स बसवून कनेक्शन दिल्याने, प्रत्येक वर्षी रिचार्ज फी भरावी लागते.

आता दि.२९/११/२०१४ ते दि.२८/११/२०१५ अखेर ८० रूमचे ८० कनेक्शन रिचार्ज करावयाचे आहेत. सध्या टाटास्काय कंपनीतर्फे धमाल क्रिकेट म्युझिक पॅक हे रू.२६०/- मात्रचे दर महिन्यास फी असलेले पॅकेज आहे. यामध्ये Regular Pack मध्ये ७२ चॅनेल व Regional Telugu Pack मध्ये १२ असे एकूण ८४ चॅनेल दिसतात.

याशिवाय एका वर्षाकरीता ११ महिन्यांची फी भरण्याची सवलत असून एकूण कनेक्शन पैकी प्रत्येकी ४ कनेक्शनचे एक ग्रुप आहेत. प्रथम कनेक्शनसाठी दरमहा रू.२६०/- मात्र व उर्वरित तीन कनेक्शनला दरमहा रू.२००/- मात्र भरण्याची कंपनीची सवलत आहे. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे १ वर्षाची फी होत आहे. ८० नग सेटअप बॉक्सचे २० ग्रुप आहेत. तसेच २० मुख्य कनेक्शन ६० उपकनेक्शन आहेत.

| अ.नं. | ग्रुप | दर | वार्षिक फी |
|---|---|---|---|
| ०१ | २० मुख्य कनेक्शन | प्रतिमाह रू.२६०/- X ११ महिने X २० कनेक्शन | ५७,२००/- |
| ०२ | ६० उप कनेक्शन | प्रतिमाह रू.२००/- X ११ महिने X ६० कनेक्शन | १,३२,०००/- |
| | | एकूण रूपये :- | १,८९,२००/- |

**विभागाचा अभिप्राय:-** वरीलप्रमाणे सन-२०१४ ते सन-२०१५ या वर्षाकरीता फी भरणे कामी आज रोजी रक्कम रूपये १,८९,२००/- मात्र इतका खर्च येत आहे. परंतू टाटास्काय रिचार्जचे हे दर आजचे असल्याने द्वारावतीची रिचार्ज तारीख नोव्हेंबर महिन्यात येत असल्याने कंपनीचे दर कमी-जास्त होऊ शकतात.

**मागणी:-** टाटास्काय रिचार्ज करण्याकरीता सन २०१४ ते सन २०१५ या वर्षासाठी फी भरणेकामी अंदाजे रक्कम रूपये २,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी दि.२९/११/२०१४ ते दि.२८/११/२०१४ अखेर टाटास्काय रिचार्ज करणेकरीता येणा-या अंदाजे रक्कम रूपये २,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख मात्र) रूपयेचे खर्चास मान्यता मिळणेस व विहीत पद्धतीने कोटेशन मागवून रिचार्ज करणेस सदरचा विषय मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे मंजुरीकरीता ठेवणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.२४** **संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी लावण्यात आलेल्या भाडोत्री टॅक्टर टँकर व ट्रक टँकरचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद**:- १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**प्रस्तावना:-** संस्थानचे सर्व विभागांना व परिसरातील संस्थान इमारतींना कनकुरी साठवण तलावातून पाणी पुरवठा करण्यात येतो. कनकुरी साठवण तलाव ते ओहर हेड टँक येथून साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), व्दारावती, श्री साईप्रसादालय इमारत, रुग्णालये, साईप्रसाद निवासस्थान, श्री साईप्रसाद भक्तनिवास इ. ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. मागील रोटेशन कालावधीत साठवण तलाव दि.०९ जून, २०१४ ते दि.१४ जून, २०१४ या कालावधीत पुर्ण क्षमतेने भरुन घेण्यात आला.

दि. २९ जुलै, २०१४ रोजी साठवण तलावातील पाणी संपल्याने तसेच साठवण तलावाचे बाजूचे खाजगी शेतक-यांचे विहीरींची पाण्याची पातळी कमी झाल्याने विहीरीव्दारे व सायफनव्दारे उपलब्ध होणारे पाणी कमी पडले. यामुळे संस्थान परिसरास पाणी उपलब्ध करुन देणेत मोठया प्रमाणावर अडचणी आल्या. साईभक्तांना तातडीने पाण्याची सोय करणे आवश्यक असल्यामुळे तातडीने टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे गरजेचे होते. त्यावेळी उपलब्ध झालेल्या टँकरधारकांशी प्रत्यक्ष चर्चा करुन खालीलप्रमाणे दर ठरविण्यात येवून पाणी पुरवठा तातडीने सुरु करण्यात आला.

| अं. नं. | तपशिल | टँकरची क्षमता लिटर्समध्ये | दर रुपये (प्रती खेप) |
|---|---|---|---|
| ०१ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रॅक्टर टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी पुरवठा करणे. | अंदाजे ६००० ते ८००० लिटर्स. | रु. ५००/- |
| ०२ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी पुरवठा करणे. | अंदाजे २०००० ते २२००० लिटर्स. | रु. ३०००/- |
| ०३ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी पुरवठा करणे. | अंदाजे १२००० ते १५००० लिटर्स. | रु. २०००/- |
| ०४ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी पुरवठा करणे. | अंदाजे १०००० ते १२००० लिटर्स. | रु. १०००/- |
| ०५ | संस्थानने शोधलेल्या/सुचविलेल्या पाणी स्त्रोतापासून स्व:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी | अंदाजे २०००० ते २२००० लिटर्स. | रु. २०००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| | पुरवठा करणे. | | |
| ०६ | संस्थानने शोधलेल्या/ सुचविलेल्या पाणी स्त्रोतापासून स्व:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी पुरवठा करणे. | अंदाजे १२००० ते १५००० लिटर्स. | रु. १२००/- |
| ०७ | स्वत:/ संस्थानने शोधलेल्या/सुचविलेल्या पाणी स्त्रोतापासून स्व:मालकीच्या ट्रक/ट्रॅक्टर टँकरव्दारे (फक्त इंधन खर्च संस्थान) वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणी पुरवठा करणे. | अंदाजे ६००० ते ८०००<br>अंदाजे १२००० ते १५००० लिटर्स. | प्रत्यक्ष इंधन खर्च येणारा |

**प्रस्ताव:-**

**अ)** वरीलप्रमाणे अं.नं. ०१ ते ०६ नुसार ठरविण्यात आलेल्या दरानुसार खालील टँकरधारकांनी दि. २९/०७/२०१४ ते दि. ०१/०८/२०१४ या कालावधीत संस्थानकरीता पाणीपुरवठा केला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अं.नं. | टँकरधारकाचे नांव | टँकर नंबर | क्षमता लिटर्समध्ये | एकुण ट्रिप | दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | माधव मोरे | MH04 BG1945 | २०००० ते २२००० | ०४ | ३०००.०० | १२,०००.०० |
| ०२ | श्रावण पारखे | MH17 T6986 | २०००० ते २२००० | ०५ | ३०००.०० | १५,०००.०० |
| ०३ | चंद्रकांत घोरपडे | MH17 K5344 | २०००० ते २२००० | ०५ | ३०००.०० | १५,०००.०० |
| ०४ | श्रावण पारखे | MH17 T6986 | २०००० ते २२००० | ०२ | २०००.०० | ४०००.०० |
| ०५ | सिताराम घोरपडे | MH17 T4751 | १२००० ते १५००० | ०७ | २०००.०० | १४,०००.०० |
| ०६ | गिताराम घोरपडे | MH18 M8369 | १२००० ते १५००० | ०७ | २०००.०० | १४,०००.०० |
| ०७ | गिताराम घोरपडे | MH18 M8369 | १२००० ते १५००० | ०२ | १२००.०० | २,४००.०० |
| ०८ | बापु कोळगे | MH17 T6429 | १२००० ते १५००० | ०७ | २०००.०० | १४,०००.०० |
| ०९ | सुनिल निर्मळ | MH39 AC432 | १२००० ते १५००० | ०८ | २०००.०० | १६,०००.०० |
| १० | संजय पारखे | MH17 A5717 | १०००० ते १२००० | ०८ | १०००.०० | ८,०००.०० |
| ११ | विजय तुरकणे | MH17 AE7263 | ६००० ते ८००० | १० | ५००.०० | ५,०००.०० |
| **एकुण रक्कम रुपये -** | | | | | | **१,१९,४००.००** |

**ब) तसेच,** वरीलप्रमाणे अं.नं. ७ नुसार ठरविण्यात आल्याप्रमाणे खालील टँकरधारकांनी दि. २९/०७/२०१४ दि.०१/०८/२०१४ या कालावधीत संस्थानकरीता पाणीपुरवठा केला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अं. नं. | टँकरधारकाचे नांव | टँकर नंबर | क्षमता लिटर्समध्ये | एकुण ट्रिप | दर रुपये | डिझेलसाठी मागणी केलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वाल्मिकराव कातकडे, कोपरगांव | MH 17 A 6048 / 6058 | १२००० ते १५००० | २२ | मोफत (डिझेल खर्च संस्थान) | ३५००.०० |
| ०२ | विजय सो. जगताप, शिर्डी. | | ६००० ते ८००० | १३ | मोफत (डिझेल खर्च संस्थान) | २,५००.०० |
| ०३ | अशोक शेज्वळ / दारासिंग माळी, शिर्डी | MH 17 AE 9335 | ६००० ते ८००० | ११ | मोफत (डिझेल खर्च संस्थान) | २,५००.०० |
| ०४ | सचिन साठे, को-हाळे | MH 04 BC 5170 | ६००० ते ८००० | २२ | मोफत (डिझेल खर्च संस्थान) | २,०००.०० |
| ०५ | तुषार गोंदकर, शिर्डी. | MH 17 AE 5581 | ६००० ते ८००० | १३ | मोफत (डिझेल खर्च संस्थान) | १,०००.०० |
| एकुण रक्कम रुपये - | | | | | | ११,५००.०० |

क) दि. २९/०७/२०१४ ते दि. ०१/०८/२०१४ या कालावधीत खालील टँकरधारकांनी संस्थानकरीता मोफत पाणीपुरवठा केला.

| अं.नं. | टँकरधारकाचे नांव | टँकर नंबर | क्षमता लिटर्समध्ये | एकुण ट्रिप | दर रुपये | डिझेलसाठी मागणी केलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सुरज नवनाथ चौधरी, | MH 17 AN 1872 | ६००० ते ८००० | ०६ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |
| ०२ | दत्तु झाकणे, | MH 17 AJ 628 | ६००० ते ८००० | ०५ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |
| ०३ | शिवाजी चौधरी, | MH 17 F 8815 | ६००० ते ८००० | ०२ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |
| ०४ | संदिप पाचोरे, | MH 20 AE 604 | ६००० ते ८००० | ०२ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |
| ०५ | सुभाष गोंदकर, | | ६००० ते ८००० | ०१ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |
| ०६ | दत्तु शिंदे, | MH 17 A 6048 | ६००० ते ८००० | ०१ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |
| ०७ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | MH 17 H 284/ MH 17 V 6421 | ६००० ते ८००० | १६ | मोफत (डिझेल खर्चासह) | ०.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



संस्थान परिसरास पाणीपुरवठा करणेकामी लावण्यात आलेल्या भाडोत्री ट्रॅक्टर टँकर व ट्रक टँकर करीता एकुण रु. १,१९,४०० मात्र तसेच मोफत उपलब्ध झालेल्या ट्रक/ट्रॅक्टर टँकरचे डिझेलकरीता एकुण रु. ११,५००/- मात्र असा एकुण रु. १,३०,९००/- मात्र खर्च आलेला आहे.

टँकरधारकांनी त्यांचे बीलाची रक्कम रोखीने मागणी केलेली असल्याने पाणी पुरवठा विभाग दि.२८/०७/२०१४ रोजीचे मंजुर टिपणीन्वये रु. २५,०००/- व दि. ०५/०८/२०१४ रोजीचे मंजुर टिपणीन्वये रु.१,०५,९००/- मात्र अॅडव्हान्स पाणी पुरवठा पर्यवेक्षक श्री भाऊसाहेब ता. तुरकणे यांचे नांवे घेण्यात आलेला आहे. सदरचे अॅडव्हान्स घेण्यात आलेल्या रकमेतून विकतचे टँकरधारकांचे बीलाची व मोफत उपलब्ध झालेल्या ट्रक/ट्रॅक्टर चे डिझेलकरीता त्यांनी मागणी केलेली रक्कम त्यांना रोखीने आदा करण्यात आलेली आहे. आदा करण्यात आलेल्या रकमेची व्हाऊचर तयार करण्यात आलेली असून ती सोबत जोडलेली आहेत.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** पाणी टंचाई कालावधीत साईभक्तांची पाण्याची गैरसोय होवू नये यासाठी तातडीने भाडोत्री टँकर लावून पाण्याची सोय करणे गरजचे असल्याने भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त पाणी टंचाई कालावधीत संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेकामी लावण्यात आलेल्या भाडोत्री ट्रॅक्टर टँकर व ट्रक टँकर करीता आलेल्या एकुण रुपये १,१९,४००/- मात्र तसेच मोफत उपलब्ध झालेल्या ट्रक/ट्रॅक्टर टँकरचे डिझेलकरीता एकुण रुपये ११,५००/- मात्र असा एकुण रुपये १,३०,९००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५ कुंडयामधील रोपे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागामार्फत संस्थान परीसर व ऑफीस तसेच वेळोवेळी कार्यक्रमासाठी व उत्सवा निमीत्ताने शोभेच्या कुंडया ठेवल्या जातात. उत्सव काळात साईभक्तांकडुन बऱ्याच कुंडयांच्या रोपाचे नुकसान होते.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/०६/२०१४ मधील निर्णय क्र.४१७ अन्वये कुंडयामध्ये लावण्यासाठी शोभेची रोपे विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. १,००,०००/- (रु. एक लाख) मात्र खर्चास मान्यता ही घेण्यात आलेली आहे. तसेच शोभेची रोपे खरेदी साईभक्ताकडुन देणगीदाखल मिळत नसल्याने संस्थानमार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन शोभेची रोपे खरेदी करता येईल. अंदाजे २५० रु. रोपाप्रमाणे ४०० नग झाडे घेता येईल प्रत्येक जातीची ३० ते ३५ रोपे ही खरेदी करता येईल.

कुंडयामधील शोभेच्या रोपे खरेदी करण्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र | रोपांचे नाव | रोपांची उंची | बॅग साईज |
|---|---|---|---|
| ०१ | बोगन वेल | २ फुट उंच (भरगच्च) | १२ x १२ |
| ०२ | सिंगापुरी चाफा | ३ फुट | १५ x १५ |
| ०३ | सायप्रस - २ | ४ फुट | १२ x १२ |
| ०४ | फायकस पंडा | ३ फुट | १३ x १३ |
| ०५ | फायकस स्टार | ३ फुट | १२ x १२ |
| ०६ | आरेका पॅाम | ४ फुट | १४ x १४ |
| ०७ | सायकस | २ फुट | १३ x १३ |
| ०८ | टेबलपाम | ३ फुट | १३ x १३ |
| ०९ | कुटीका चाफा | ३ फुट | १३ x १३ |
| १० | क्रोटॉन | २.५ फुट | १२ x १२ |
| ११ | डिफेन बॅकिया | --/-- | १२ x १२ |
| १२ | अरेलीया | --/-- | १२ x १२ |
| १३ | ड्रेसीना महात्मा | --/-- | १२ x १२ |
| १४ | सॅपलोरा | --/-- | १२ x १२ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सर्व कुंडयातील रोपे हि विविध फुलांची व पानांची मोठया साईजचे रोपे आहेत. तरी उपरोक्त १४ प्रकारची रोपे खरेदी करणेस व सदर रोपे खरेदी करण्यासाठी रु. अंदाजे १,००,०००/- (रु. एक लाख) मात्र खर्च येईल. करीता वेगवेगळया नर्सरी कडुन निवीदा मागवुन न्युनत्तम दराने रोपे खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६ ग्रेन डिस्टोनर (कडधान्य निवडणेचे मशिन) खरेदी करणेस अथवा देणगी स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रास्ताविकः-** श्री साईप्रसादालयात प्रतिदिन सरासरी ४० हजार साईभक्तांचे प्रसाद भोजन बनविणेत येते. तसेच दररोज २५ ते ३० क्विंटलचे लाडू प्रसाद तयार करणेत येतात. प्रसाद भोजन वेळेवर बनविणेसाठी किचनमध्ये अनेक स्वरुपाचे ऑटोमायझेशन केलेले आहे. दररोज प्रसाद भोजनमध्ये एक कडधान्यची भाजी देणेत येते. कडधान्य व लाडू प्रसादाची हरबरा डाळीतील खडे, कचरा बाजूला काढणेसाठी तासी ५०० किलो क्षमतेच्या मशिनचा वापर करण्यात येत असून सदरचे मशिन दिनांक २२.८.१९९६ रोजी खरेदी करणेत आलेले आहे. सततच्या वापराने सदरचे मशिन खराब झालेले आहे. मशिन कार्यान्वित राहणेसाठी वारंवार मेन्टेनंन्स करावे लागते. मशिनला दुरुस्ती करतांना काही ठिकाणी वेल्डींग करण्यात आलेली आहे. त्यामुळे मशिन पुर्ण क्षमतेने कार्यान्वित राहत नाही.

**मागणीः-** श्री साईप्रसादालयातील दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेचे कामात कडधान्य व दाळ निवलेले असणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे प्रसादालयातील सध्या सन १९९६ पासून कार्यान्वित असलेले तासी ५०० किलो क्षमतेच्या मशिन ऐवजी प्रसादालयाची गरज लक्षात घेता तासी १००० किलो क्षमतेचे नविन मशिन खरेदी करणे आवश्यक आहे. नविन मशिन सध्या वापरात असलेल्या मशिनच्या जागेवरच नविन मशिन इन्स्टॉलेशन करता येईल. नविन मशिन खरेदी कामी अंदाजे रक्कम रु. २,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

**अ)** प्रस्तुत खर्चास मा. व्यवस्थापन समितीची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदरच्या खर्चास मान्यता मिळालेनंतर नामवंत वृत्तपत्रात जाहीरात देऊन निवीदा विक्री करुन दरपत्रक मागविता येतील. याकामी श्री साईप्रसादालयातील सन २०१४-१५ या अंदाजपत्रकात मशिनरी खरेदीकामी रक्कम रु.१,४८,९०,२००/- रक्कम शिल्लक आहे. **अथवा**

**ब)** श्री साईप्रसादालय करीता डिस्टोनर मशिनची अत्यंत आवश्यकता असल्याने जर कोणी साईभक्त मशिन देणगी देणार असेल तर त्यांचेकडून मशिन देणगी स्विकारता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- तरी साईप्रसादालयाकरीता तासी एक टन क्षमतेचे डिस्टोनर मशिन विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) पर्यतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी अथवा मशिन देणगी मिळाल्यास देणगी स्विकारणेस मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये आवश्यक असलेले तासी एक टन क्षमतेचे ग्रेन डिस्टोनर (कडधान्य निवडणेचे मशिन) विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, दरम्यानच्या कालावधीमध्ये सदरहू मशिन देणगी स्वरुपात मिळते का ते पहावे, जर देणगी स्वरुपात सदरहू मशिन मिळत असेल तर स्विकारणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.२७ सन २०१४- १५ (माहे एप्रिल-१४ ते मार्च- १५ अखेर) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी किराणा माल खरेदीकामी जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-१५ चे माहे एप्रिल-१४ ते मार्च-१५ अखेर प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रिसदस्य समितीचे दि.१३.१२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.९६७ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१३.०३.२०१४ रोजी सदर खरेदीस पुढीलप्रमाणे मान्यता दिलेली होती. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत खालीलप्रमाणे निर्देश दिलेले होते.

6) The process, apart from contacting the above referred companies/ entrepreneurs, shall also be followed by effecting E-tendering system and the requirement of the Sansthan for purchase of the aforesaid items, shall be widely published in national level newspapers, to name few, – Times of India, Indian Express, Hindustan Times, Navbharat Times, Hindustan Times (Marathi), Dainik Bhaskar (Hindi), Punjab Kesari and also other newspapers, as the officials of the committee deem fit and proper. The officers will also bargain with the newspapers for reducing costs of publication.

उपरोक्त निर्णयास अधिन राहुनच ऑक्टो.२०१४ ते मार्च-२०१५ अखेर खरेदी करावयाचे किराणा माल खरेदीकामी खरेदी विभागाकडील दि.२७.०८.२०१४ रोजीची मंजुर टिपणी व जाहिरातीचा मसुदा तयार करुन जनसंपर्क कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविला होता.

यावर जनसंपर्क विभागाकडील जाहिरात प्रसिद्ध करणेकामीचे टिपणीवर "कार्योत्तर खर्चास मा.व्य.समितीची मान्यता घ्यावी," असे निर्देश मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी दिलेले आहेत. जनसंपर्क विभागाने दि.२९.०८.२०१४ रोजीचे टिपणीनुसार जाहिरातीसाठी खालील प्रमाणे खर्च कळविलेला आहे.

| **अ.नं.** | **वर्तमानपत्राचे नांव** | **आवृत्ती** | **अंदाजे अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|
| ०१ | टाइम्स ऑफ इंडीया | मुंबई | २,२६,८००/- |
| ०२ | नवभारत टाईम्स | दिल्ली | ९२,१६०/- |
| ०३ | इंडीयन एक्सप्रेस | मुंबई | १,४६,१६०/- |
| ०४ | हिंदुस्थान टाइम्स | मुंबई | १,७६,४००/- |
| ०५ | पंजाब केसरी | सर्व आवृत्या | ७२,०००/- |
| ०६ | दै.भास्कर (हिंदी) | औरंगाबाद | २७,०००/- |
| ०७ | शासकीय दराने स्थानिक वर्तमानपत्रात | | २०,०००/- |
| | | **एकुण-** | **७,६०,५२०/-** |

(अक्षरी रुपये सात लाख साठ हजार पाचशे वीस मात्र)

तरी सन २०१४-१५ द्वितीय सहामाही करिता (ऑक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५) चे किराणा माल खरेदीच्या प्रस्तावास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेस आधीन राहुन किराणा माल खरेदीकामी प्राथमिक पुर्वतयारी करणेकामी उपरोक्त प्रमाणे वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीस आलेल्या अंदाजे रु.७,६०,५२०/- (अक्षरी रुपये सात लाख साठ हजार पाचशे वीस) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.२८** **सामान्य प्रशासन विभागाकडील जुने झेरॉक्स मशिन बायबॅक करुन नवीन ०२ झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीचे दि.०४.०२.१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४७ नुसार सध्या बंद असलेले मॉडेल नं.५६४५ चे झेरॉक्स मशीन बायबॅकसह कार्यालयीन कामासाठी नवीन दोन झेरॉक्स मशीन्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरच्या प्रस्तावास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडून दि.०४.०७.२०१४ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग जा.क्र.१५९१/२०१४ दि.१८.०७.२०१४ नुसार सन २०१० मध्ये नवीन खरेदी केलेले झेरॉक्स कंपनीचे मॉडेल नं.५६४५ सध्या बंद असल्याने ते मशीन बायबॅकसह दोन अधुनिक झेरॉक्स मशीन्स ५ वर्षे फ्रि सर्व्हीसिंगसह (Without Material) खरेदी करुन मिळणेबाबत कळविण्यात आलेले होते. तसेच बायबॅक करावयाचे झेरॉक्स मशीनचे किमान मुल्य पुर्णांकित रु.१,५८,५२०/- मात्र कळविण्यात आलेले आहे. सदरचा प्रस्ताव दि.१८.०७.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर झेरॉक्स मशीन्सचा खर्च हा १० लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच ई-निविदा प्रक्रियेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत (आय.टी.विभाग) कार्यवाही करण्यात आलेली आहे. ई-निविदा प्रक्रियेबाबतची अंतिम मुदत दि.३०.०८.२०१४ अशी ठेवण्यात आलेली होती. मुदतीअंती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ०२ निविदाधारकांच्या निविदा Upload झालेल्या होत्या. दिनांक ०१.०९.२०१४ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त निविदांतील तांत्रिक लिफाफे उघडण्यात आलेले आहेत, त्याचा तपशिल सोबतच्या तक्त्यामध्ये जोडलेला आहे. मात्र झेरॉक्स मशीन्स खरदीकामी दोनच निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने किमान तीन निविदा असणे आवश्यक आहे. सबब उपसमितीने फेर निविदा कराव्यात अशी शिफारस केली आहे. फेर निविदा करतांना झेरॉक्स मशीनच्या आणखी नामांकीत कंपन्यांचा उल्लेख करावा असेही सुचीत केले आहे.

झेरॉक्स मशीन खरेदीकामी आणखी नामांकित कंपन्यांचा सामावेश करून फेर निविदा करणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी जनहित याचिका १८/ २०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.५८०९/ २०१४ वरील मा.उच्च न्यायालयाच्या दि.०४ जुलै २०१४ रोजीचे आदेशानुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.२९ ग्रुप ग्रॅज्युईटी योजना नुतनीकरणाबाबत. सन २०१४-२०१५.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक ४१८ दि.२२-२३/०९/२००१ अन्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासून संस्थान कर्मचाऱ्यासांठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना लागु करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात नुतनीकरण करण्यात येते.

नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम, लाईफ कव्हर प्रिमीयम आदा करण्यात येतो. चालू वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि.२२.०८.२०१४ चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविलेले आहे.

| Sr. | Premium Details | Amount |
|---|---|---|
| 1 | Current Year Contribution | 2,05,80,064.00 |
| 2 | Life Cover Premium | 18,80,575.00 |
| 3 | Service Tax | 2,32,439.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 3,05,71,282.00 |
| | **Total Amount Payable** | **5,32,64,360.00** |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडील ग्रुप ग्रॅच्युटी योजनेचे चालू वर्षाकरीता नुतनीकरण करणेकामी अंशदान, Life Cover Premium (Including Service Tax) रक्कम, डिपॉझिट म्हणून एलआयसी ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. ग्रुप ग्रॅच्युटी योजनेअंतर्गत जमा असलेले रकमेवर एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडून यावर्षी **८.८५%** या दराने संस्थानला व्याजदर कळविला आहे.

उपरोक्त रक्कम ही योजनेचे नुतनीकरण होण्यासाठी दि.०१.१०.२०१४ अखेर भरणे आवश्यक आहे. अन्यथा योजनेचे नुतनीकरण LIC of India, पुणे यांना रक्कम प्राप्त झालेनंतर होईल. या कालावधीत एखाद्या कर्मचाऱ्याचे आकस्मीक निधन झाल्यास त्या कर्मचाऱ्याला या योजनेचा लाभ मिळणार नाही व तो या लाभापासून वंचीत होईल.

सदर रक्कम ही संस्थानच्या ग्रुप ग्रॅच्युटी या योजनेमध्ये संस्थानच्या नांवे डिपॉझीट होत असून त्यावर संस्थानला ८.८५ % या दराने व्याज मिळणार आहे. हा संस्थानचा खर्च नसुन सदर रक्कम डिपॉझीट म्हणुन LIC कडे ठेवण्यात येते.

वर नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु.५,३२,६४,३६०/-मात्र एवढी होते. पुर्णांकीत रक्कम रु.५,३०,००,०००/- (पाच कोटी, तीस लाख) मात्र एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे RTGS द्वारे आदा करणेच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेली, संस्थान कर्मचाऱ्यांसाठी ग्रुप ग्रॅज्युईटी योजनेमध्ये गुंतविण्यात येणाऱ्या रु.५.३० कोटी मात्र रक्कमेची या योजनेचे नुतनीकरणासाठी प्रतीवर्षाप्रमाणे गुंतवणूक करणे अनिवार्य आहे. ही रक्कम LIC of India, पुणे यांचेकडे डिपॉझीट**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**करावयाची असून त्या रकमेवर संस्थानला व्याजही मिळणार आहे. सदर बाब नियमीत स्वरुपाची असल्याने मेजर फायनान्शीयलमध्ये येत नाही. सबब उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३०** **श्री साईसच्चरित- मराठी पोथीचा गुजराथी भाषेत अनुवाद प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील १७ (२)(ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे. श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार– प्रसार करील आणि श्री साई साहित्यग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

यानुसार संस्थानव्दारा १६ भाषांमध्ये श्री साईचरित्र व इतर प्रकाशने विक्रीस उपलब्ध आहेत. श्री साईदास/राकेश पी. पटेल, सुरत यांनी दि.३०.०७.२०१४ चे पत्रान्वये श्री साईसच्चरित मराठी पोथीचा गुजराथी भाषेत अनुवाद तयार करुन गुजराथी साईसच्चरित पोथी तयार केली आहे. सदर पोथी संस्थानने प्रकाशीत करावी अशी इच्छा त्यांनी प्रदर्शीत केली आहे. त्याकामी पुस्तकाचे सर्वाधिकार ते संस्थानला विनामुल्य देणार आहेत.तसेच ते ५०० प्रती छपाई करुन देणगी स्वरुपात संस्थानला देणार आहेत.

उपरोक्त सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदीनुसार अधिकाधिक भाषेत बाबांच्या मुळ साईचरित्राचा इतर भाषेत अनुवाद झाल्यास इतर भाषिकांना त्याचा लाभ होईल.

संस्थानमार्फत श्री साईचरित्र कथारुपाने (स्टोरी) पध्दतीने गुजराथी भाषेत प्रकाशित करण्यात आलेले आहे. परंतु श्री साईसच्चरित ओवी टु ओवी गुजराथी भाषेत प्रकाशीत झालेले नाही.सदरचे चरित्र गुजराथी भाषेत प्रकाशित केल्यास गुजराथी भाषिक भक्तांना पारायण करणेकामी उपयोग होऊ शकेल. व श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार- प्रसार सर्व भाषेत व्हावा म्हणून त्यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साई साईसच्चरित मराठी पोथीचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस मान्यता देणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद मुळ पुस्तकाबरहुकूम असलेबाबत व अनुवाद करतांना त्याचे अर्थात कोणताही बदल केला नसलयाबाबत पुणे अथवा गुजराथी भाषीक विघापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगता येईल सर्व बाबींचा पूर्तता झाल्यानंतरच पुस्तकाचे संस्थानव्दारे प्रकाशन करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब साईदास / राकेश पी पटेल , सुरत यांना श्री साईसच्चरित मराठी पोथीचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेकामी तसेच संस्थानचे नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता पुर्ण केलेनंतर तयांचेकडून देणगी स्वरुपात ५०० प्रती स्वीकारुन संस्थानव्दारा प्रकाशन करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३१** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-२०१४ या कालावधीत संस्थानने मा.अध्यक्ष, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकायकारी अधिकारी यांनी तसेच संस्थान अंतर्गत खात्याचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना व वेगवेगळया क्षेत्रातील अतिमहत्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीत जनसंपर्क कार्यालयामार्फत उच्चपदस्थ शासकीय अधिकारी, सिनेकलावंत, नामांकित लेखक, हभप दासगणु महाराज जयंती उत्सव, श्री साईबाबा रुग्णालया व्दारे होणारे शिबीरे, तसेच मान्यवरांना भेट म्हणुन खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके /फोटो/ सीडी/ डायरी / कॅलेंडर्स प्रकाशने विभागाकडून माहे १ एप्रिल २०१३ ते माहे ३१ मार्च २०१४ या कालावधीत मोफत देण्यात आलेले आहेत.

| अं.नं. | पीयुबी नं. | पुस्तकांचे नाव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पीयुबी नं.१ | श्री साई सच्चरित्र | मराठी | २४ | ७४.०५ | १७७७.२० |
| २ | पीयुबी नं.२ | श्री साई सच्चरित्र | हिंदी | ५ | ३९.२५ | १९६.२५ |
| ३ | पीयुबी नं.३ | श्री साई सच्चरित्र | इंग्रजी | २ | ३२.६० | ६५.२० |
| ४ | पीयुबी नं.५ | श्री साई सच्चरित्र | कन्नड | १ | ४४.४९ | ४४.४९ |
| ५ | पीयुबी नं.६ | श्री साई सच्चरित्र | तेलगु | १ | ४१.५० | ४१.५० |
| ६ | पीयुबी नं.७ | श्री साई सच्चरित्र | तामिळ | ४ | ४९.६० | १९८.४० |
| ७ | पीयुबी नं.११ | श्री साईलिलामृत | मराठी | १ | २१.६० | २१.६० |
| ८ | पीयुबी नं.१२ | श्री साईलिलामृत | हिंदी | १ | १९.२० | १९.२० |
| ९ | पीयुबी नं.१९ | श्री साई स्तवंनमंजीरी | मराठी | २७६ | २.०० | ५५२.०० |
| १० | पीयुबी नं.२४ | श्री साई रुद्राध्याय | मराठी | ७९ | २.७० | २१३.३० |
| ११ | पीयुबी नं.२९ | मुलांचे साईबाबा | मराठी | ८ | ६.३० | ५०.४० |
| १२ | पीयुबी नं.४३ | श्रीसाई सतचरित्र स्टोरी | मराठी | १४ | ८५.५५ | ११९७.७० |
| १३ | पीयुबी नं.५४ | दैनंदिन साईबोध | मराठी | १ | ६८.४० | ६८.४० |
| १४ | पीयुबी नं.६२ | श्री साईचरित्र | बंगाली | २ | ६१.०० | १२२.०० |
| १५ | पीयुबी नं.६६ | मुलांचे साईबाबा (मेहता) | इंग्रजी | १२ | ५६.२५ | ६७५.०० |
| १६ | पीयुबी नं.६८ | मुलांचे साईबाबा (मेहता) | हिंदी | २ | ५६.२५ | ११२.५० |
| १७ | पीयुबी नं.६९ | मातृसाई | तेलगु | १ | ३५.०० | ३५.०० |
| १८ | पीयुबी नं.७३ | एक फकिर की पाठशाला | हिंदी | ०१ | २८.०० | २८.०० |
| १९ | पीयुबी नं.७४ | श्री साई समर्थ चरित्र (झरीन) | इंग्रजी | ५ | ९०.५८ | ४५२.९० |
| २० | पीयुबी नं.७५ | श्री साईंचे सत्यचरित्र | तेलगु | १ | ११७.०० | ११७.०० |
| २१ | पीयुबी नं.७८ | श्री साईचरित्र | ओरिया | १ | ३७.५० | ३७.५० |
| २२ | पीयुबी नं.८५ | श्री साईचरित्र (स्टर्लिंग) | इंग्रजी | ५ | २३.३० | ११६.५० |
| २३ | पीयुबी नं.८६ | साई किऔर मेरा पहला कदम | हिंदी | १ | ५४.३३ | ५४.३३ |
| २४ | पीयुबी नं.९२ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी | बंगाली | ५१ | ४.८५ | २४७.३५ |
| २५ | पीयुबी नं.९६ | श्री साईनाथ सगुणोपासना | जर्मन | ५१ | १०.०० | ५१०.०० |
| २६ | पीयुबी नं.९७ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी | जर्मन | ५१ | १५.०० | ७६५.०० |
| २७ | पीयुबी नं.९८ | चार अध्याय | हिंदी | ५१ | ११.५० | ५८६.५० |
| | | | | **एकुण रक्क्म रु** | | **८३०५.२२** |

| अं.नं. | पीयुबी नं. | कॅसेट/सीडीचे नाव | भाषा | मोफत नग | निर्मिती दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | पीयुबी नं.२०८ | साई मंदिरातील आरती | व्हिसीडी | २ | ३८.१२ | ७६.२४ |
| २९ | पीयुबी नं.२०९ | शिर्डी साईबाबा की दर्शन | व्हिसीडी | १ | २१.१० | २१.१० |
| ३० | पीयुबी नं.२१० | साईमंदिरातील आरती | डिव्हिडी | २ | ४८.०५ | ९६.१० |
| ३१ | पीयुबी नं.२११ | श्री साईचरित्र तेलगु | एमपी३ | १ | ५७.४५ | ५७.४५ |
| ३२ | पीयुबी नं.२१४ | साई मंदिरातील आरती | एमपी३ | १ | १८.२७ | १८.२७ |
| | | | | **एकुण रक्क्म रु** | | **२६९.१६** |

| अं.नं. | पीयुबी नं. | कॅसेट/सीडीचे नाव | वर्ष | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | पीयुबी नं.३१० | श्री साई डायरी | २०१४ | १३८ | ७१.०० | ९७९८.०० |
| | | | | **एकुण रक्क्म रु.** | | **९७९८.००** |

| अं.नं. | पीयुबी नं. | श्री साईबाबा कॅलेंडर्स | वर्ष | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | पीयुबी नं. | श्री साईबाबा कॅलेंडर्स | २०१४ | ६२ | १३.५० | ८३७.०० |
| ३५ | पीयुबी नं. | श्री साईबाबा कॅलेंडर्स | २०१४ | ३७५ | १७.७५ | ६६५६.२५ |
| ३६ | पीयुबी नं. | श्री साईबाबा कॅलेंडर्स | २०१४ | ४० | २१६.०० | ८६४०.०० |
| ३७ | पीयुबी नं. | श्री साईबाबा कॅलेंडर्स | २०१४ | २३ | १९८.०० | ४५५४.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | | **२०६८७.२५** |

| | |
|---|---|
| एकुण मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम रु. | ८३०५.२२ |
| एकुण मोफत दिलेल्या सीडी रक्कम रु. | २६९.१६ |
| एकुण मोफत दिलेल्या डायरीची रक्कम रु. | ९७९८.०० |
| एकुण मोफत दिलेल्या कॅलेंडर्सची रक्कम रु. | २०,६८७.२५ |
| **एकुण रक्कम रुपये** | **३९,०५९.६३** |
| **पुर्णंकीत रक्कम रुपये** | **३९.०६०.००** |

**(अक्षरी रुपये. एकोणचाळीस हजार साठ मात्र)**

उपरोक्तप्रमाणे पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स पोस्टेज स्टॉकमधुन मोफत देण्यात आलेली आहेत. याकामी झालेला रु.३९०६०.०० खर्चास मान्यता मिळणेस व सदर खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाते नावे टाकणेस मंजुरी मिळणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३२ श्री. विजय मंडोरा, तांत्रिक सल्लागार, अहमदाबाद यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः कलम १७ (१) नुसार.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.: ०१. दिनांक २०/०५/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३९.
०२. दिनांक ०६/०९/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६४०.
०३. दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५०.

**प्रास्ताविकः** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३९ अन्वये श्री.विजय मंडोरा Sai Info System (India) Pvt. Ltd., Ahmedabad यांची तांत्रिक सल्लागार म्हणून कोणत्याही प्रकारचे मानधन न घेता नेमणुक करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन त्यांना जा.क्र.एसएसएस/ आयटी/ १०६७०/ २००७ दि.०७/०७/२००७ रोजीचा कार्यादेश देण्यात आला होता. तद्नंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५० अन्वये जा.क्र. एसएसएस / आयटी / १०४२२ / २००९ दि. २०/०८/२००९ रोजीचे कार्यादेशानुसार पाच वर्षासाठी तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आली आहे. तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी सो., यांनी जा.क्र.एसएसएस/ वशी-काअ/४८९९/२०१४ दि. २३/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये श्री. विजय मंडोरा यांना साईटेक प्रकल्पा संदर्भात Gap Analysis चे काम करणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी साईटेक प्रकल्पाचे Gap Analysis चे काम चालु केले असता, सदरहु विषयाची माहिती आयटी कमीटीचे अध्यक्ष श्री के. व्ही. रमणी सो., यांना समजता त्यांनी श्री विजय मंडोरा यांचे बाबत मा. श्री. के.व्ही. रमणी सो., यांचा दि. ०३/०२/२०१४ व दि. ११/०२/२०१४ रोजीचे ई-मेल नुसार आक्षेपार्ह माहिती कळविली आहे.

श्री. विजय मंडोरा यांची तांत्रिक सल्लागार म्हणून केलेली नियुक्तीची मुदत दिनांक ३० जुन, २०१४ रोजी संपुष्टात आलेली असल्याने श्री. विजय मंडोरा यांनी तांत्रिक सल्लागार पदाची मुदतवाढ पुढील पाच वर्षाकरीता मिळणेस श्री विजय मंडोरा यांचे आवक क्रं. ५४३९ दि.३०/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे.

परंतु दिनांक २८/०२/२०१३ रोजीचे मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थानने श्री. के. व्ही. रमणी. यांची आय. टी. ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करताना त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते. तथापि, संस्थाने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निणर्य घेतला होता. भविष्यात अशाप्रकारे नियुक्ती करण्यापूर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानुसार श्री. विजय मंडोरा यांना तांत्रिक सल्लागार पदी मुदतवाढ देणेकामी महाराष्ट्र शासनाचे दिनांक २८/०२/२०१३ रोजीचे निर्देशानुसार प्रथम विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी, असे नम्र मत आहे.

मागणी: माहिती तंत्रज्ञान विभागासाठी आवश्यक असणाऱ्या व आयटी क्षेत्रातील कुठलाही तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करतांनी खालील अटी/ शर्तीचा तसेच संस्थानचे दृष्टीने आवश्यक असणाऱ्या बाबींचा समावेश असावा, असे नम्र मत आहे.

1. Scope of work to provide technical advice in following areas-
   a) Networking & network security.
   b) Data security.
   c) Internet Broadband, Proxy server.
   d) Database & domain control servers.
   e) Web Hositing Administration, Development & Upcoming broadband Website.
   f) Present software systems.
   g) Computerization of present manual systems in various departments.
   h) Training to Technical Staff.
2. During Consultant each visit, you have to submit the status report in each area to the IT dept.
3. No honorarium will be paid from Sansthan to Consultant for the said work.
4. Consultant and its company can't participate in any tender process with Sansthan.
5. Stage wise onsite verification and certification of Hardware, Software, Networking, and Infrastructure etc procured in any project as per agreement/Sow with vendors.
6. As per approved realese plan, monitoring activity and plan for compliance of same.
7. Any issue arising of non-completion of project or Non-performance or Non-SLA performance or any such situation; where sansthan had to take legal action then all documentation need to submit to sansthan with appropriate format to take legal action on vender.
8. Approval for payment based on SLA on their compliance as per agreement.
9.If any addition of cost (RFC) required for this project need to evaluate and approved as per IT industry norms.

Consultant Have to attend quartly meeting which will be held in shirdi.

**संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** शासन निर्देश

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:** तरी महाराष्ट्र शासनाचे दिनांक २८/०२/२०१३ रोजीचे चे पत्रानुसार श्री. विजय मंडोरा यांचे मुदतवाढीसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेणेकामी त्यांना उपरोक्त संदर्भीय कागदपत्रे व ई-मेल सह सोबतच्या पत्राव्दारे प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, आय.टी. कमिटीचे अध्यक्ष, सदस्य यांच्या नेमणूका व कालावधीसह सविस्तर फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३ संस्थानचे वेबसाईटसाठी Cyber Expert/ Consultant कामी ॲड.प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचे विनामोबदला मार्गदर्शन घेणेबाबत.**

**प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** मा.व्यवस्थापन समीतीचे दि. १८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ८३९.

**प्रास्ताविक :** श्री साईबाबा संस्थानची **www.saibaba@sai.org.in** या नावाने वेबसाईट दिनांक १९ नोव्हेंबर, १९९८ पासून ऑनलाईन आहे. या वेबसाईटवर संस्थान प्रकाशीत सर्व प्रकाशने, ऑनलाईन डोनेशन, ऑनलाईन रुम बुकींग,नेट बॅकींग आदि. सुविधा श्री साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच Vistaas digital Media Private Ltd., Mumbai यांचेमार्फत संस्थानचे व त्यांचे वेबसाईटवर संपूर्ण दिवसांचे लाईव्ह दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. याव्दारे संस्थानला वार्षिक रु.३.२ करोड रॉयल्टी/देणगी स्वरुपात मिळत आहे.

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध असलेल्या सेवा-सुविधा व त्यात वेळोवेळी करण्यात येत असलेले बदल यामुळे संस्थान वेबसाईटला भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या दैनंदिन साधारणतः १५ ते २१ हजार साईभक्त वेबसाईटला भेट असून ऑनलाईन या वेबपेजला दैनंदिन २० ते २२

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



हजार श्रींचे भक्त भेट देतात. www.google.com या Search Engine वर www.shrisaibabasansthan.org ही वेबसाईट दिवसेंदिवस चांगला प्रतिसाद मिळत आहे.

संस्थानचे वेबसाईटला भेट देणाऱ्यांमध्ये काही विघ्नसंतोषी व्यक्तींचाही समावेश असण्याची शक्यता असते. सदर व्यक्ती संस्थानची वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे तसेच इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे आदि. प्रकार करतात.

उपरोक्तप्रमाणे चुकीची माहिती शोधून त्यावर काय कार्यवाही करावी, यासाठी ॲडव्होकेटचा सल्ला घ्यावा लागतो. परंतु यात पाहिजे तसा सल्ला मिळत नाही व कारवाई होत नाही. मा. व्यवस्थापन समीतीचे दि. १८/१०/२०१३ रोजीचे सभेत सदरकामी प्रस्ताव सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं. ८३९ अन्वये संस्थान वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे तसेच इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे, असे प्रकार रोखण्यासाठी सायबर क्राईम विभागाकडुन Consultant बाबत माहिती जमा करुन सविस्तर प्रस्ताव सभेपुढे सादर करण्यात यावा, तसेच तोपर्यंत असे प्रकार आढळुन आल्यास पुढील कार्यवाही सायबर क्राईम विभाग, अहमदनगर यांचेकडे पाठवित जावे व यासाठी सायबर क्राईम विभाग, अहमदनगर यांना नियमाप्रमाणे फी अदा करावी, असे ठरले होते.

मा. व्यवस्थापन समीतीचे दि. १८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.न.एसएसएसटी/ आयटी/ ३८०/२०१४ दि. २२/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये मा. जिल्हा पोलीस अधिक्षक सो., अहमदनगर यांना याकामी कळविण्यात आले होते. परंतु आज अखेर मा. जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन कुठलाही प्रकारचा प्रतीसाद मिळाला नाही.

सदरकामी श्रींचे भक्त ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट हे संस्थानचे वेबसाईटसाठी Cyber Expert/ Consultant कामी विनामोबदला मार्गदर्शन हयात असे पर्यंत करणेकामी तयार असल्याचे त्यांनी दि.०५/०९ /२०१४ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे.

**मागणीः** श्रींचे भक्त ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांनी त्यांचे दि. ०५/०९ /२०१४ रोजीचे ई-मेलमध्ये खालीलप्रमाणे संस्थानचे कामकाजात लिगल ॲडव्हायजरची मदत होईल, तसेच याकामी मी संस्थानला विनामोबदला सेवा देण्यास तयार असल्याचे कळविले आहे. त्यानूसार Cyber Expert / Consultant संदर्भातील खालील कामे आपणास श्रींचे भक्त ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचेकडुन विनामोबदला करुन घेता येईल.

1. Issues pertaining to “Theft of Live Darshan” via TV/ Mobile/ Internet e.t.c
2. Data theft from Website of the Trust.
3. Removing of defamatory and wrong information about Saibaba from websites.
4. Protecting IPR of the Shri Saibaba SansthanTrust.
5. Making agreements to be hosted on the Sansthan website .
6. Any Cyber security or web site security related incident.
7. Advice while buying IT & IT security related products.
8. Advice while implementing any security at the Sansthan where IT is involved.
9. Managing The IT Act, 2000 Compliance of the Sansthan.
10. Cyber-attack on IT Infrastructure.
11. Advice related to financial frauds online or offline .

Other work: Sending Notices to websites or companies violating IT Act, IPR etc.

उपरोक्तप्रमाणे विविध वेबसाईटवर संस्थान व श्रींविषयी उपलब्ध असलेली चुकीची माहिती शोधणे व त्यावर योग्य कार्यवाही करणे हे जोखमीचे व जबाबदारीचे कामकाज असल्याने सदरचे कामकाजासाठी Cyber Expert/ Consultant म्हणुन श्रींचे भक्त ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचेकडुन विनामोबदला मार्गदर्शन घेणेकामी मा. व्यवस्थापन समीतीची मान्यता घेऊन त्यांना तीन वर्षाकरीता पत्र देणेस मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः** उपरोक्तप्रमाणे, संस्थानचे वेबसाईटला भेट देणाऱ्यांमध्ये काही विघ्नसंतोषी व्यक्तींचाही समावेश असण्याची शक्यता असते. सदर व्यक्ती संस्थान वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे तसेच इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे आदि. प्रकारावर नियत्रंण करणेकामी व कायदेशीर कारवाईकामी संस्थानचे सायबर लॉ लिगल ॲडव्हायजर म्हणून श्रींचे भक्त ॲड. प्रशांत माळी, मुंबई हायकोर्ट यांचेकडुन विनामोबदला मार्गदर्शन घेणेकामी त्यांना तीन वर्षाकरीता पत्र देणेचे मान्यतेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे तसेच इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे आदि. प्रकारावर नियत्रंण ठेवणेकामी Cyber Expert/ Consultant यांचे पॅनल तयार करणेत यावे. त्यासाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४ श्री साईप्रसादालयातील डिश वॉशर मशिन करीता व इतर भांडी धुणेसाठी लिक्वीड सोप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूदः- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक :-** श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी ४० हजार साईभक्त प्रसादाचा लाभ घेतात.उत्सव व गर्दीच्या कालावधीमध्ये प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या ६० ते ६५हजारापर्यंत जाते.प्रसाद भोजन घेणाऱ्या साईभक्तांना जेवण देण्यासाठी स्टिल ताटांचा वापर करण्यात येतो.भाज्या, डाळ, भात इत्यादी पदार्थ बनवण्यासाठी पातेले व कढईचा वापर करण्यात येतो. सदर पदार्थ बनविणेसाठी तेलाचा व तुपाचा वापर करण्यात येत असल्यामुळे पदार्थ बनवण्यासाठी लागणाऱ्या कढई, पातीले, प्रसाद भोजनाची ताटे व जेवण वाढण्यासाठी हॉलमध्ये वापरण्यात येणाऱ्या स्टे. स्टीलच्या फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, भातवाढ्या तेलकट होतात परिणामी खराब वास येतो.सदर ताटे व डिशेस तेलकट व तुपाचेअसल्यामुळे फक्त पाण्याने धुतल्यामुळे स्वच्छ होत नसल्याने लिक्वीड सोपचा वापर करावा लागतो.

दि.२६/०९/२०१३ रोजीच्या मंजूर टिपणीनुसार एकुण ८१०० लि. लिक्विड सोपची ख्ररेदी विभागाकडे मागणी करण्यात आली होती. त्यानुसार दि.०१/०८/२०१४ अखेर ६४८७ लि. लिक्विड सोप प्रसादालय उप-भांडार विभागास प्राप्त झाले असून उर्वरित १६१३ लि.लिक्विड सोप अद्याप येणे बाकी आहे. पुढील कालावधीसाठी लागणारे लिक्विड सोप खरेदी विभागामार्फत खरेदी करणे गरजेचे आहे.श्री साई प्रसादालयात उपरोक्त भांडे धुण्यासाठी दररोज अंदाजे ४५ ते ५० लिटर लिक्वीड सोपची आवश्यकता असून महिन्याला सुमारे १५०० लिटर लिक्वीड सोपची गरज लागते.त्यानुसार माहे सप्टेंबर-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर अंदाजे १०,००० लिटर लिक्वीड सोपची आवश्यकता आहे.

श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजनाची ताटे धुण्यासाठी इर्म्पोटेड दोन डिश वॉशिंग मशिनचा वापर करण्यात येतो.डिश वॉशिंग मशिनला सदरचे लिक्वीड वापरले असता ताटे धुण्याची गुणवत्ता मिळत नाही व भक्तांच्या ताटे खराब येत असल्याबाबत वारंवार तक्रारी येत असतात. त्यामुळे ताटांची गुणवत्ता येणेकामी डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसी चे SUMO NOVA- D & SUMO RINSE लिक्वीडचा वापर केला तर ताटांची गुणवत्ता चांगली मिळेल. यापुर्वी सदर लिक्वीडचा वापर करण्यात आलेला असून गुणवत्ता चांगल्या प्रकारे मिळालेली आहे. त्यामुळे डिश वॉशिंग मशिनसाठी जॉनसन डायव्हसी चे SUMO NOVA - D & SUMO RINSE लिक्वीड खरेदी करता येईल.

**मागणीः-** श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनाची भांडी, कढया, पातेले, फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, वाटी व इतर तेलकट उपकरणे धुणेसाठी लिक्वीड सोप खरेदी करणे आवश्यक आहे.सध्या खरेदी करण्यात येत असलेल्या लिक्वीड सोपचा खरेदी दर रू.१६/- प्रति लिटर आहे.श्रीसाईप्रसादालय विभागास सप्टेंबर २०१४ ते मार्च २०१५ पर्यंत अंदाजे १०,००० लिटर लिक्वीड सोपची गरज आहे. त्यामुळे एकुण रु. १,६०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तसेच डिश वॉशिंग मशिन करीता दोन महिन्यांसाठी जॉनसन डायव्हसी चे SUMO NOVA - D & SUMO RINSE खरेदी केले तर प्रत्येकी १५०० लिटरची आवश्यकता आहे.सदर लिक्वीडचा प्रति लिटर दर अंदाजे रु. १७५/- आहे. त्यामुळे एकुण ३,००० लिटर करीता ५,२५,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईप्रसादालयातील डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हर्सीचे ३००० लिटर व इतर भांडी, उपकरणे धुण्यासाठी १०,००० लिटर लिक्वीड सोपखरेदी करणे आवश्यक असल्याने त्याकामी रक्कम रु.६,८५,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च प्रसादालयासाठी असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुद सन २०१४-२०१५ मधील प्रसादालय खर्च या सदराखालील मंजूर रक्कम रु.२४,८५,१२,०००/- यातून करता येईल.

**अंदाजे कालावधीः-**१५० ते १८० दिवस

१. प्रस्ताव प्रशासकीय अधिकारी, उपकार्यकारी यांचे मान्यतेसाठी. -०६ दिवस

२. मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेनंतर विषय त्रिसदस्य समितीचे मान्यतेसाठी सभाकामकाज विभागाला देणे. -२५ दिवस

३. प्रस्तावास त्रिसदस्य समितीची मान्यता मिळाल्यानंतर तो खरेदी विभागाकडे पाठविणे- ०१ दिवस

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



४. जाहिरात व निविदेचा मसूदा तयार करून विक्री करणेची टिपणी मान्यतेसाठी प्र.अ./ उप.का.अ.यांचे मार्फत कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी पाठविणे. -०८ दिवस

५. जाहिरात प्रसिध्द झालेनंतर निविदा विक्री करणे, निविदा स्विकारणे. -२० दिवस

६. निविदा प्राप्त झालेनंतर निविदा उघडणेबाबतची टिपणी प्र.अ./उप का.अ.यांचे मार्फत का.अ.यांचे मान्यतेसाठी-०६ दिवस

७. निविदा प्र.अ.यांचे समक्ष उघडणे, लेखाशाखेमार्फत तपासणी करून कागदपत्रांचा तक्ता तयार करुन तो प्र.अ./उप का.अ.यांचे मार्फत का.अ.यांचेकडे अवलोकनार्थ सादर करणे- ०६ दिवस

८. पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा त्रिसदस्य समितीस सादर करणेस मान्यता मिळणेबाबतची टिपणी प्र.अ./उप.का.अ.यांचे मार्फत कार्यकारी अधिकारी यांचेसमोर ठेवणे. टिपणी मंजुरीनंतर सभाकामकाज विभागाकडे त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेसाठी देणे. -०७ दिवस

९. त्रिसदस्य समिती सभेसाठी लागणारी वेळ. -२०-३० दिवस

१०. त्रिदस्य समितीचे इतिवृत्त तयार होऊन सदरचे इतिवृत्त पुढील सभेत कायम होणेसाठी लागणारा वेळ.-२०-३० दिवस

११. न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेचा कालावधी. -०६ दिवस

१२. मालाचा पुरवठा करणेची मुदत. -३० दिवस

एकुण कालावधी:-१५० ते १८० दिवस

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-**तरी माहे सप्टेंबर-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर प्रसादालयातील भांडी धुणेसाठी १०,००० लिटर लिक्वीड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसी चे SUMO NOVA- D & SUMO RINSE प्रत्येकी १५०० लिटर खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.६,८५,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेंबर-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर श्री साई प्रसादालयातील भांडी धुणेसाठी १०,००० लिटर लिक्वीड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVAD & SUMO RINSE प्रत्येकी १५०० लिटर खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ६,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.३५ मौजे नांदुर्खी खुर्द येथे स्कुलबस सुविधा चालू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद–** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि.१७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक– दि.१५/०३/२००४ रोजीची सभा निर्णय क्रमांक २५०**

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु. केजी ते इयत्ता 10 वी पर्यंत शिक्षण घेणा-या शिर्डी व परिसरातील विद्यार्थ्यांना मा. व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या स्कुलबस शुल्कानुसार शुल्क आकारुन वाहन विभागामार्फत स्कुलबस सुविधा पुरविली जाते. सध्या मौजे नांदुर्खी बुद्रुक या ठिकाणी स्कुलबस सेवा पुरविण्यात येत असून या स्कुलबसमध्ये त्या मार्गावरील सकाळचे सत्रात 63 व दुपारचे सत्रात 100 बसे एकूण 163 विद्यार्थी स्कुलबसने ये-जा करीत आहेत.

सकाळचे सत्रात मौजे नांदुर्खी बुद्रुक पर्यंत एकूण 45 विद्यार्थी बसने ये-जा करतात या 45 विद्यार्थ्यांपैकी 23 विद्यार्थी हे नांदुर्खी खुर्द याठिकाणी राहतात. तसेच दुपारचे सत्रात एकूण 68 विद्यार्थी स्कुलबसने ये-जा करत असून 68 पैकी 17 विद्यार्थी नांदुर्खी येथे राहतात. नांदुर्खी खुर्द येथे एकूण 40 विद्यार्थी आहेत.

**मागणी:-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये नांदुर्खी खुर्द येथील ण्कूण 40 विद्यार्थी घेत असल्याने तेथील पालकांनी नांदुर्खी खुर्द या ठिकाणी नवीन स्कुलबस थांबाकरून स्कुलबस सुविधा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. सध्या स्कुलबस ही मौजे नादुर्खी बुद्रुक पर्यंत जात असल्याने या विद्यार्थ्यांना नांदुर्खी बुद्रुक येथे सोडण्यात येते. मौजे नादुर्खी बुद्रुक ते नांदुर्खी खुर्द गांव जाणे व येणे एकूण 2 कि.मी. आहे. तरी मौजे नांदुर्खी खुर्द पर्यंत स्कुलबस सुविधा मिळावी अशी पालकांनी मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** उपरोक्त पालकांची मागणीनुसार मौजे नांदुर्खी खुर्द येथील सकाळ व दुपार येथील एकूण 40 विद्यार्थी शाळेत येत आहेत. या विद्यार्थ्यांकरीता नांदुर्खी खुर्द येथे एक स्कुलबस थांबा देवून पालकांची विनंती मान्य करता येईल. शैक्षणिक वर्ष २००४-१५ मध्ये शाळेपासून मौजे नांदुर्खी बुद्रुक या थांब्यापर्यंत स्कुलबस जाणे व परत येणे अंतरएकूण 11 कि.मी. अंतराकरीता वार्षिक स्कुलबस फी एकूण 1930/- अशी सध्या घेण्यात येत आहे. मौजे नांदुर्खी बुद्रुक ते मौजे नांदुर्खी खुर्द जाणे व येणे अंतर एकूण 2 कि.मी. असल्याने सदरचे अंतराची स्कुलबस फी वेगळी घ्यावी लागेल.

सध्या शाळेपासून सावळविहीर गांव (परशुराम मंदीर) या थांब्यापर्यंत जाणे येणे या 12 कि.मी अंतराकरीता एकावर्षासाठी एकूण रु. 2320/- इतकी स्कुलबस फी घेण्यात येते. त्यानुसार शाळेपासून नांदुर्खी खुर्द गांव जाणे व येणे एकूण अंतर 12 कि.मी. अंतर होत असून या धर्तीवर विद्यार्थ्यांकडून स्कुलबस फी रु. 2320/- घेण्यात येईल. सदरचे अंतराबाबत आकरण्यात येणारी स्कुलबस फी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २५० अन्वये मंजुर करुन घेण्यात आलेली आहे. तरी शाळेपासून मौजे नांदुर्खी गावांपर्यत शैक्षणिक वर्ष २०१४ -१५ मध्ये स्कूलबस करीता एकुण 2320 /- अशी आकारणी करण्यात यावी.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–**

१. नांदुर्खी स्कुलबस ही पुढे को-हाळे गांवापर्यंत जात असल्याने याच स्कुलबस मार्ग वळवुन नांदुर्खी खुर्द येथील विद्यार्थी स्कुलबस मध्ये घेवून येता येईल.
२. तरी उपरोक्त सूचविल्याप्रमाणे स्कुलबस फी नुसार मौजे नांदुर्खी करीता रु. 2320/- फी आकारण्यास मान्यता मिळावी ही विनंती. ज्या पालकांनी नांदुर्खी बुद्रुक पर्यंत स्कुलबस फी भरलेलीअसेल त्या पालकांची सदरची फी रु. 1930/- बेरजेत जमा धरुन त्यांचेकडून वाढीव फरकाची रक्कम रुपये 390/- अशी एकूण 2320/- इतकी वार्षिक स्कुलबस फी घेण्यास मान्यता मिळावी.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३६ मौजे को-हाळे येथे स्कुलबस सुविधा चालू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद–** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक–** दि.15/03/2014 रोजीची सभा निर्णय क्रमांक 250

**प्रास्ताविक–** पालकांचे विनंती वरुन श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु. केजी ते इयत्ता 10 वी पर्यंत शिक्षण घेणा-या शिर्डी ते को-हाळे स्कुलबस सेवा चालू करण्यात यावी असे तोंडी निर्देश दिलेले आहेत. दि.08/07/2014 रोजी सकाळपासून वाहन विभागामार्फत शिर्डी ते को-हाळे गांवापर्यंत विद्यार्थ्यांना स्कुलबस सुविधा देण्यात आलेली आहे.

**मागणीः-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये को-हाळे येथील 15 ते 16 विद्यार्थी शिक्षण घेत असून हे विद्यार्थी सध्या मौजे नांदुर्खी येथील बस थांब्यावर येवून थांबत होते. मौजे नांदुर्खी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



ते को-हाळे गांव जाणे व येणे एकूण 8 कि.मी. असून को-हाळेगांवापासून नांदुर्खीला येण्यासाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही असे पालकांचे म्हणणे असून मौजे को-हाळे गांवापर्यंत स्कुलबस सुविधा मिळावी अशी मागणी केली असून, सदर पालक संस्थानने ठरविल्याप्रमाणे नियमाप्रमाणे फी भरण्यास तयार आहेत.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** उपरोक्त पालकांची मागणीनुसार मौजे को-हाळे येथील सकाळ व दुपारचे सत्रात एकूण 16 विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांकरीता को-हाळे गावांतील श्री साईबाबा मंदीर हा एक स्कुलबस थांबा देवून पालकांची विनंती मान्य करता येईल. शैक्षणिक वर्ष 2014-2015 मध्ये शाळेपासून मौजे नांदुर्खी बुद्रुक या थांब्यापर्यंत स्कुलबस जाणे व परत येणे अंतर एकूण 11 कि.मी. करीता वार्षिक स्कुलबस फी एकूण रु.1930/- सध्या घेण्यात येत आहे. मौजे नांदुर्खी ते मौजे को-हाळे जाणे व येणे अंतर एकूण 8 कि.मी. असल्याने सदरचे वाढीव अंतराची स्कुलबस फी वेगळी घ्यावी लागेल.

सध्या शाळेपासून रुई गांव जाणे व येणे या 19 कि.मी अंतराकरीता एकावर्षासाठी एकूण रु.3380/- इतकी स्कुलबस फी घेण्यात येते. त्यानुसार शाळेपासून को-हाळे गांव जाणे व येणे एकूण अंतर 19 कि.मी. अंतर होत असून या धर्तीवर विद्यार्थ्यांकडून स्कुलबस फी रु.3380/- घेण्यात येईल. सदरचे अंतराबाबत आकारण्यात येणारी स्कुलबस फी मा. व्यवस्थापन समितीचे दि.15/03/2014 रोजीचे सभेत निर्णय क्रमांक 250 अन्वये मंजुर करुन घेण्यात आलेली आहे.

तरी शाळेपासून मौजे को-हाळे गावांपर्यत शैक्षणिक वर्ष 2014-2015 मध्ये स्कूलबस करीता एकुण रु.3380/- फी आकारणी करण्यात यावी असे मत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–**

१. शाळा सध्या दोन सत्रात चालू असल्याने सकाळचे सत्रात सकाळी 7.00 वाजता पहिल्या ट्रीप मध्ये को-हाळे येथून 07 विद्यार्थी शाळेत आणले जातात. सकाळी 11.15 वाजता दुस-या ट्रिपमध्ये केजी विभागाचे 03 विद्यार्थी घरी जाण्यासाठी स्टॉपवर सोडले जातात. दुपारी 12.00 वाजेच्या ट्रिपमध्ये 09 विद्यार्थी शाळेत आणले जातात. दुपारी 1.00 वाजेच्या ट्रिपमध्ये 4 विद्यार्थी घरी जाण्यासाठी स्टॉपवर सोडले जातात.तर सायंकाळी 5 वाजेच्या ट्रिपमध्ये 9 विद्याथी घरी जाण्यासाठी स्टॉपवर सोडले जातात.अशा प्रकारे एकुण 16 विद्यार्थ्यासाठी स्कूलबसेसच्या 5 खेपा होतात.सदरचे वाढीव अंतर झाल्याने स्कुलबस इतर स्कुलबस पेक्षा 15 मिनिटे लवकर पाठवावी लागेल.

२. तरी उपरोक्त सूचविलेल्या स्कुलबस फी नुसार मौजे को-हाळे करीता रु. 3380/- स्कुलबस फी आकारण्यास मान्यता मिळावी ही विनंती.ज्या पालकांनी नांदुर्खी बुद्रुक पर्यत स्कुलबस फी भरलेली असेल त्यापालकांची सदरची फी रु.1930/- बेरजेत जमा धरुन त्यांचेकडून फरकाची वाढीव रक्कम रु.1450/- इतकी अशी एकत्रित रु.3380/- एवढी वार्षिक स्कुलबस फी आकारणेस मान्यता मिळावी

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्राचार्या सौ.इनामदार यांचे अर्जित रजा कालावधीत शालेय व कार्यालयीन कामकाजाची आपसात केलेली पर्यायी व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.4 (भाग ४) दि. 17 ऑगस्ट 2004 रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील 17 ( 2 ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



प्रास्ताविक– सौ. झेड.व्ही.इनामदार यांची संस्थान मध्ये जा.न.एसएसएस/वशी-1/17286/1990 दि.07/06/1990 च्या आदेशानुसार शिक्षक म्हणून नेमणुक करण्यात आली होती.उपरोक्त आदेशाने (पुर्वीचे नांव कार्डोज कॅथरीन फ्रान्सीस)श्रीमती इनामदार यांनी प्राचार्याचे पद भरे पर्यत स्वतःचा शिक्षिकेचा पदभार सांभाळून अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपावेतो पहावा असे कळविले होते.जा.न.एसएसएस/वशी1/4391/1991 दि.24एप्रिल1991 च्या आदेशानुसार(प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका) त्यांची नेमणुक करण्यात आली होती.शालेय दाखल्यानुसार त्यांची जन्म तारीख 16 आक्टोंबर 1954 असून दि.16 आक्टोंबर 2014 रोजी त्यांचे वय 60 वर्षे पूर्ण होत आहे. संस्थान आस्थापना नियमानुसार दि.31 आक्टोंबर 2014 रोजी त्या सेवानिवृत होत आहेत.

श्रीमती इनामदार यांच्या माहे मे 2014 आज अखेर एकुण 154 अर्जित रजा शिल्लक असल्याने त्यांचे शिल्लक असलेल्या अर्जित रजेतून त्यांनी खालीलप्रमाणे रजा मिळावी रजा मिळावी अशी मागणी केलेली होती ती मंजुर करण्यात आली आहे.

| अ.न. | दिनांक पासून –दिनांक पर्यत | एकुण दिवस |
|---|---|---|
| १ | दि.18/06/2014 ते दि.30/06/2014 अखेर | 13 दिवस |
| २ | दि.02/07/2014 ते दि.14/08/2014 अखेर | 44 दिवस |
| ३ | दि.16/08/2014 ते दि.30/10/2014 अखेर | 75 दिवस |
| | एकुण दिवस | 132 दिवस |

शालेय कामकाज दोन सत्रात चालू असल्याने उपरोक्त या अर्जित रजेच्या कालावधीत शाळेकडील कार्यालयीन व्यवस्थापन कामकाज,जि.प. पंचायत समिती शालेय कामकाज ,शिक्षक कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचारी यांचेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी व शाळेकडील इतर कामकाज मोठया प्रमाणावर अडचणी येऊ नयेत, याकरीता शाळासंहितानुसार सेवाजेष्ठतेनुसार प्राथमिक विभागाकडील सहा. शिक्षक श्रीमती शिल्पा सुरेश वैदय व माध्यमिक विभागाकडील सहा. शिक्षक श्री आसिफ अल्लाबक्ष तांबोळी यांचेकडे उपरोक्त रजेच्या कालावधीत सकाळ व दुपार असे दोन सत्रात शाळेकडील कामकाज पाहाण्याचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच श्री असिफ अल्लाबक्ष तांबोळी यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज पाहणे व आवश्यक त्या कागदपत्रांवर स्वाक्षरीकरणेबाबत अधिकार देण्यात आलेला आहेत,परंतु त्यांचेकडे वर्गावर शिकवण्याची जबाबदारी असल्याने वर्ग सांभाळून कामाचा अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे.

मागणी- शाळा संहिता नियमानुसार एका सहा.शिक्षकाला एका आठवडयात साधारणपणे घडयाळी १७ तास काम करणे आवश्यक आहे. श्री तांबोळी यांचेकडे माध्यमिक विभागाचे इयत्ता ८ वी ते १०वी चे वर्ग असून त्यांचा गणित हा महत्वाचा विषय आहे,शिवाय दैनंदीन कार्यालयीन कामकाज पहाणे, सर्व सहा. शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी यांचेवर देखरेख ठेवणे ही जबाबदारी असल्याने त्यांच्या कडील कामाच्यातासिका कमी करता येतील.शाळा संहिता नियमानुसार विहित केलेप्रमाणे आठवडयातून ४ ते ६ तास प्रत्यक्ष शिकविण्याचे काम मुख्याध्यापकांना करावे लागते,म्हणजे आठवडयातून किमान ८ तासिका शिकविण्याचे काम करावे लागेल असे आहे. तसेच शाळा संहितानुसार नियमानुसार श्री तांबोळी यांचेकडे एका आठवडयातून इयत्ता १० वी चे वर्गाकडील ८ तासिका देता येतील, तसेच त्यांचा उर्वरित कामाचा पदभार पाहणेकामी रोजंदारीवर एक अनुभवी शिक्षक नेमणूक करता येईल. श्री तांबोळी यांचेकडील वर्गावरील पदभार सांभाळणेकामी व वर्गावर शिकविणेकामी कामगार विभागामार्फत एक रोजंदारी शिक्षक नेमण्यास मान्यता मिळावी ही नम्र विनंती.संस्थानकडे असलेल्या रोजंदारी कर्मचा-या मध्ये सध्या बी.एस्सी.बी.एड पदाचा उमेदवार उपलब्ध नसल्याने शालेय आस्थापनेकडे सहा. शिक्षक पदांसाठी ज्या उमेदवारांतून बी.एस्सी.बी.एड उमेदवार निवडता येईल. श्री तांबोळी यांचा वर्गावर शिकविण्याचा कार्यभार तात्पुरता इतर शिक्षकांकडे सोपविण्यात आल्याने त्यांचेकडील कामाचा कार्यभार वाढलेला आहे.या प्रसंगी सहा. शिक्षकांना रजा / सुट्टी दयावयाची झाल्यास मोठया प्रमाणावर अडचण निर्माण होत आहे. प्रसंगी शिक्षक कर्मचा-यांना सुट्टी देता येत नसल्याने शिक्षकांचा शालेय

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



व्यवस्थापनाबाबत नाराजीचा सूर दिसून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.सहा.शिक्षकांना वेळेवर रजा /सुट्टी मिळाली नाही तर त्याचा परीणाम त्यांचे कामावर होऊ शकतो.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– शाळेची एकुण पटसंख्या 2245 असून शाळेकडे पुर्णपणे प्राचार्य असणे गरजेचे आहे.जेणेकरुन दोन्ही सत्रांतील शालेय कामकाजावर प्राचार्या यांचे नियंत्रण राहील असे नम्र मत आहे. मा.प्राचार्या इनामदार यांचे रजेच्या कालवधीत अशा प्रकारे कामाचे नियोजन करण्यात आलेले आहे.परंतू शाळेकडील कार्यालयीन कामकाज पहाणे व इतर पंचायत समिती जिल्हा परिषद कामे पाहणेकामी शाळेकडे पुर्णवेळ प्राचार्याचे पद भरावे लागेल.सदरचे पद शाळासंहिता नुसार सहा. शिक्षकांचे सेवाजेष्ठते नुसार व शैक्षणिक पात्रता पाहुन भरावे लागेल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– शाळेकडील सध्या असलेले केजी वर्ग च( पूर्व प्राथमिक),इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक विभाग व इयत्ता ८ वी ते १० वी माध्यमिक विभाग एकुण पटसंख्या 2245 लक्षात घेता पूर्णपणे प्राचार्या पद असणे गरजेचे आहे.मा. प्राचार्या सौ. इनामदार यांच्या सेवानिवृती नंतर श्री तांबोळी यांचेकडे सेवाजेष्ठजेनुसार पुर्णवेळ प्र प्राचार्य पदाचा पदभार सोपविण्यात आला तर श्री तांबोळी यांच्या रिक्त जागी माध्यमिक विभागाकडे बी.एस्सी.बी.एड पदाचा नवीन कंत्राटी शिक्षक कामगार विभागामार्फत भरती करावा लागेल व श्री तांबोळी यांचेकडील संपूर्ण कार्यभार सदरचे नवीन भरती केलेल्या कंत्राटी शिक्षकांकडे वर्ग करावा लागेल असे नम्र मत आहे.दि.३१ आक्टोबर २०१४ रोजी प्राचार्या सौ. इनामदार सेवानिवृत होत असल्याने १ सप्टेंबर २०१४ पासून कामगार विभागामार्फत बी.एस्सी.बी.एड पदाचा कंत्राटी सहा. शिक्षक नेमणूक करावा लागेल. सदरचा विषय धोरणात्मक असल्याने याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्राचार्या श्रीमती इनामदार यांचे पदाचा अतिरिक्त व तात्पुरता कार्यभार सध्या श्री.तांबोळी यांचेवर तात्पुरता सोपविण्यात यावा. सदरहू रिक्त असलेले प्राचार्याचे पद पदोन्नतीने भरण्यात यावे, त्यासाठी सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता तसेच पाच वर्षांचे गोपनीय अहवाल यासह ५ उमेदवारांच्या माहितीचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेत सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३८** **राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रवेश नियमावली व प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने गठीत केलेल्या समितीमध्ये आपल्या संस्थेचे प्राचार्य यांच्या नियुक्तीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १७ (२ - ढ) मध्ये "सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील." अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना-** सध्या राज्यात ४१३ शासकीय व २५८ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थी प्रवेश २०१३ पासून Online पध्दतीने करण्यात येतात.शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून शासकीय औ.प्र.संस्थेबरोबरच खाजगी औ.प्र.संस्थाचे प्रवेश online पध्दतीने करण्यात येणार आहेत. राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रवेश नियमावली (Guideline) व प्रशिक्षण शुल्क निश्चीत करण्यासाठी शासनाने सात सदस्यांची समिती गठीत केली आहे.त्यामध्ये वरील संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयाने आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांचा समावेश करण्यात आला आहे.आपल्या संस्थेचा राज्यातील धोरण निश्चिती कामात सहभाग ही महत्वपुर्ण घटना म्हणता येईल.

शासनानी गठीत केलेली समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव पदनाम | समितीतील स्थान |
|---|---|---|
| १ | डॉ. सुभाष महाजन ,संचालक,तंत्र शिक्षण | अध्यक्ष |
| २ | डॉ.आर.आर.आसावा, प्रभारी संचालक,प्रशिक्षण | सदस्य |
| ३ | श्री के.एम.गेडाम,निवृत्त संचालक | सदस्य |
| ४ | श्री प्रकाश पागे, | सदस्य |
| ५ | खाजगी औ.प्र.संस्थेचे प्रतिनिधी- | सदस्य |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| | १.श्री शेखर निकम,खाजगी औ.प्र.संस्था,रत्नागिरी<br>२. श्री पटणे, प्राचार्य, खाजगी औ.प्र.संस्था, शिर्डी | |
| ६ | श्री योगेश पाटील,उपसंचालक (प्रशिक्षण) | सदस्य सचिव |

यापुर्वी संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयाचे राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी प्रवेश शुल्क निश्चीत करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव ( मा.श्रीमती जॉयस शंकरन ) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.त्या समितीमध्येही आपल्या संस्थेचे प्राचार्य यांचा समावेश करण्यात आला होता.

**मागणी-** सध्या गठीत झालेल्या समितीने दोन महिन्यात अहवाल सादर करण्याचे नियोजन देण्यात आलेले आहे.समितीतील अशासकीय संस्थांना अनुज्ञेय प्रवासभत्ता संचालनालयाच्या सन २०१४-१५ मधील मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा, असे शासन निर्णयात म्हटले आहे.तथापी समितीतील एखादा सदस्य आस्थापनेवर (अशासकीय किंवा निमशासकीय )कार्यरत असल्यास यासाठीचा प्रवासभत्ता त्या-त्या संस्थेकडून घेण्यास सांगितले जाते.अशी स्थिती झाल्यास सदर खर्च संस्थानकडून करावा लागेल.

वरील संदर्भ क्र.०३ च्या पत्राने राज्यातील सहा विभागातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयात त्या-त्या विभागातील खाजगी औ.प्र.संस्थांची बैठक आयोजित करुन समितीच्या कामकाजासाठी आवश्यक माहिती तयार करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. तर सदर संचालनालयाच्या नाशिक प्रादेशिक कार्यालयाने संदर्भ क्र.०४ चे पत्राने दि.१९/०८/२०१४ रोजी याबाबतची बैठक आयोजित करुन बैठकीला उपस्थित रहाणेबाबत कळविले आहे.

**अभिप्राय-** राज्यातील सर्व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांबाबत महत्वपूर्ण कामामध्ये आपल्या संस्थेला शासनाने सहभागी केल्याची माहिती अवलोकनार्थ मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.३९ झेनॉन लाईट सोर्सकरीता बल्ब खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयाकरीता सन १९९९ यावर्षी मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे भारतातील तेव्हांचे अधिकृत विक्रेते मे.चिमको इंटरनॅशनल, मुंबई यांचेकडुन विविध प्रकारचे लॅप्रोस्कोपी व युरोलॉजी इन्स्ट्रुमेंट सेट झेनॉन लाईट सोर्स सह एकुण रू.२,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहेत. सदर इन्स्ट्रुमेंट सेटची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते. परंतु दुरूस्तीकरीता जर काही स्पेअर पार्ट बदलणेची आवश्यकता असेल तेव्हा पुरवठाधारक कंपनीकडुन दुरूस्त करून घेतले जातात.

सध्या झेनॉन लाईट सोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे जनरल ओ. टी विभागाने त्यांचे पत्र दि.०६/०५/२०१४ अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर झेनॉन लाईट सोर्सची तपासणी केली असता झेनॉन बल्ब खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. कंपनीने झेनॉन बल्बची ५०० तासांची वॉरंटी दिलेली आहे. सदरचा झेनॉन बल्ब यापुर्वी ०९/०८/२०१२ रोजी खराब झालेमुळे बदलणेत आलेला आहे. दि. ०९/०८/२०१२ ते दि. ०४/०५/२०१४ या कालावधीत अंदाजे एकुण ९८७ रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यासाठी सदर लाईट सोर्स २९६१ तास वापरला गेलेला आहे. (परिशिष्ट)

त्यानुसार झेनॉन बल्ब साठी त्यांचे पत्र क्र. २०१४ २० दि. ०८/०५/२०१४ अन्वये सर्व करांसहीत एकुण रू.६१,९६३/- (अक्षरी रू. एकसष्ट हजार नउशे त्रेसष्ट मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीने दि. २६/०६/२०१४ चे ई मेल द्वारे सदर एकुण रक्कम बल्ब बदललेनतंर अदा करणेस स्वीकृती दर्शविली आहे. सदर झेनॉन बल्बसाठी कंपनी ५०० तासांची वॉरंटी दिलेली आहे. तसेच कंपनीने त्यांचे दि.२४/०६/२०१४ चे ई- मेल अन्वये सदर बल्बचे दर दोन वर्षाकरीता रू.६१,९६३/- इतका निश्चित करू शकतो असे कळविले आहे. यापुर्वी बल्ब अंदाजे २ वर्षे वापरलेला आहे. सदर लॅप्रोस्कोपी व युरोलॉजी इन्स्ट्रुमेंट सेटकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट फक्त मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडेच मिळतात.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी झेनॉन लाईटसोर्स दुरूस्तीकामी आवश्यक असणारा झेनॉन बल्ब मे.कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडुन खरेदी करणेस व त्याकरीता येणा-या एकुण रू.६१,९६३/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,झेनॉन लाईटसोर्स दुरुस्तीकामी आवश्यक असणारा झेनॉन बल्ब मे.कार्ल स्टोअर्स, एन्डोस्कोपी इं.प्रा.लि., नवी दिल्ली यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या एकूण रु.६१,९६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील संगणक दुरुस्ती देखभालीसाठी आवश्यक असणारे संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये संगणकीय प्रणाली कार्यान्वीत असुन दोन्ही रुग्णालयाचे सर्व कामकाज संगणकीकृत करण्यात आले आहे. सदर संगणक संच कायम वापरात असल्याने वेळोवेळी नादुरुस्त होतात त्यांचे दुरुस्ती करिता स्पेअर पार्टसची आवश्यकता असते.

उपरोक्त संदर्भान्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकुण किती संगणके आहेत व त्यांच्या दुरुस्ती व देखभालीकरिता कोण-कोणते संगणकीय साहीत्य, किती प्रमाणात खरेदी करावयाचे याचा आकडेवारीसहीत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे नमुद करण्यात आले होते.

संगणक व संगणकीय साहीत्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| सन | सीपीयु | प्रिन्टर | युपीएस | स्विच | सर्व्हर | लॅपटॉप |
|---|---|---|---|---|---|---|
| २००६ | १११ | ३५ | १२७ | १६ | ०४ | ०१ |
| २००७ | - | २७ | - | - | - | - |
| २००९ | - | १६ | - | - | - | - |
| २०१३ | १० | १० | १० | - | - | - |
| (अ) एकुण | १२१ | ८८ | १३७ | १६ | ०४ | ०१ |
| देणगी स्वरुपात | | | | | | |
| २०११ | - | - | - | ०२ | - | - |
| २०१३ | १२ | - | - | - | - | - |
| २०१४ | १८ | १५ | - | - | - | - |
| (ब) एकुण | ३० | १५ | - | ०२ | - | - |
| एकुण (अ) + (ब) | १५१ | १०३ | १३७ | १८ | ०४ | ०१ |

उपरोक्त नमुद केलेल्या संगणक व संगणकीय साहीत्यापैकी कार्यान्वीत, पुर्णपणे बंद पडणेच्या स्थितीत आहेत याचा तपशिल खालीलप्रमाणे...

| तपशिल | एकुण संख्या | सध्या कार्यान्वीत | पुर्ण बंद पडलेले | बंद पडणेच्या स्थितीत |
|---|---|---|---|---|
| संगणक | १५१ | ९० | ६१ | ६० |
| प्रिन्टर्स | १०३ | ७४ | २१ | ५९ |
| युपीएस | १३७ | ५६ | ८१ | ५६ |
| स्विचेस | १८ | १६ | ०२ | १४ |
| सर्व्हर | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| लॅपटॉप | ०१ | ०१ | ० | ०१ |

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता संगणक दुरुस्तीकामी आवश्यक असणारे स्पेअर-पार्टस् व संगणकीय साहीत्य आर्थिक वर्ष २०१४-२०१५ करिता विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन- २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता संगणक दुरुस्तीकामी आवश्यक असणारे स्पेअर-पार्टस तसेच संगणकीय साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४१ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छता कामाकरिता फेर ई-निविदा-२ मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छतेच्या कामासाठी फेर ई-निविदेची जाहिरात देऊन ई-निवदा मागविण्यास दि. १५.०३.२०१४ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २०१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

हाऊसकीपींग कामासंबंधीत जनसंपर्क कार्यालयामार्फत विविध वर्तमान पत्रातुन जाहिरात व श्री साईबाबा हॉस्पिटलचे ई.डी.पी. विभागामार्फत संकेतस्थळावर फेर ई-निविदा बाबतची माहिती प्रसिध्द करण्यात आली होती.

महाराष्ट्र राज्याच्या संकेतस्थळावर फेर ई-निविदा तांत्रिक बीडचे (Technical Bid) कागदपत्र ऑनलाईन अपलोड करण्याची अंतीम मुदत दि. ३०.०५.२०१४ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत ठेवण्यात आली होती. तसेच स्कॅन केलेले कागदपत्रांचे व इतर मागणी केलेले कागदपत्रांच्या सत्यप्रती (Soft Copy) शिर्डी कार्यालयात दि. ०३.०६.२०१४ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत सादर करावेत, अशी प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ३ कंपन्यांचे टेक्निकल बीड व प्राईस बीड ऑनलाईनद्वारे कार्यालयीन वेळेपुर्वी जमा झाले होते.

परिशिष्ट 'अ'

| अ.नं. | निविदाधारकांची नावे | आवक नंबर व दिनांक | लिफाफा संख्या |
|---|---|---|---|
| १. | संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. मुंबई | ८४५/ दि. ०२.०६.२०१४ | ०१ |
| २. | बी.एस.ए कार्पोरेशन लि. पुणे | ८४६/ दि. ०२.०६.२०१४ | ०१ |
| ३. | अपडेटर सर्व्हिसेस प्रा. लि. चेन्नई | ३६३९/ दि. ०२.०६.२०१४ | ०१ |

निविदेच्या अटी व शर्ती क्र. ०२ मध्ये निविदा ऑनलाईन भरावयाची असल्याने टेक्निकल बीडचा एकच लिफाफा मागविण्यात येत आहे तसेच सदर बीडमध्ये प्राईस बीडची माहिती देऊ नये व प्राईस बीड ऑनलाईन भरावे असे नमुद केले होते.

जा.नं. ८४० दि. ०३.०६.२०१४ रोजीच्या लेखाशाखेकडील आदेश पत्रानुसार टेक्निकल बीडचे लिफाफे दि. १४.०६.२०१४ रोजी मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष उघडुन तपासुन घेण्यात आलेले आहेत. Technical Document मध्ये दिलेल्या अटी शर्तीनुसार निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन निविदाधारकांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण देण्यात आलेले होते.

परिशिष्ट 'ब'

| अ.नं. | निविदाधारकांची नावे | एकुण गुण | मिळालेल गुण |
|---|---|---|---|
| १. | संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. मुंबई | १०० | ७७.५ |
| २. | बी.एस.ए कार्पोरेशन लि. पुणे | १०० | ४४ |
| ३. | अपडेटर सर्व्हिसेस प्रा. लि. चेन्नई | १०० | ९० |

उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामी प्राप्त झालेल्या तीन निविदांपैकी दोन पात्र व एक अपात्र आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर निविदांमध्ये स्पर्धा होऊ शकत नसल्याने फेर ई-निविदा मागविण्यात याव्यात असा मा. मुख्यलेखाधिकारी सो. यांनी शेरा दिला आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामी फेर ई-निविदा-२ मागविणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देणेस व याकामी येणा-या खर्चास तसेच संस्थान व महाराष्ट्र राज्याच्या संकेतस्थळावर जाहिरात देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४२ कार्डीओलॉजिस्ट यांना पुन:नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील अप्लीकेशन नं. २७९७/२०१४ मधील मा. न्यायालयाचे दि. १९/०३/२०१४ रोजीचे आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व व्हिजीटींग पध्दतीने तात्पुरती नेमणूक करणेकरीता मान्यता देण्यात आली आहे.

त्यास अनुसरुन सदरचे पदाकरीता हॉस्पीटलकडे उपलब्ध असलेल्या अर्जदार उमेदवारांच्या मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कोर्टाशी सलग्न असलेले वैद्यकिय अधिकारी डॉ. पी. आर. कानडे, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी व प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांची समिती गठीत करुन मुलाखतीस हजर असलेल्या उमेदवारांच्या दि. २३/०३/२०१४ रोजी मुलाखती घेण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीमधून खालील उमेदवारांच्या व्हिजीटींग व कंत्राटी पध्दतीने कार्डीओलॉजीस्ट पदावर तात्पुरते सहा महिन्यांसाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं | नाव | नेमणूक प्रकार | जावक नंबर | हजर तारीख | नेमणूक संपणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | डॉ.शितलकुमार प्रकाश हिरण | व्हिजिटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ९००९/२०१४, दि.२७/०३/२०१४ | ०२/०४/१४ | ०१/१०/२०१४ |
| ०२ | डॉ. विनोद मदन विजन | व्हिजिटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ९०१०/२०१४, दि.२७/०३/२०१४ | हजर झाले नाहीत. | हजर झाले नाहीत. |
| ०३ | डॉ. गिरिश भास्करराव काळे | व्हिजिटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ९०११/२०१४, दि.२७/०३/२०१४ | ०७/०४/१४ | ०६/१०/२०१४ |
| ०४ | डॉ.देवराव रामराव ठेंगे | व्हिजिटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ९०१२/२०१४, दि.२७/०३/२०१४ | ०४/०४/१४ | ०३/१०/२०१४ |
| ०५ | डॉ. मुकुंद रामप्रसाद बजाज | व्हिजिटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ९०१३/२०१४, दि.२७/०३/२०१४ | ०२/०४/१४ | ०१/१०/२०१४ |
| ०६ | डॉ. प्रशांत नारायणराव पवार | कंत्राटी इंटरव्हेंशनल कॉडीओलॉजीस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ९००८/२०१४, दि.२७/०३/२०१४ | २७/०३/१४ | २६/०९/२०१४ |
| ०७ | डॉ. मनोहर विश्वासराव शिंदे, | कंत्राटी इंटरव्हेंशनल कॉडीओलॉजीस्ट | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ ६२४/२०१४, दि.२७/०३/२०१४ | ०२/०५/१४ | ०१/११/२०१४ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १ ते ५ चे उमेदवारांच्या व्हिजीटींग पध्दतीने पॅनल तयार करण्यात आलेला आहे. त्यापैकी अ.नं. २- डॉ. विनोद मदन विजन हे हजर झालेले नाहीत. अ.नं. १ व ३,४,५ चे कार्डीओलॉजीस्ट यांना एन्जोग्राफीचे प्रती प्रोसिजरवर रु. ३००/-, ॲन्जोप्लास्टीच्या प्रती प्रोसिजरसाठी रु. ३,०००/- व ओपी डी, टीएमटी, २-डी इको इ. तपासण्यांसाठी संस्थान सध्या देत असलेले इंन्सेंटीव्ह देण्यात येत आहे.

अ.नं. ६ व ७ चे उमेदवार अनुक्रमे डॉ. प्रशांत नारायण पवार व डॉ. मनोहर विश्वासराव शिंदे यांची पूर्णवेळ इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली आहे. डॉ. प्रशांत नारायण पवार यांना सर्वसमावेशक रु. १,५०,०००/- (अक्षरी रु. एक लाख पन्नास हजार मात्र) व डॉ. मनोहर विश्वासराव शिंदे यांना सर्वसमावेशक रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लाख) मासिक मानधन देण्यात येत आहे.

उपरोक्त नेमणूकांस मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७५ नुसार कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर कार्डीओलॉजीस्ट यांच्या नेमणूकीची मुदत उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. त्यांना पुढील नेमणूक देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात आलेले आहे. परंतु, अद्यापपर्यंत न्यायालयाचा याबाबत आदेश झालेला नाही. सदरचे कार्डीओलॉजीस्टच्या नेमणूकीची मुदत संपुष्टात येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु झालेली असल्याने याअंतर्गत कार्डीयाकचे जास्त रुग्ण येत आहे. या रुग्णांवर उपचार करणेकामी उपरोक्त कार्डीओलॉजीस्टची आवश्यकता आहे. याकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशास अधिन राहुन उपरोक्त तक्त्यातील अ.नं. २ व्यतिरिक्त इतर सर्व कार्डीओलॉजीस्ट यांना पूर्वीचेच अटी-शर्तीवर व मानधनावर पुढील ०६ महिने अथवा जाहिरातीव्दारे सदरचे पदांवर कार्डीओलॉजीस्टची नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पून:र्नेमणूक देता येईल.

तरी, उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी सिव्हील अॅप्लीकेशन मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. सहा महिन्याचे मुदतीवर तदर्थ म्हणून मा.उच्च न्यायालयाची प्रस्तावित कार्डीओलॉजीस्ट यांना ०६ महिन्यासाठी मंजुरी असून ही मुदत संपल्यानंतर सदरहू कार्डीओलॉजीस्ट यांना सेवामुक्त करावे लागेल. तेव्हा ताबडतोब सिव्हील अॅप्लीकेशन चालवून घेऊन, त्यांना पुढील ०६ महिन्याची मुदत वाढवून घेण्यात यावी, याबाबत संस्थान वकिलांना तसेच सांगणेत यावे.**

There is likely to be taken up subject for discussion for increase in Staffing pattern, which shall be included 2 to 4 doctors to be appointed by new vacancies and after decision is being taken the same shall be submitted to the Government for approval. After Governments approval the committee shall be proceed for filling up those vacancies but in the meanwhile as per the order of the Hon.High Court dated 10.03.2014 in Civil Application No.2797 of 2014, will have to be requested to be continue for next 6 months period and such Civil Application will be as far as for regular posts concerned, in other departments on the vacant posts the Hogh Court appointed committee includes Director of Health services, Government of Maharashtra, Director of Medical Education and Research, Government of Maharashtra and third member shall be selected by the Administrative Committee of the appliant who shall be expert in the field. But last time as per reports, members of the committee informed to the administration branch of the Trust that, they will send their representatives. Therefore, members of the committee be informed that they should remain present personally as per order of the Hon.High Court and in their presence only matter will be proceeded. However, this fact will be brought to the notice of the High Court. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Elisa Washer with UPS खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी विभागाने दि. २५/११/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Elisa Washer with UPS ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे एकूण ०२ Elisa Washer असुन त्यापैकी ०१ Elisa Washer हे सन २००६ मध्ये खरेदी केलेले आहे, तर दुसरे Elisa Washer हे सन १९९९ मध्ये खरेदी केलेले असुन मशीन जुने झाल्यामुळे ते व्यवस्थित काम करत नाही व सदर मशीन फार जुने झालेले आहे. त्यामुळे त्यांनी नवीन मागणी केलेली आहे.

सदरहू एक नग Elisa Washer with UPS खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईनाथ रक्तपेढी विभागाचे दि. २५/११/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०६/०६/२०१४).

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



<u>**विभागाचा अभिप्राय / सुस्पष्ट मत –**</u> सध्या त्यांचेकडे एकूण ०२ Elisa Washer असुन त्यापैकी ०१ Elisa Washer हे सन २००६ मध्ये खरेदी केलेले आहे तर दुसरे Elisa Washer हे सन १९९९ मध्ये खरेदी केलेले असुन मशीन जुने झाल्यामुळे ते व्यवस्थित काम करत नाही व सदर मशीन फार जुने झालेले आहे. त्यामुळे त्यांनी नवीन मागणी केलेली आहे, त्यामुळे घेण्यास हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग Elisa Washer with UPS विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.१,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग Elisa Washer with UPS विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४४ वैद्यकिय अधिक्षक या पदाचा पुर्वलक्षी प्रभावाने अतिरिक्त भत्ता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. संजय किसन पठारे यांनी दि. १८/०८/२०१४ रोजीचे अर्जान्वये सन-२०१० पासून विविध प्रशासकीय पदांवर केलेल्या कामकाजासाठी संस्थान नियमानुसार लागू असलेला आर्थिक भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने मिळावा, अशी विनंती केली आहे.

जा.नं. एसएसएस/वशी-०१/६२५१/२००६ दि. १३/०५/२००६ नुसार डॉ. संजय किसन पठारे हे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आर एम ओ या पदावर दि. १७/०५/२००६ पासून कामावर रुजु झालेले आहेत. जा. नं. एसएसएस/वशी-०१/३५३/२००७ दि. १४/०२/२००७ नुसार त्यांचे पदनामात आर एम ओ ऐवजी सी एम ओ असा बदल करण्यात आलेला आहे. त्यांना दि. ०१/०८/२००७ पासून वेतनश्रेणी लागू करुन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

रुग्णालयांचे कामकाजाचे सोईच्या दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिक्षक या पदाचा कार्यभार तात्पुरता डॉ. कौशिक हिरजीभाई मकवाना, वैद्यकिय प्रशासक- श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडे देण्यात आल्याने जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/७५६/२०११ दि. २३/११/२०११ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय प्रशासक या पदाचे कामकाज तात्पुरत्या स्वरुपात डॉ. संजय किसन पठारे, सी एम ओ यांचेकडे देण्यात आलेले होते.

दरम्यानचे काळात श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय संचालक हे पद रिक्त असल्याने जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२७८/२०१२ दि. २६/०६/२०१२ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय संचालक या पदाचा तात्पुरता कार्यभार डॉ.मकवाना यांचेकडे सोपवून श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिक्षक या पदाचा कार्यभार तात्पुरत्या स्वरुपात डॉ. पठारे यांचेकडे सोपविण्यात आलेला असून ते दि. ०२/०७/२०१२ पासून आजतागायत सदर पदाचा कार्यभार सांभाळत आहेत. या कामाबाबत त्यांना अतिरिक्त भत्ता देण्यात येत नाही व डॉ. मकवाना यांनाही वैद्यकिय संचालक या पदाचा कार्यभार असे पर्यंत अतिरिक्त भत्ता देण्यात आलेला नाही.

जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/९९३/२०१३ दि. १६/०३/२०१४ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय संचालक या पदाचा कार्यभार डॉ. कौशिक मकवाना यांचेकडून काढून घेऊन तो डॉ. रामायणम व्यंकट प्रभाकरराव, वरिष्ठ भूलतज्ञ यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेला आहे. सदर पदाचे अतिरिक्त कार्यभाराबाबत त्यांना दरमहा रु. ७५०/- देण्यात येत आहे.

त्यानुसार डॉ. संजय किसन पठारे, सी.एम.ओ. हे श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिक्षक या पदाचा कार्यभार सांभाळत असल्याने त्यांचेकडे या पदाचा तात्पुरता कार्यभार असेपर्यंत त्यांना दरमहा रु. ७५०/- मात्र अतिरिक्त कार्यभार भत्ता त्यांनी अर्ज सादर केलेल्या तारखेपासून लागू करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.संजय किसन पठारे, सी.एम.ओ., श्री साईनाथ रुग्णालय यांना वैद्यकिय अधिक्षक या पदाचा तात्पुरता कार्यभार सोपविल्यापासून त्यांचेकडे असेपर्यंत त्यांना दरमहा रु. ७५०/- मात्र अतिरिक्त कार्यभार भत्ता पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात यावा. हा कायदेशीर व आवश्यक खर्च असल्यामुळे त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४५ डॉ.मयुर विलास म्हात्रे, न्यूरो सर्जन यांची मुलाखत व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. मयुर विलास म्हात्रे यांनी दि. ०१/०९/२०१४ रोजीचा विनंती अर्ज सादर केला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, त्यांना टोकीओ वूमन्स हॉस्पीटल, जपान येथून मेंदूवरील बायपास सर्जरीचे ट्रेनिंगसाठी निमंत्रीत केले

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आहे. सदरचे ट्रेनिंग तिन महिन्याचे असून त्यासाठी त्यांनी परवानगी व शैक्षणिक रजेची मागणी केली आहे. सदरचे ट्रेनिंग संपलेनंतर ते पुन्हा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये काम करू इच्छितात. तसेच त्यांनी अशीही विनंती केली आहे की, त्यांनी न्युरोसर्जन पदासाठी संस्थानकडे अर्ज केलेला आहे. सदरचे पदाचे मुलाखतीसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मुलाखत घेण्यास परवानगी द्यावी असे म्हटले आहे.

डॉ मयुर म्हात्रे हे दि. ०३/०६/२०१३ ते दि. ०२/०५/२०१४ या कालावधीत श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरोसर्जन पदावर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सेवेत होते.

रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण २९ प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरचे जाहिरातीमध्ये न्यूरो सर्जन या पदाचा समावेश असून डॉ. म्हात्रे यांनी सदरचे पदाकरीता अर्ज केलेला आहे.

तथापि, जाहिरातीव्दारे सदरची पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जनची आवश्यकता असल्याने डॉ. म्हात्रे यांना पून:र्नेमणूक देणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केलेले आहे.

डॉ. म्हात्रे हे टोकीओ वूमन्स हॉस्पीटल, जपान येथे मेंदूवरील बायपास सर्जरीचे ट्रेनिंगकरीता तीन महिन्यांचे कालावधीसाठी जाणार आहेत. दरम्यानचे काळात जाहिरातीव्दारे न्यूरो सर्जनचे पदासाठी मुलाखती झाल्यास त्यात माझी मुलाखत व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावी, अशी विनंती डॉ. म्हात्रे यांनी दि. ०१/०९/२०१४ रोजीचे अर्जान्वये केली आहे.

तरी, डॉ. मयुर विलास म्हात्रे यांची मुलाखत व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४६ मानद व्हिजीटींग बालरोग तज्ञ म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. रविंद्र मुरलीधर दिघे, शिरडी यांनी दि. १६/०८/२०१४ रोजी अर्ज सादर करुन व्हिजीटींग बालरोग तज्ञ पदावर मुदतवाढीसाठी विनंती केली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये बालरोग तज्ञ या पदाची ०१ जागा व श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये ०३ अशा एकूण ०४ जागा जागा मंजूर आहेत. श्री साईनाथ रुग्णालयात बालरोग विभाग कार्यान्वीत आहेत. सध्या डॉ. रचना सुनिल साबळे ह्या एकट्याच बालरोग तज्ञ म्हणून कार्यरत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये बालरोग विभाग कार्यान्वीत नाहीत.

श्री साईनाथ रुग्णालयात बाल रुग्णांची संख्या जास्त असून दिवसेंदिवस ती वाढतच आहे. डॉ. रचना साबळे रजेवर असल्यास बाल रुग्णांवर उपचार करणेस अडथळे येत होते. याकरीता आणखी एका बालरोग तज्ञाची आवश्यकता असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९५ व जा.नं. एआर/९४०/२०१२ दि. २२/०५/२०१२ अन्वये डॉ. रविंद्र मुरलीधर दिघे, शिरडी यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे मानद व्हिजीटींग बालरोग तज्ञ म्हणून प्रति व्हिजीट रु. ३००/- मात्र मानधनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. सदरची मुदत दि. ३१/०५/२०१३ अखेर संपुष्टात आली.

या कालावधीमध्ये डॉ. रविंद्र दिघे यांनी श्री साईनाथ रुग्णालयात आवश्यकतेनुसार व ऑनकॉलनुसार वेळोवेळी त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. तथापि दि. ०१/०६/२०१३ ते दि. ३१/०७/२०१४ या कालावधीत डॉ. दिघे यांना ऑनकॉल बोलविण्यात आलेले नव्हते. उपरोक्त कालावधीमध्ये ज्या-ज्या वेळी त्यांना ऑनकॉल बोलविले होते. त्या-त्यावेळी ते हजर राहुन त्यांनी आदेशात नमुद केलेप्रमाणे समाधानकारक काम केलेले आहे.

डॉ. दिघे यांचे समाधानकारक काम व श्री साईनाथ रुग्णालयात बालरोग तज्ञाची आवश्यकता विचारात घेऊन त्यांना पुढील ११ महिनेसाठी नेमणूक देणेस हरकत नाही, सध्या श्री साईनाथ रुग्णालयात एकच बालरोग तज्ञ असून आठवड्यातून ३ दिवसच ओ.पी.डी. बघतात. इतर दिवशी रुग्णांचे हाल होतात. तातडीने घेणेस मान्यता असावी, असा अभिप्राय प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दिलेला आहे.

रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण २९ प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये बालरोग तज्ञ या पदाचे एका जागेचा समावेश आहे.

तथापि जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार आहे. रुग्ण सेवेत अडथळा येऊ नये म्हणून प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्रायाप्रमाणे डॉ. रविंद्र मुरलीधर दिघे यांची

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



पूर्वीच्या अटी-शर्तीनुसार प्रति व्हिजीट रु. ३००/- मानधनावर ११ महिने कालावधीकरीता मानद व्हिजीटींग बालरोग तज्ञ म्हणून नेमणूक करता येईल. यास मा. हायकोर्टाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

मागील नेमणूकीच्या कालावधीत माहे जून २०१२ ते माहे जानेवारी २०१३ या कालावधीत त्यांनी एकूण १२ व्हिजीट दिलेल्या असून याकामी प्रति व्हिजीट रु. ३००/- प्रमाणे एकूण रु. ३,६००/- मानधन देण्यात आलेले आहे.

तरी, डॉ. रविंद्र मुरलीधर दिघे यांना पूर्वीच्या अटी-शर्तीनुसार प्रति व्हिजीट रु. ३००/- मानधनावर ११ महिने कालावधीकरीता मानद व्हिजीटींग बालरोग तज्ञ म्हणून नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८९ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय विचारात घेता व रुग्णालयांसाठी जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्यामुळे रुग्ण सेवेत अडथळा येऊ नये म्हणून तसेच मा.उच्च न्यायालयाचे दि.२५.१०.२०१२ रोजीचे आदेशानुसार नेमणूका करणयास मनाई असल्यामुळे, सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत डॉ.रविंद्र मुरलीधर दिघे, शिरडी यांना कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रति व्हिजीट रु.३००/- मानधन देण्यात येऊन, ११ महिने कालावधीसाठीकरीता अथवा जाहिरातीद्वारे सदरचे पद भरणेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४७ मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. मिलींद एम. नवलाखे, मुंबई यांनी दि. ३१/०७/२०१४ रोजीचे अर्जान्वये श्री साईनाथ रुग्णालयात मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून पुन्हा नेमणूक मिळणेस विनंती केली आहे. डॉ. नवलाखे यांचे दि. ३१/०७/२०१४ रोजीचे अर्जावर मुदतवाढीबाबत टिपणी सादर करावी असा अभिप्राय प्र. वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये नाक, कान, घसा तज्ञाचे एक पद मंजूर असून सदरचे पदावर डॉ. आर.बी. कुलकर्णी कार्यरत आहेत. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात आणखी एका नाक, कान, घसा तज्ञाची आवश्यकता असल्याने डॉ. रंजन अशोक महाजन यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूक करुन प्रत्यक्षात काम श्री साईनाथ रुग्णालयाकडे करत आहे.

डॉ. मिलींद नवलाखे यांना मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयांनुसार श्री साईनाथ रुग्णालयाकडे सन २००९ पासून वेळोवेळी मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून नेमणूका दिलेल्या आहेत. त्याप्रमाणेच मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २७/०४/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७२ नुसार डॉ. मिलींद एम. नवलाखे यांची जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २२२७/२०१३ दि. १४/०८/२०१३ नुसार श्री साईनाथ रुग्णालयात मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून दोन महिन्यातून एक व्हिजीट व प्रति शस्त्रक्रियेकरीता रु. १,५००/- (प्रवास खर्चासहीत) इतके मानधन या अटीवर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि. १४/०८/२०१३ पासून व्हिजीट देण्यास सुरुवात केलेली असल्याने त्यांचा एक वर्ष नेमणूकीचा कालावधी दि. १३/०८/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

डॉ. मिलींद एम. नवलाखे व प्र. वैद्यकिय अधिक्षक यांचे अभिप्रायाप्रमाणे डॉ. नवलाखे, मुंबई यांची पूर्वीच्या अटी-शर्तीनुसार दोन महिन्यातून एक व्हिजीट व रु. १,५००/- प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता मानधन प्रवास खर्चासहीत देऊन मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करता येईल.

डॉ. नवलाखे यांनी एक वर्षाचे नेमणूकीचे कालावधीत दोन व्हिजीट दिलेल्या असून याकामी त्यांना शस्त्रक्रियेकरीता संस्थानमार्फत रु. १५,०००/- प्रवासखर्चासहीत आदा करण्यात आलेले आहे. आता ११ महिन्यांसाठी नेमणूक केल्यास ते सदरचे कालावधीत किमान ६ व्हिजीट देतील व शस्त्रक्रियेकरीता प्रवास खर्चासहीत त्यांना अंदाजे रु. ५०,०००/- आदा करावे लागतील, असे प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचेकडील जा.नं. २१५ दि. २७/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

तरी, प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे मागणीनुसार डॉ. मिलींद एम. नवलाखे, मुंबई यांना पूर्वीच्याच अटी-शर्तीवर मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७९० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय विचारात घेता व रुग्ण सेवेत अडथळा येऊ नये म्हणून तसेच मा.उच्च न्यायालयाचे दि.२५.१०.२०१२ रोजीचे आदेशानुसार नेमणूका करणयास मनाई असल्यामुळे, सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत डॉ. मिलींद एम. नवलाखे, मुंबई यांना कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून दोन महिन्यातून एक व्हिजीट व रु.१,५००/- प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता मानधन प्रवास खर्चासहीत देण्यात येऊन ११ महिने कालावधीसाठी घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४८ तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, सी.एम.ओ./ आर.एम.ओ. यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी साहेब, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/१२/२०१३ रोजी सभा घेण्यात आली होती. त्यात असे ठरले की, डॉ. महाजन व डॉ. म्हात्रे यांचे मानधन वाढीबाबत प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र.३४६ असा झाला की, संस्थान रुग्णालयांमध्ये इतरही तज्ञ वैद्यकिय अधिका-यांची वेतनवाढीची मागणी असल्यास त्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव, डॉ. राम शंकर महाजन-सोनोलॉजीस्ट व डॉ. मयुर विलास म्हात्रे-न्यूरो सर्जन यांचेसह सादर करण्यात यावा.

संस्थान रुग्णालयांत वेतनबॅन्ड नुसार मिळणा-या वेतनापेक्षा मानधन कमी असल्याने वैद्यकिय अधिकारी येण्यास तयार नसतात. परिणामी रुग्ण सेवेत अडथळे येतात. सध्या रुग्णालयांमध्ये तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, सी एम ओ/ आर एम ओ यांना वेतनबॅन्ड नुसार मिळणारे वेतन व फिक्स पे/ मानधन यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहेत.

| तपशील | वेतनबॅन्डनुसार मासिक मिळणारे एकूण वेतन | सध्याचे मानधन रुपये | प्रस्तावीत मानधन रुपये | मानधनात वाढ रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| तज्ञ वैद्यकिय अधिकारी | ५७,०३८/- | ३५,०००/- | ५०,०००/- | १५,०००/- |
| कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी | ४७,२५०/- | ३२,०००/- | ४५,०००/- | १३,०००/- |
| आर एम ओ / सी एम ओ | ४७,२५०/- | २७,०००/- | ४०,०००/- | १३,०००/- |

सहाव्या वेतन आयोगानुसार तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांचेसाठी मंजूर वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ६६००/- व कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी आणि आर एम ओ / सी एम ओ साठी वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ५४००/- आहे.

सध्या रुग्णालयात ०२ तज्ञ वैद्यकिय अधिकारी व ०३ आर एम ओ मानधनावर कार्यरत आहे. स्तंभ क्र. ४ नुसार मानधनात प्रस्तावित वाढ केल्यास संस्थानवर रु. ८,२८,०००/- इतका वार्षिक आर्थिक बोजा पडेल.

तरी वरील स्तंभ क्र. ४ मध्ये प्रस्तावीत केलेप्रमाणे मानधनात वाढ करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७९१ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत शासनाकडून प्राप्त झालेल्या मानधन वाढीच्या निर्णयांसह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४९ आर.एम.ओ. या पदावर ११ महिने कालवधीसाठी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३(४) मध्ये प्रामुख्याने खालील प्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-या व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईलः

तसेच शासन निर्णय क्रमांकः सासंवि– २००९/४३३/(३७/९) का. सोळा. मंत्रालय मुंबई–४०००३२ दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामधील अट शर्त क्र. ०८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद आहे.

डॉ. प्रसंन्नाकुमार कुलकर्णी यांनी व डॉ. अनु राजा यांनी अर्ज सादर करुन संस्थानचे रुग्णालयांमध्ये आर एम ओ या पदावर ११ महिने कालावधीसाठी काम करण्याची संधी मिळावी अशी विनंती केली आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस. आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आर एम ओ या पदाच्या ५६(४०+१६)जागा मंजूर असुन शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस. व वेतनबॅन्ड रु १५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ५४००/- मंजूर आहेत.

आर.एम.ओ या पदाचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील ०८ व श्री साईबाबा हॉस्पीटलकडील १४ असे एकुण २२ स्थायी पदे रिक्त आहेत. श्री साईनाथ रुग्णालयाकडे ०२ व श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ०३ असे एकूण ०५ आर एम ओ ११ महिने कालावधीसाठी कार्यरत आहेत. त्यांना प्रत्येकी मासिक रु. २७,०००/- मानधन देण्यात येत आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी असे एकूण २९ प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागणविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये आर एम ओ या पदाच्या १५ जागांचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार आहे. सध्या रुग्णालयांमध्ये आर एम ओंची संख्या कमी असल्याने रुग्ण सेवेत अडथळे येत असल्याने डॉ. कुलकर्णी व डॉ. अनु राजा यांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देण्यात यावी अशी मागणी प्र.वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी केली आहे.

डॉ. कुलकर्णी व डॉ. अनु राजा यांची आर एम ओ या पदावर ११ महिने कालावधीकरीता प्रत्येकी मासिक रु. २७,०००/- मानधनावर नेमणूक करता येईल व त्यांचे मानधनासाठी मासिक रु. २७,०००/- प्रमाणे ११ महिन्यांसाठी संस्थानवर प्रत्येकी रु. २,९७,०००/- वार्षिक आर्थिक बोजा पडेल. याकामी मा. कायकोर्टाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

तरी, प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्रायाप्रमाणे डॉ. प्रसंन्नाकुमार सुभाष कुलकर्णी व डॉ. अनु राजा यांची आर एम ओ या पदावर नेमणूक करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता व रुग्णालयांसाठी जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्यामुळे रुग्ण सेवेत अडथळा येऊ नये म्हणून तसेच मा.उच्च न्यायालयाचे दि.२५.१०.२०१२ रोजीचे आदेशानुसार नेमणूका करणयास मनाई असल्यामुळे, सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत डॉ.कुलकर्णी व डॉ.अनुराजा यांना कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रत्येकी रु.२७,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर ११ महिने कालावधीकरिता घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **निळवंडे कालव्यांचे कामांसाठी श्री साईबाबा संस्थानकडुन रु.५०० कोटी निधी राज्य शासनास उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ०४ दि. ०४/०६/२०११ अन्वये अध्यादेश क्र. १४ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ यात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार कलम २१ ची खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली. समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल अशी तरतुद आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



"(१ क) पोटकलम (१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पुर्व मंजुरीने, आणी राज्यशासनाकडुन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करणेत येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या आधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

प्रस्तावनाः- मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषी व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित पत्राची प्रत संस्थान कार्यालयास प्राप्त झालेली होती. सदरचे पत्रात निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानने डाव्या कालव्यांच्या कामांसाठी रु. ५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. तसेच मा.नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी मौजे खडकेवाके येथील कार्यक्रमात मा. मुख्यमंत्री महोदयांना सदर विषयाबाबत निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानने डाव्या कालव्यांच्या कामांसाठी रु. ५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेबाबत पुन्हा विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच, निळवंडे कालव्यांचे कामांसाठी श्री साईबाबा संस्थानकडुन रु. ५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेबाबत डॉ.सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांचे जावक क्रं. २१६/२०१४, दि. १९/०८/२०१४ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त पत्रात श्री साईबाबांचे पवित्र समाधी स्थानास सन २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत आहे. शताब्धी वर्षाचे काळात संस्थान मार्फत आयोजित विविध समारंभास वर्षभर लाखो साईभक्तांची गर्दी शिर्डीत राहणार आहे. तसेच आगामी नाशिक सिंहस्थ महाकुंभमेळा कालावधीतही शिर्डीत गर्दी राहणार आहे. याकरीता आगामी उत्सवाचा काळ व शिर्डी शहरासाठी पर्यायी पाण्याचा उद्‌भव निर्माण करणे गरजेचे झालेले आहे.

निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानने डाव्या कालव्याच्या कामासाठी रु. ५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन दिल्यास कालव्यांचे काम जलद गतीने पुर्ण होवून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळून संस्थानला देखील कायमस्वरुपी शाश्वत पाणी पुरवठा उपलब्ध होणार आहे. तरी श्री साईबाबा संस्थानकडुन रु. ५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

सदर विषयाबाबत विषयास अनुसरुन संस्थानचे मा.त्रिसदस्यीय समितीपुढे दि. १७/०७/२०१४ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यामध्ये निर्णय क्रं. ५९० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर साधक-बाधक व प्रदीर्घ चर्चा होणे आवश्यक असल्याने, सदरहू विषय तहकूब करण्यात यावा असे ठरले. "

याबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांना जा.नं./ एसएसएस/ पाणी पुरवठा/२५११/२०१४, दि.२१/०८/२०१४ अन्वये पत्र देवून माहिती कळविण्यात आलेली आहे.

विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्रायः- तरी वरीलप्रमाणे मागणी केलेली रक्कम ही मोठया स्वरुपाची असल्याने ती राज्यशासनास उपलब्ध करुन देणे ठरल्यास, रक्कम देणेपुर्वी मा.महाराष्ट्र शासनाची संस्थान अधिनियमास अनुसरुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे सिव्हिल ॲप्लिकेशन नं.पी.आय.एल. नं.१८/२०११ मधील सिव्हिल ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२ वर मे.कोर्टाने दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील कलम (६) अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी याबाबत योग्य तो आदेश होणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.नामदार राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, कृषी व पणन- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.०८.०४.२०१३ रोजी दिलेल्या पत्रास अनुलक्षून आता चर्चेअंती मात्र असे ठरविण्यात आले की, मंत्री महोदयांनी मागणी केलेला निधी किंवा त्यापैकी निधी शासन दरबारी परवानगीसाठी मागणी करणे उचित होणार असल्याने तसा प्रस्ताव शासनास दाखल करावा व शासन मान्यतेनंतर निधी टप्प्याटप्याने, उसनवारीने, ठराविक मुदतीत देता येऊ शकेल असे मान्य झाल्यास मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी तसा प्रस्ताव दाखल करावा.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **पुर्व लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.२६ जून,२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५५१

प्रस्ताविक:- मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि. २६ जून,२०१४ रोजीच्या सभेत विषय क्र.२५ निर्णय क्र. ५५१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थान कामकाजासाठी पुर्व लेखापरिक्षक नेमणुकीसाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येऊन, वार्षिक मानधनासह अर्जांची मागणी करणेत यावी. असे ठरले.छ सदरचा प्रस्ताव दि. २८जुलै,२०१४ रोजी विभागास प्राप्त झाला. त्यानुसार पुर्वलेखापरिक्षकांची नेमणुक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवुन करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार जाहिरात व फॉर्म संकेतस्थळावर प्रसिध्द करावा. दि. १२/०८/२०१४ रोजीच्या स्थानिक व इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३०.०८.२०१४ अशी ठेवण्यात आली होती. अंतिम मुदतीपर्यंत पुर्व लेखापरिक्षक कामकाजासाठी एकुण ४५ निविदा / दरपत्रके प्राप्त झालेल्या आहेत. तसेच दि. ३०/०८/२०१४ च्या विहित मुदतीनंतर एकुण ०४ संस्थाच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ प्रमाणे -

मागणी :- उपरोक्त प्राप्त ४५ निविदा / दरपत्रके मा. व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून निर्णयास्तव सदरचा विषय मा. त्रिसदस्सीय समितीचे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.७९४** **पुर्व लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्राप्त झालेल्या ४५ निविदा/ दरपत्रके आजचे सभेसमक्ष उघडणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत उघडणेत आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अंतीम निर्णयासाठी पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थानला प्राप्त होणाऱ्या मौल्यवान खड्यांचे (Precious Stones) मुल्यांकनकारांची नेमणूक करणेकामी आलेले दरपत्रके मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे देणगी स्वरुपात येणा-या मौलवान खडयांचे (Precious Stones) व मौल्यवान खडयांचे दागीन्यांची तपासणी करणे कामी नेमणूक करणेत आलेल्या मुल्यांकनकाराची मुदत संपूष्टात आलेने याकामी नव्याने मुल्यांकनकारांची नेमणूक करणे व याबाबत नियमअटी ठरविणे करीता व्यवस्थापन समिती समोर विषय निर्णयार्थ सादर केला असता यावर मा. त्रिसदस्सीय समितीच्या दिनांक २६ जून २०१४ रोजीचे सभेतील **निर्णय क्र.५४९** अन्वये संस्थानला प्राप्त होणारे मौल्यवान खडे व मौल्यवान खडयांचे दागीने यांचे मुल्यांकन आणि त्याअनुषंगाने करावयाचे कामकाजासाठी मुल्यांकनकाराची नेमणूक करणेकामी विहित पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येऊन, आयकर/ अबकारी विभागाकडून मान्यता असलेले किंवा सरकार मान्य प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व्यक्ती/ संस्था यांचेकडून मुल्यांकनाची दरपत्रके मागविण्यात यावी असे ठरले आहे.

त्यानुसार याकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात देण्यात आलेली असून त्यात याकामी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० ऑगष्ट २०१४ पर्यंत ठेवण्यात आलेली होती. याकामी ७ दरपत्रके आलली असून त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सराफाचे नाव व गांव | आवक नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | श्री ज्वेलर्स , संगमनेर | ७८८० / ०५/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०२ | मेघना ज्वेलर्स , नवी मुंबई | ८३२६ / १४/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०३ | साई गोल्ड ॲण्ड स्टुडेड ज्वेलरी, बँगलोर | -------- २१/०८/२०१४ | टपालातून उघडून आलेले आहे. |
| ०४ | डॉ. सी ए रत्नपारखी राहुरी फॅक्टरी | ९०३७ / २३/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०५ | पानजेम इन्टरप्राईजेस , पुणे | ९१६५ / २५/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०६ | रिटाज जेम्स, ताडदेव मुंबई | ९१७० / २६/०८/२०१४ | टपालातून उघडून आलेले आहे. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स मुंबई | ९५१९/ ३०/०८/२०१४ | बंद पाकीट |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त ७ दरपत्रकापैकी अ.नं.३ व ६ चे दरपत्रक वगळता उर्वरीत ५ दरपत्रके मा व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस मान्यता असावी ही विनंती आहे.

**निर्णय क्र.७९५ संस्थानला प्राप्त होणाऱ्या मौल्यवान खड्यांचे (Precious Stones) मुल्यांकनकारांची नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेसमक्ष उघडणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित सातही दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अंतीम निर्णयासाठी पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ सोने-चांदी कस लावून तपासणेकामी सराफ (Gold Valuer) यांची नेमणूक करणेकामी आलेले दरपत्रके मा व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणा-या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी स्वरुपात येणा-या सोने-चांदी वस्तु अलंकाराचा कस लावून तपासणे करणे कामी नेमणूक करणेत आलेल्या सराफांची मुदत संपूष्टात आलेने त्यांना मुदतवाढ देणेबाबत व्यवस्थापन समिती समोर विषय निर्णयार्थ सादर केला असता यावर मा. त्रिसदस्सीय समितीच्या दिनांक २६ जून २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५० अन्वये सोने चांदी कस लावून नेमणूक करणेत आलैल्या प्रस्तावित सराफांची (Gold Valuer) मुदत संपूष्टात येत असल्यामुळे संस्थानचे कामकाजात सातत्य रहाणेच्या दृष्टीने नवीन सराफांची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, सोने चांदी कस लावून तपासणेकामी स्थानिक/ परिसरातील सरकार मान्य सोने चांदी कस लावणेचे प्रमाणपत्रधारकांकडून विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्यांचे मासिक मानधनाचे दर मागवून घेणत यावे असे ठरले आहे.

त्यानुसार याकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात देण्यात आलेली असून त्यात याकामी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० ऑगष्ट २०१४ पर्यंत ठेवण्यात आलेली होती. याकामी ८ दरपत्रके आललेी असून त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सराफाचे नाव व गांव | आवक नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | श्री ज्वेलर्स, संगमनेर | ७८७९ / ०५/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०२ | मे. खरोटे ज्वेलर्स मनमाड | ८२५८ / १२/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०३ | श्री गणेश दत्तात्रय नागरे शिर्डी | ९०३६/ २३/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०४ | लक्ष्मी ज्वेलर्स श्रीरामपूर | ९२६५/ २६/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०५ | श्री योगेश नागरे शिरडी | ९२६६/ २६/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०६ | श्री लक्ष्मी अलंकार शिरडी | ९२६७/ २६/०८/२०१४ | बंद पाकीट |
| ०७ | श्री अविनाश चंद्रकांत बागूल कोपरगांव | ९२६८/ २६/०८/२०१४ | टपालातून विना पाकीट अर्ज आलेला आहे. |
| ०८ | श्री मदनराव बाबुराव ढाळे लोणी बु | ९३८१/ २८/०८/२०१४ | बंद पाकीट |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त ८ दरपत्रकापैकी अ.नं.७ चे दरपत्रक वगळता उर्वरीत ७ दरपत्रके मा व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस मान्यता असावी ही विनंती आहे.

**निर्णय क्र.७९६ सोने-चांदी कस लावून तपासणेकामी सराफ (Gold Valuer) यांची नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेसमोर उघडणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत उघडणेत आलेल्या दरपत्रकांमधील दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अंतीम निर्णयासाठी पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ ऑफिस टेबल, खुर्ची व व्हीजिटर चेअरर्स देणगी म्हणून स्वीकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा कार्यालयात टेबल, खुर्ची व अभ्यागतांसाठी १० नग खुच्यांची आवश्यकताआहे. सदरचे साहित्य काही साईभक्तांनी संस्थानला देणगीदाखल देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

तरी देणगीदाराकडून उपरोक्त साहित्य देणगी स्वीकारण्यास मंजुरी मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत सविनय सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०६ शिर्डी शहरातील एकात्मिक रस्ते विकास योजनेतील संस्थान निधीतून प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसीत करणेकामास शासन मान्यता मिळालेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ०४ दि.०४/०६/२०११ अन्वये अध्यादेश क्र.१४ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मध्ये समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल अशी तरतुद आहे.

पोट कलम (१ क) पोटकलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, आणि राज्यशासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करणेत येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयींसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळाना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

त्यातील पोट कलम (दोन) अन्वये स्थानिक नागरी सेवा व सुविधांमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय** ः

१. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६.
२. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०.

**मा.शासन निर्णय** ः

१. सासंवि२००६/८७६/(१३१)/का.सोळा दि.१९/०९/२००८.
२. सासंवि२००६/८७६/(१३१)/का.सोळा दि.०४/०९/२०१४.

**प्रस्तावना** ः शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते विकसीत करणेचेकामास तत्कालीन मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र. २६३ दि. २४/०४/२००६ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अकरा रस्ते विकसीत करणेकामी प्रस्तावास तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विकास कामांबाबत दि.०२/०७/२००८ रोजीचे बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अकरा रस्ते विकसीत करणेस मान्यता दिलेली असून, दि.१९/०९/२००८ रोजीचे शासन निर्णयान्वये एकुण ६५ कोटी अंदाजित खर्चापैकी रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने या प्रकल्पातील पाच रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत व उर्वरीत सहा रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेस मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली.

भूसंपादन कार्यवाहीसाठी लागलेला कालावधी, बाजारातील वाढते दर, रस्त्यांचे तांत्रिक तरतूदीतील बदल व लांबी-रुंदीतील बदलामुळे खर्चात वाढ होत असल्याने सुधारीत रु. ८८ कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी तत्कालीन विधी व न्याय मंत्री (महाराष्ट्र शासन) मा. राधाकृष्ण विखे पा. यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार या प्रकल्पाचे वाढीव खर्चासह एकुण रु. ८८ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मा. विधी व न्याय मंत्री व मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे ठरले होते. सदर बैठकीत ठरलेप्रमाणे सुधारीत प्रस्ताव (रुपये ८८ कोटी खर्चाचा) इकडील पत्र क्र. ७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये सादर करणेत आलेला असून, याकामी शासनाचे विधी व न्याय विभागाच्या विविध पत्रान्वये मागविण्यात आलेप्रमाणे पुर्तता करण्यात आलेले आहेत.

तसेच याकामी दि.०७/०१/२०१४ रोजी सुधारीत प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत आला आहे. याकामी विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१७/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये भूसंपादन व इतर खर्चाबाबत माहिती मागविणेत आली होती. सदरची माहिती इकडील जा. क्र. १९४६/२०१४ दि.२३/०७/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त प्रस्तावास शासनाचे विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र. सासंवि-२००६/ ८७६/ (१३१)/ का.सोळा दि.०४/०९/२०१४ अन्वये खालीलप्रमाणे शासन मान्यता देणेत आली आहे.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्ते (भूसंपादन व इतर अनुषंगिक खर्चासह) विकसित करण्यासाठी येणा-या रु. ८८ कोटी इतक्या सुधरित खर्चाच्या अंदाजपत्रकास या शासननिर्णयान्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२. त्यासाठी येणारा खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून कामाच्या प्रगतीनुसार संबंधितांना टप्प्याटप्प्याने अदा करून त्याबाबतचा स्वतंत्र लेखा ठेवून त्याचा अहवाल संस्थानच्या त्या वर्षीच्या अहवालाद्वारे सादर करण्यात यावा.

विभागाचा अभिप्राय/ मत ः शासनाचे उपरोक्त निर्णयान्वये सदरहु प्रकल्पासाठी रु.८८ कोटी रकमेस मान्यता देण्यात आली असून या शासन निर्णयान्वये कळविणेत आल्यानुसार यथायोग्य कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे विकसनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद** ः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय** ः

1. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६.
2. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०.
3. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११.
4. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७०६ दि. २४/०९/ २०११.
5. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४.

**मा. शासन निर्णय** ः

मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय

१. सासंवि/२००६/८७६/(१३१)का.सोळा, दि.०४/०९/२०१४

२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

**प्रस्तावना**ः शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पातंर्गत संस्थान निधीतून रस्ते विकसीत करणेकामास तत्कालीन मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र.२६३ दि.२४/०४/२००६ अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अकरा रस्ते विकसीत करणेकामी प्रस्तावास दि. ०४ सप्टेंबर, २०१४ अन्वये रुपये ८८ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली असून, आजअखेर सदरहू प्रकल्पावर रु. ६८.५२ कोटी रक्कम खर्च करणेत आलेली आहे.

शिर्डी नगरपंचायतीने दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील २३ रस्ते विकसीत करणेकामी सादर केलेल्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५३८ अन्वये मान्यता देण्यात आली असून, याकामी खालील प्रमाणे निर्णय पारीत झाला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



"..यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणा-या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि. मी. लांबीचा) व पिंपळवाडी रस्ता ५६५ मी. ऐवजी १ कि. मी. पर्यंत समावेश करुन, प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत आली."

त्यातील भुसंपादनाची आवश्यकता असलेल्या सात रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे कामासाठी मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४ अन्वये रु. ५४.२६ भूसंपादनखर्चासह रु. १११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सुधारीत प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.१८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..भुसंपादनाची आवश्यकता असणारे ७ रस्ते विकसीत करण्याबाबतच्या प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालयाच्या सिव्हील अप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि. १६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी ".

सदर सुधारीत खर्चास मान्यता घेणेकामी संस्थानचे विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दि.२५/०७/२०१४ रोजी अर्ज सादर करण्यात आला आहे. उपरोक्त सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी यांनी पुर्वी कळविलेला खर्च रु.५४.२६ कोटी ऐवजी आता रु.१,५०,१८,८८,७९७/- इतका कळविलेला आहे. याकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०६ अन्वये ठरल्यानुसार भूसंपादनाची आवश्यकता नसलेले व साईभक्त/नागरीकांचे दैनंदिन वापरातील १७ रस्ते प्रथमतः विकसीत करणेस मान्यता मिळणेकामी इकडील जा. नं. ३५५९/२०११ दि. ०७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता. तसेच या रस्त्यांचे विकसनांसाठी सुधारीत अंदाजे रु.४७,०२,४४,९७८/- निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग यांचेकडे इकडील जा. नं.४६२०/२०१४ दि.०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८ अन्वये सुधारीत रु.४७,०२,४४,९७८/- इतक्या खर्चास व केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. त्यामध्ये खालील रस्त्यांचा समावेश आहे.

| अ. नं. | रस्त्याचे नांव | लांबी (मीटर) | रुंदी (मीटर) | कामाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1. | शिर्डी-पिंपळवाडी रस्ता (हॉटेल पुष्पांजली चौक ते पुढे ०१ कि. मी. पर्यंत) | १००० | १५ | कॉंक्रीटीकरण |
| 2. | डॉ. हेडगेवार नगरमधील रस्ता | ६०० | ०५ | कॉंक्रीटीकरण |
| 3. | वितरीका क्र. १२ बंदीस्त करुन त्यावर रस्ता विकसीत करणे. | १८०० | ५.५० | डांबरीकरण |
| | वितरीका क्र.१२ चे बाजूने जॉगींग ट्रॅक करणे. | ३५०० | ०५ | पेव्हिंग ब्लॉक |
| 4. | शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पूर्व बाजू) | १००० | ३.५० | डांबरीकरण |
| 5. | शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पश्चिम बाजू) | १५०० | ३.५० | डांबरीकरण |
| 6. | नांदुर्खी शिव ते साकुरी शिव रस्ता | ९५० | ३.५० | डांबरीकरण |
| 7. | ५००रुम तेसाईश्रध्दा हौसींग सोसायटीकडे जाणारा रस्ता | १२०० | ०९/०६ | डांबरीकरण |
| 8. | पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता | ४१० | ३.०० | डांबरीकरण |
| 9. | सन एन् सॅड ते कंम्पोस्ट डेपो पर्यंत रस्ता | २५०० | ३.५० | डांबरीकरण |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | बिरेगांव नाला रोड (लुटे वस्ती ते गणेश बंधारा पर्यंत) | ३००० | ४.०० | डांबरीकरण |
| 11. | चौफुली रोड ते कंम्पोस्ट डेपो पर्यंत ( सर्व्हे नं. १३६ ते राहाता नगरपरिषद कंम्पोस्ट डेपा पर्यंत) | १५०० | ३.५० | डांबरीकरण |
| 12. | पुनमनगर गल्ली क्र.०१ ते आर. के. कोते यांचे घरापर्यंत. | ३५० | ४.५० | डांबरीकरण |
| 13. | श्रीकृष्ण नगर मधील रस्ते | ७०० | ३.५० | डांबरीकरण |
| 14. | सर्व्हे नं. १३४ सर कॉलनी रस्ते. | २५० | ३.५० | डांबरीकरण |
| 15. | वराह चौक ते सौंदडी देवस्थान पर्यंतचा रस्ता. | ८०० | ५.०० | डांबरीकरण |
| 16. | गेणशवाडी मधील रस्ते. | ८०० | ३.०० | डांबरीकरण |
| 17. | हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा पर्यंतचा रस्ता. | १५०० | ३.०० | डांबरीकरण |
| एकुण लांबी (किलो मिटरमध्ये ) | | २३.३६ | | |

या प्रस्तावाबाबत मा. कार्यसन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०११ /५१४/ प्र. क्र. ७४/का. सोळा, दि. २१/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे शासन निर्णय झाला असल्याचे कळविले आहे.

''श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करण्यासाठी येणा-या रु.४७,०२,४४,९७७/- इतक्या खर्चाचा प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

(i) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील त्रिसदस्यीय समितीची सदर प्रस्तावास सहमती घेण्यात यावी.

(ii) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी सदर प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

(iii) सदर प्रस्तावात प्रस्तावित केलेले व्दितीय प्राधान्य गटातील १७ रस्ते फक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करण्यात यावेत. श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्रपणे स्वतः संस्थानमार्फतनिविदा काढून सदरचे रस्ते विकसित करता येणार नाहीत.

२. सदर रस्ते विकसित करण्यासाठी अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अंदाजित खर्चापेक्षाजास्त खर्च न होण्याची दक्षता कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर कामाबाबत प्रगती अहवाल वेळोवेळी संबंधित अभियंत्यांकडून प्राप्त करुन शासनास सादर करण्यात यावा.

सदर रस्ते विकसित करण्यासाठी लागणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून कामाच्या प्रगतीनुसार संबंधितांना टप्प्या टप्प्याने अदा करुन त्याबाबतचा स्वतंत्र लेखा ठेवून त्याचा अहवाल संस्थानच्या त्या वर्षाच्या वार्षीक अहवालाव्दारे सादर करण्यात यावा. ''

मा. शासनाने उपरोक्त अटीस अधिन राहून सदरहू कामास मान्यता दिलेली आहे. करीता त्यावर खालील प्रमाणे निर्णय होणेस विनंती.

**विभागाचा अभिप्रायः** तरी मा. शासनाचे उपरोक्त आदेशात नमूद केलेनुसार खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१. उपरोक्त शासन आदेशातील अट क्र. (i) नुसार प्रस्तावित कामास मा. त्रीसदस्यीय समितीची सहमती मिळणेस विनंती.

२. सदर आदेशातील अट क्र. (ii) नुसार सदरचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची परवनगी मिळणेसाठी अर्ज सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



३. तसेच सदर आदेशातील अट क्र. (iii) नुसार मा. उच्च न्यायालयाची परवानगी नंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ते विकसीत करणेकामी त्यांना कामाचे प्रगतीनुसार टप्प्या टप्प्याने निधी अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.७९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ साईप्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँट व मेन गेट सिक्युरिटी केबीन येथे नवीन अंडरग्राऊंड टेलीफोन केबल टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधिल तरतूद क्र.२१-१(क) नुसार समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकीकोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल.

(क)मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन

**अ)** संस्थानचे अंतर्गत दुरध्वनी व्यवस्थेकरीता मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे श्री साई प्रसादालययेथे सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली असुन या दुरध्वनी यंत्रणेतुन संस्थानचे प्रसादालय इमारतीतील कार्यालयात व प्रत्येक मजल्यावरील विभागाकरीता तसेच डेटा सेंटर येथील आयटी विभागात तसेच इतर विभागा करीता संपर्कासाठी जवळपास75 दुरध्वनी नंबर देण्यात आलेले आहेत.गॅस प्लँट येथे यापुर्वी 5 पेअरची दुरध्वनी केबल वॉल कंपाऊडचे कडेने क्लीपींग करुन टाकण्यात आलेली होती.परंतु वॉल कंपाऊंडचे बांधकाम कामाचे वेळेस बांधकाम विभागामार्फत सदरची केबल काढुन खाली जमिनीवर उघडयावर टाकुन देण्यात आली होती.सदरचे ठिकाणी केबल पाईपमध्ये जमिनीत अंडरग्राऊड टाकलेली नसल्याने बऱ्याच ठिकाणी घुशीने सदरची केबल कुरतडुन नादुरुस्त केलेली आहे.त्यामुळे गॅस प्लँट कडील दुरध्वनी बंद पडलेला आहे.कामाचे सोईसाठी व गॅसचे अत्यावश्यक कामासाठी तो दुरध्वनी कायम चालु असणे आवश्यक आहे.या करीता प्रसादालयाचे बांधकाम विभाग येथे असलेल्या टेलीफोन डीपी बॉक्स पासून 10 पेअरची जेलिफिल्ड आरमड टेलीफोन केबल अंडरग्राऊंड टाकावी लागणार आहे.

**ब)** तसेच प्रसादालय येथे विद्युत विभागाचे जनरेटर रुम शेजारील कार्यालयात नव्याने सुरु होत असलेल्या फुड लॅबचे काम चालु असुन फुडलॅब करीता 4 ते 5 अंतर्गत दुरध्वनी लागणार आहेत.लॅबचे ठिकाणी यापुर्वी टेलीफोन केबल अंडरग्राऊड टाकलेली नसुन त्या ठिकाणी दुरध्वनी देण्याचे झाल्यास प्रसादालयाचे बॉयलर रुमचे टेलीफोन डीपी बॉक्स पासून रोड क्रॉसींग करुन 10 पेअरची जेलिफिल्ड आरमड टेलीफोन केबल फुडलॅब पर्यंतअंडरग्राऊंड टाकावी लागणार आहे.तसेच प्रसादालय मेन गेट सिक्युरीटी केबिन येथील फोनची जुनी टाकलेली टेलीफोन केबल खराब झालेली असुन तेथेही नविन आरमड जेलीफील्ड केबल अंडरग्राऊंड टाकणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त ठिकाणी अंतर्गत दुरध्वनी देणेसाठी व चालु करणेसाठी खालील प्रमाणे दुरध्वनी साहित्याची आवश्यकता असुन सदरचेकाम हे ठेकेदार यांचेकडुन कोटेशन मागवुन करुन घ्यावे लागणार आहे.त्याकरीता करावे लागणारे टेलीफोन कामाचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Sr. No | CSR. No | Description | Qantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-10-14 | Supplying & erecting Jelly filled armoured telephone cable 10 pair with 0.5 mm dalaid in provided trench as per specification No.WGTW | 600 Mtr. | 123.90 | 74,340.00 |
| 02 | 1-11-12 | Supplying erecting & commissioning Junction Box suitable for 10 pair as | 02 Nos. | 605.85 | 1211.70 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | per specification No.VCGTW | | | |
| 03 | 1-11-31 | Supplying installing testing & commissioning approved type push button telephone instrument desk top/wall mount unit as per specification in approved manner. | 05 Nos. | 700.35 | 3501.75 |
| 04 | 16-1-2 | Making the trench in Hard Murum/Tar road of suitable width and depth as per IS for laying provided telephone cable up to 10 sqmm complete As per specification No.CAEXNOTR | 50 Mtr. | 160.65 | 8,032.50 |
| 05 | 7-6-5 | Supplying & laying (including excavation) 15 cm dia RCC Hume Pipe with coupling collar of standard thickness at required depth up to 90 cm below road/ground surface, for enclosing provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet) | 250Mtr. | 665.70 | 1,66,425.00 |
| 06 | Non CSR | Supplying & erection of bricks chamber (including excavation & internal size 2'X3') with finish plaster and RCC cover. | 12 Nos. | 5000.00 | 60000.00 |
| | | | Total Amount | | 3,13,510.95 |

तरी उपरोक्त अ व ब मध्ये नमुद केले प्रमाणे साई प्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँटव मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊड टेलीफोन केबल टाकणेसाठी व सदरचे काम बाहेरील ठेकेदारांकडुन कोटेशनमागवुन करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये 3,13,511/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीसमोरसादर करणेस मान्यता असावी.मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.८००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँट व मेन गेट सिक्युरिटी केबीन येथे नवीन अंडरग्राऊंड टेलीफोन केबल टाकणेचे काम बाहेरील ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने निविदा मागवन करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,१३,५११/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **देणगी स्वरुपात साबुदाणा (सेलम ब्रॅण्ड) स्वीकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय विभागास साईभक्तांना महाशिवरात्री, आषाढी व कार्तिकी एकादशी तसेच इतर उपावासांचे दिवशी सेवा देणेकामी साबुदाण्याची आवश्यकता असते. श्री साईप्रसादालय विभागाने सन २०१४-१५ करिता वार्षिक मागणीमध्ये अंदाजे ३१० क्विंटल साबुदाणा (सेलम) ची मागणी केलेली आहे. त्यानंतर प्रसादालयाचे आवश्यकतेनुसार साबुदाण्याची मागणी केली जाते.

संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार साबुदाणा हा निविदेद्वारे खरेदी करण्यात येतो. मात्र साईभक्त श्री.एस.गुणाशेखरन्, सेलम यांनी त्यांचे दि.१०.०९.२०१४ रोजीचे पत्राद्वारे मी सेलम साबुदाण्याचा होलसेल व्यापारी असून, श्री साईबाबा मंदिराकरिता प्रत्येक महिन्यासाठी अंदाजे १ टन (१० क्विंटल) साबुदाणा (सेलम ब्रॅण्ड) देणगी स्वरुपात आजीवन (Life Time) पुरविण्यास तयार आहे. तरी मला श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी द्यावी, अशी विनंती केलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदरपत्रामध्ये त्यांनी साबुदाणा शिर्डी पोहोच करणार आहेत अगर कसे? याबाबत उल्लेख केलेला नाही. म्हणून दि.१०.०९.२०१४ रोजी दु.१२.१५ वा. मोबाईल क्रमांक ०९४४३२३२७११ वर माल पोहोच करणेबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदरचा देणगी माल शिर्डी येथील भांडार विभागात पोहोच करण्याचे मान्य केले आहे.

तरी साईभक्त श्री.एस.गुणाशेखरन्, सेलम यांनी त्यांचे दि.१०.०९.२०१४ रोजीचे पत्रामध्ये विनंती केल्याप्रमाणे त्यांचेकडून प्रसादालयाचे आवश्यकतेनुसार देणगी स्वरुपात साबुदाणा (सेलम ब्रॅण्ड) शिर्डी पोहोच स्विकारता येऊ शकतो. सदर माल भांडार विभागात उतरविण्याची वाराई संस्थानमार्फत आदा करता येईल.

तसेच संस्थानची पर्यायी व्यवस्था म्हणून निविदेमध्ये साबुदाण्याबाबत निविदाधारकांकडून दर मागवून, पुरवठाधारक निश्चित करता येईल. जर भविष्यात सदर देणगीदार साईभक्ताकडून काही कारणास्तव वेळेत मालाचा पुरवठा न झाल्यास अशा परिस्थितीमध्ये दर निश्चित केलेल्या पुरवठाधारकांकडून साबुदाणा खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८०१ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० जनसंपर्क विभागास फॅक्स मशिन व चेअर (खुर्च्या) देणगीदाखल घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** १) जनसंपर्क विभागामार्फत श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व निवासाची सुविधा करण्यात येते. श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींमध्ये मा.पंतप्रधान कार्यालय, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मा.आमदार, मा.खासदार, शासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी, सुप्रीमकोर्ट जज्ज, हायकोर्ट जज्ज, मा.अध्यक्ष सो., व्यवस्थापन समिती सदस्य यांचेकडून येणाऱ्या व्यक्तींचे व्यवस्थेबाबत उपरोक्त कार्यालयांकडून दुरध्वनी निरोपाबरोबर बऱ्याच वेळा फॅक्स संदेश प्राप्त होत असतात. याकामी जनसंपर्क विभागात एक स्वतंत्र फॅक्स मशीन कार्यान्वित करण्यात आलेले आहे. जनसंपर्क कार्यालयाचे पासेस वितरण काऊंटरकडे बसविण्यात आलेले फॅक्स मशीन नेहमीच वापरात असल्याने नेहमीच्या वापराने ते खराब झालेले असून नविन फॅक्स मशीन घेणे गरजेचे आहे.

२) श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था तसेच अनिवासी भारतीय/परदेशी नागरीक, मा.आमदार, मा.खासदार, मा.मंत्री महोदय, विविध पक्षाचे राजकीय नेते, देणगीदार साईभक्त, विविध वृत्तपत्र/दुरचित्रवाहीन्यांचे प्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवरांची नेहमीच ये-जा चालू असते. सदर येणाऱ्या व्यक्तीं त्यांचे दर्शन/आरती व्यवस्था व त्यानुषंगाने येणाऱ्या इतर कामाकरीता जनसंपर्क अधिकारी यांचेशी जनसंपर्क कार्यालयात येवून भेटतात. जनसंपर्क अधिकारी यांचे कक्षात येणाऱ्या मान्यवर, देणगीदार व्यक्तींची चेअर ठेवून बसण्याची व्यवस्था केलेली आहे. परंतु नेहमीच्या वापराने सदरच्या चेअर खराब झालेल्या असल्याने जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालयात ठेवणेकामी नविन चेअर घेणे गरजेचे आहे.

जनसंपर्क विभागाच्या उपरोक्त अ.नं.१ व २ अन्वये दिनांक ३०.०८.२०१४ रोजी सादर केलेल्या टिपण्यांवर 'समितीसमोर मान्यतेसाठी ठेवावे' असे निर्देश दिलेले आहे.

तरी जनसंपर्क विभागाचे पाससे वितरण कक्षाकडे ०१ नग फॅक्स मशिन (अंदाजे किंमत रुपये ७,५००/- मात्र) व जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालयाकरीता ०६ नग चेअर (अंदाजे किंमत रुपये १६,०००/- मात्र) देणगीदाखल घेणेस मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, जनसंपर्क विभागासाठी आवश्यक असलेले ०१ नग फॅक्स मशिन व ०६ नग चेअर (खुर्च्या) देणगीदार साईभक्ताकडून देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ मोतीचूर लाडू ऐवजी बुंदी पॅकेट साईभक्तांना देणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** <u>अधिनियम २००४ मधील तरतुद.-</u> सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

<u>प्रस्तावीत–</u> साईभक्तांना श्री साईबाबांचा प्रसाद म्हणून घरी घेऊन जाणेसाठी सन १९९३-१९९४ पासून मोतीचूर लाड्डू तयार करुन विक्री करण्यात येत आहे. मोतीचूर लाड्डूची सुरुवात होतांना गर्दी कमी असल्यामुळे दैनंदिन ५०० किलो साखर ३०० किलो बेसन व सुमारे ३२५ किलो तुपाचे सुमारे २२५०० लाड्डू तयार करुन विक्री करण्यात येत होती. १५ ऑगस्ट २०१३ पासून मोफत लाड्डू प्रसाद साईभक्तांना वाटप करण्यात येते.

सन २००९– १४ या कालावधीत साईभक्तांना तयार करण्यात आलेल्या मागील पाच वर्षाची लाड्डूची संख्या खालिलप्रमाणे-

| सन | तयार लाड्डू नग |
|---|---|
| २००९-२०१० | ४,११,१३,९०२ |
| २०१०-२०११ | ३,८२,५५,४९३ |
| २०११-२०१२ | ८,००,११,३४० |
| २०१२-२०१३ | ५,६९,६०,२६७ |
| २०१३-२०१४ | ५,६०,७१,२७७ |

तसेच सदरील लाड्डूप्रसाद कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना वाटप व विक्री करण्यात येते. दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होत चाललेली आहें. गर्दीचे प्रमाणात मोतीचूर लाड्डू तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. मात्र लाड्डू तयार करण्याची प्रक्रीया सुमारे ०६/०८ तासाची असते. लाड्डूसाठी बुंदी तळण्यापासून सुमारे ०६/०८ तासानंतर लाड्डू विक्रीसाठी दिले जातात. त्या बाबद साधारपणे खालिलप्रमाणे पध्दत वापरण्यात येते.

१) बुंदी तळणे, साखरेचा पाक तयार करणे.

२) साखरेच्या पाकात सुमारे ०२ तास बुंदी भिजविणे.

३) बुंदीपाकात भिजल्यानंतर लाड्डू वळणे.

४) लाड्डू वळल्यानंतर सुमारे ०३ तास लाड्डू सुकविणे.

५) लाड्डू सुकल्यानंतर पेपर पिशवीत पॅकिंग करणे.

६) लाड्डू पॅकेटस तयार झाल्यानंतर त्याची गणती करुन मंदिर मोफत वाटप व काऊंटरवर विक्रीसाठी पाठविले जातात.

उपरोक्त कामी साधारणपणे ०६/०८ तासाचा अवधी लागतो. साईभक्तांची गर्दी कधी व किती संख्येने वाढेल अथवा कमी होईल याचे प्रमाण निश्चित नसते त्यामुळे किती संख्येने लाड्डू तयार करावे हे अ. निश्चित असते. लाड्डू हा पदार्थ टिकाऊ नसतो त्यामुळे लाड्डू जादा तयार करुन साठा केला व गर्दी कमी झाली तर लाड्डू खराब होण्याची शक्यता असते. जर लाड्डू कमी प्रमाणात केले व गर्दीमध्ये वाढ झाली तर विक्रीसाठी व मंदिर मोफत वाटप करण्यासाठी लाड्डू कमी पडतात.

लाड्डू तयार करण्याचे काम पुर्णता- मनुष्य बळाकरवी चालत असल्यामुळे लाड्डू तयार करण्याची प्रक्रिया ही मनुष्य बळावर अवलंबुन आहे. बुंदी तळणे व लाड्डू वळणे या कामी बाजारात अघाप मशिनरीज उपलब्ध नाही. त्यामुळे सदर कामासाठी पुर्णता मनुष्य बळावर अवलंबुन रहावे लागते. विषेशता लाड्डु वळणे हे काम अतिशय त्रासाचे झालेले आहे. त्यामुळे ज्यांना लाड्डु वळण्याचे काम वेगाने येते कामगार वेळोवेळी काही कारणांस्तव अडवणूक करतात. कामाचे स्पीड

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कमी करतात. उपस्थिती कमी ठेवतात. त्यामुळे लाडू वळविण्याचे कामी अडचण निर्माण होत आहे. बुंदीतळणे, लाडूवळणे व सुकविणेसाठी सुमारे ०६/०८ तासाचा कालावधी लागतो त्यामुळे तयार झालेले लाडू त्वरीत विक्रीसाठी व मंदिर मोफत साठी उपलब्ध करुन देता येत नाही. लाडू पाकिटांची वाढती मागणी व ते बनविणे करिता लागणारा वेळ याचा ताळमेळ बसत नसल्यामुळे भक्तांना गर्दीचे प्रमाणात लाडूचे पाकिटे उपलब्ध होणे दुरापास होत चालेले आहे.

**<u>विभागाची मागणी</u>**- वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करुन साईभकतांना लाडू ऐवजी सुटटी बुंदीचे पाकिट तयार करुन प्रसाद म्हणून विक्रीसाठी व मंदिर मोफत वाटप करिता उपलब्ध करुन दिल्यास सोईस्कर होईल. त्यामुळे बुंदी भिजविणे, लाडू वळणे व सुकविणेकामी लागणारा वेळ वाचेल, व भक्तांचे गर्दीचे प्रमाणात पाहीजे तेवढे बुंदीचे पाकिटे तयार करण्यास अडचण येणार नाही. तसेच सुटटी बुंदी सुमारे १५/ २० दिवस खराब होत नसल्यामुळे लाडू प्रमाणे बुंदी खराब होण्याची भिती राहाणार नाही.

उपरोक्त प्रमाणे मोफत वाटप व विक्रीसाठी लाडू पॅकेट ऐवजी बुंदी पॅकेट सुरु केल्यास साईभक्तांना सेवा पुरवितांना खालिलप्रमाणे फायदे होतील.

१) बुंदी तयार करणेचे प्रक्रियेस वेळ कमी लागणार असल्यामुळे साईभक्तांना गरजेप्रमाणे पाहीजे तेवढे पाकिटे पुरविणे शक्य होईल .

२) अचानक गर्दी कमी झाल्यास तयार करुन ठेवलेले लाडू खराब होण्याची दाट शक्यता असते.बुंदी पॅकेटमुळे खराब होण्याचा धोका होणार नाही.

3) लाडू वळण्याचे काम काही प्रमाणात स्किल्ड वर्क असल्यामुळे ज्यांना ते काम येते त्यांच्या अडवणूकीच्या भुमिकेमुळे ठेकेदार, प्रशासन व भक्त यांना वेठीस धरण्याचा प्रकार टाळता येईल. (ब-याच वेळा तळलेली बुंदी उपलब्ध असते मात्र लाडू वळणारे कामगार मिळत नाही.)

विभागाचा अभिप्राय- तरी मोतीचूर बुंदींचे पाकिटांची उपरोक्त प्रमाणे विक्री करणे व मोफत वाटप करणे भक्तांच्या दष्टीने व संस्थानच्या दष्टीने सोईस्कर होईल यासाठी विक्री वाटप करणेसाठी १५० ग्रॅम व मंदिर मोफत वाटपसाठी १०० ग्रॅम वजनाची बुंदीची पाकिटे भक्तांना प्रसाद म्हणून देणेबाबद मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास प्रशासकिय मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन रांगेमध्ये भक्तांना १०० ग्रॅम वजनाचे दोन लाडूंचे पाकिट ऐवजी त्याच वजनाच्या सुटी (लुज) बुंदिचे पाकिट प्रसाद रुपाने देणेस मान्यता देण्यात आली. मात्र प्रसाद लाडू विक्री काऊंटरवर पुर्वीप्रमाणेच १५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडूंचे पाकिट विक्रीसाठी ठेवणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **Nephroscope 6० दुरुस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयाकरीता सन २००९ यावर्षी मे.कार्ल स्टोअर्स एन्डोस्कॉपी इंडिया प्रा.लि.,नवी दिल्ली या कंपनीचा Nephroscope ६° एकुण रु. ९२,९३४/- इतक्या रकमेत मे. साईनिर्माण ग्रुप, शिर्डी यांचेकडुन देणगी स्वरुपात प्राप्त झालेला आहे. सदर इन्स्ट्रुमेंटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टची आवश्यकता असेल व त्यामुळे इन्स्ट्रुमेंट येथे दुरुस्त होउ शकत नसेल तर पुरवठाधारक कंपनीकडुन दुरुस्त करुन घेतले जाते.

सध्या उपरोक्त Nephroscope ६° खराब झाल्यामुळे दुरुस्त करुन मिळणेकामी जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे दि. ०६/०५/२०१४ चे पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार सदर Nephroscope ची तपासणी करुन सदरचे इन्स्ट्रुमेंट येथे दुरुस्त होणे शक्य नसल्यामुळे पुढील दुरुस्तीकरीता इकडिल पत्र क्र. ११९९, दि. ०९/०५/२०१४ अन्वये मे.कार्ल स्टोअर्स एन्डोस्कॉपी इंडिया प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेकडे पाठविणेत आले होते. कंपनीने सदर इन्स्ट्रुमेंटची तपासणी करुन त्यांचे पत्र क्र. २००००७४७, दि. १९/०५/२०१४ अन्वये सदर Nephroscope दुरुस्त होउ शकत नसल्याचे कळविले आहे. तसेच नादुरुस्त Nephroscope कंपनीकडे ठेउन कंपनीकडील Working Nephroscope देणेकामी (Buyback /

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



Exchange) येणाऱ्या खर्चाचे सर्व करांसहीत एकुण रु. ९४,५००/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर Working Nephroscope करीता कंपनी कोणतीही वॉरंटी देत नाही.

मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांनी नादुरुस्त Nephroscope चे Buyback/ Exchange करणेकामी दिलेले एकुण रु. ९४,५००/- चे कोटेशन हे नादुरुस्त Nephroscope च्या सध्याच्या घसारा वजा जाता येणाऱ्या किंमतीपेक्षा तसेच मुळ खरेदी किंमतीपेक्षाही जास्त असुन Working Nephroscope करीता कंपनी कोणतीही वॉरंटी देत नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता Nephroscope ६° दुरुस्तीकामी अशा प्रकारच्या दुरुस्तीची कामे करणाऱ्या विविध कंपन्याकडुन कोटेशन्स मागणी करुन निम्नतम दराने Nephroscope ची दुरुस्ती करणे अधिक संयुक्तीक ठरेल असे मत आहे.

तरी Nephroscope ६° दुरुस्तीकामी विविध कंपन्यांकडुन दर मागविणेस तसेच सदरकामी येणाऱ्या अंदाजे रु. ९४,५००/- चे खर्चास मान्यता घेणेस्तव प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे ठेवणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालयातील Nephroscope ६° दुरुस्तीकामी विविध नामांकित कंपन्यांकडुन दर मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९४,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ डॉ.समाधान सुरेश पवार यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ज्यु.रेडिओलॉजीस्ट या पदावर ११ महिने कालावधीसाठी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्रमांकः सासंवि-२००९/४३३/(३७/९) का. सोळा. मंत्रालय मुंबई-४०० ०३२ दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामधील अट शर्त क्र. ०८ समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद आहे.

डॉ. समाधान सुरेश पवार यांनी संस्थानचे रुग्णालयामध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्ट या पदावर नोकरी मिळणेकामी दि. ०५/०९/२०१४ रोजी बायोडाटा सादर केला आहे. त्यांचे शिक्षण एम.बी.बी.एस, एम.डी. रेडिओ-डायग्नोसिस असे झालेले आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्टची दोन पदे मंजूर असून शैक्षणिक व इतर पात्रता १) Age not more than ४५ years; २) Degree of MD/ Diploma in Radiology from any Government recognized University; ३) Experience minimum २ years in similar capacity अशी असून वेतन तनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ५४००/- मंजूर आहेत.

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील सदरची दोन्ही पदे रिक्त आहेत. संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण २९ प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्टचे एका पदाचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार आहे.

सध्या सदरचे पदावर वैद्यकिय अधिकारी कार्यरत नसल्याने रुग्णांना सोनोग्राफीसाठी बाहेर जावे लागते. त्यामुळे रुग्णांवर वेळेत उपचार होत नाही. याकरीता डॉ. पवार यांना ज्यू. रेडिओलॉजीस्ट या पदावर ११ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावे असे प्र.वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी अभिप्राय दिला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०० नुसार रुग्णालयांत ज्यू. कन्सलटंट या पदावर नेमणूकीस असलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना मासिक रु. ३२,०००/- वेतन देण्यात येत आहे. त्यानुसार डॉ. समाधान सुरेश पवार यांची ज्यू. रेडिओलॉजीस्ट या पदावर ११ महिने कालावधीकरीता अथवा जाहिरातीव्दारे सदरचे पद भरणेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मासिक रु.३२,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करता येईल व त्यांचे मानधनासाठी संस्थानवर वार्षिक रु.३,५२,०००/- इतका आर्थिक बोजा पडेल. याकामी मा.हायकोर्टाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. कारण त्यांना कंत्राटी पध्दतीने घ्यावयाचे आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.८०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता व रुग्णालयांसाठी जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्यामुळे रुग्ण सेवेत अडथळा येऊ नये यासाठी तसेच मा.उच्च न्यायालयाचे दि.२५.१०.२०१२ रोजीचे आदेशानुसार नेमणूका करणयास मनाई असल्यामुळे, सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत डॉ.समाधान सुरेश पवार यांना कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून मासिक रु.३२,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीसाठी अथवा जाहिरातीद्वारे सदरचे पद भरणेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४** **अल्ट्राबुक घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस सीसीटीव्ही कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. यासाठी संस्थानने ४.५ कोटी खर्च करुन अद्यावत सुरक्षा यंत्रणा विकसीत केलेली आहे. तसेच द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम-१ व मंदिर परिसरासाठी नुकतीच निवीदा प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. याबाबत निर्णय झाल्यानंतर विविध ठिकाणी कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. कॅमेरेचे Installation, दुरुस्ती व देखभालीबाबत, दररोज Video adjustment, Camera tunning, server/NVR Tunning इ. सदर कामासाठी अल्ट्राबुकची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत इकडील विभागाकडे अल्ट्राबुक नसल्याने असंख्य अडचणी येत आहे.

त्यानुसार बाजारामध्ये माहिती घेतली असता, खालील specification चे अल्ट्राबुक उपयुक्त ठरेल–

| Ultrabook Specification | Brand | Qty |
|---|---|---|
| Processor – Intel core™ i3 OR Higher<br>Windows system – Windows 8 Pro<br>Display –14 HD (1366X768)<br>Graphics – Up to NVIDIA GeForce GT 740M 2GB graphics or equivalent<br>Memory – 4 GB RAM<br>Hard Disk Drive – 1TB HD<br>Battery – 6-9 Hours<br>Integrated Communications – 802.11 b/g/n, Bluetooth 4.01<br>Weight - Less than 2kg<br>Connectors - USB 3.0 x 1, USB 2.0 x 2, 2 x 1 (SD/MMC) Card reader, HDMI, RJ45<br>Warranty – 3 Years onsite Warranty with one year accidental Damage protection | Lenovo, HP, DELL, IBM | 01 |

उपरोक्तप्रमाणे अल्ट्राबुक विहीत पद्ध्तीने खरेदी विभगामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.५८,०००/- + Tax मात्रचे खर्चास मान्यता असावी असे नम्र मत आहे.

उपरोक्त विवेंचनानुसार, Lenovo कंपनीचे अल्ट्राबुक खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या खर्चाचे मान्यतेसाठी सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.८०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकरिता आवश्यक असलेले ०१ नग अल्ट्राबुक विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.५८,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

## दि.११/९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार मंजूर रिक्त स्थायी पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार स्थायी मंजूर विविध पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी तत्वतः मान्यता मिळणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेत सादर करण्यात आलेला होता. सदरचे विषयावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध हुद्देवरील रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास तत्वता मान्यता देण्यात आली. विविध रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना, पदोन्नती द्यावयाचे पद व त्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेला संवर्ग, पदोन्नती पदाची शैक्षणिक पात्रता पदोन्नती द्यावयाच्या कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल व पदोन्नतीच्या पदावर काम करण्याची त्यांची कुवत इत्यादी बाबी विचारात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येतात. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थानमध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून, संस्थानचे सर्व विभागांचे संगणीकरण करण्यात येत आहे या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असुन प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पदोन्नती द्यावयाचे पदावर, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधित पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात यावी व परिक्षामध्ये मिळणाऱ्या गुणानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात यावी. या परिक्षेत पदोन्नतीस अपात्र ठरणाऱ्या अथवा गुणवत्ता प्राप्त न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना संधी देण्याचे दृष्टीने त्यांना सहा महिन्याची मुदत देऊन त्यांची पुन्हा समिती समोर फेर परिक्षा घेण्यात यावी.

या परिक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नाशिक यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात येत असून या समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करण्यात येऊन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी.

कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदांवर पदोन्नती द्यावयाची कार्यवाही ही विभागांतर्गत परिक्षा घेऊन करावयाची असल्याने जात-प्रवर्ग आरक्षणाबाबत विचार करण्यात येऊ नये अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तद्नंतर सदर समितीचे समोर विहीत पात्रता धारण केलेल्या वर्ग-४ पदावरील कर्मचाऱ्यांच्या दि.१४/११/२०१० रोजी १५३ कर्मचाऱ्यांच्या व दि.२६/०२/२०१२ रोजी १२५ कर्मचाऱ्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेऊन सदरचे सिलबंध लखोटे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडून परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त लिपीक-टंकलेखक, कुपन विक्रेता, तारतंत्री, वेल्डर, फिल्टर ऑपरेटर, प्लंबर, सुतार, कातारी, वाहन चालक इत्यादी पदांवर पदस्थापना देण्यात आलेल्या आहेत. आता, स्थायी पदावरील कर्मचाऱ्यांनी आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नती मिळणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत. काही कर्मचारी पदोन्नती मिळणेबाबत समक्ष विनंती करीत आहेत.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ चे निर्णयानुसार अधिक्षक, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ पर्यवेक्षक, मुकादम, शिफ्ट सुपरवायझर, पुजारी, वरिष्ठ लेखापाल, लेखाधिकारी, प्रशितन व वातानुकूल पर्यवेक्षक, वर्कशॉप फोरमन, विद्युत पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता (विद्युत), कनिष्ठ अभियंता (विद्युत) तसेच इतर तांत्रिक रिक्त पदांवर पदोन्नतीने कार्यवाही करणे बाकी आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदरच्या रिक्त पदांवर कार्यवाही करणेकामी प्रस्ताव मा.त्रीसदस्य समिती दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेपुढे सादर केला असता, मा.त्रिसदस्य समितीने अधिक्षक व इतर पदांवर पदोन्नती देणेबाबत यापूर्वी झालेल्या व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ (०३) अन्वये करण्यात यावी, असा निर्णय घेतलेला आहे.

**ब) उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे शासन निर्णयात खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद केलेल्या आहेत.**

**अट-शर्त क्र.(१)** समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासनाची मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

**अट-शर्त क्र.(२)** सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवा प्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

**अट-शर्त क्र.(३)** सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

**अट-शर्त क्र.(१०)** तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

मे.उच्च यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ IN PIL NO.१८/२०११ मध्ये दि.१६ ऑक्टोबर २०१२ च्या आदेशात पॅरा (६) (d) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

(d) Shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies.

उपरोक्तप्रमाणे संदर्भ क्र.०२ व ०३ मधील मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास खालीलप्रमाणे बदल करावे लागतील.

विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे कलम ५ मधील पोट-कलम (१), (२) तरतुदीस अनुसरून दि.२७ मार्च २०१२ रोजीचे अधिसूचने अन्वये १५ सदस्सीय व्यवस्थापन समितीचे गठन करणेत आले होते. तथापि, मा.मुंबई उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सदरचे अधिसूचनेस तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

त्यानंतर मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार दि.३०/०३/२०१२ पासून श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे कामकाज पहाणेसाठी त्रिसदस्य समितीचे गठन करणेत आलेले आहे.

(१) त्यामुळे यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/११/२०११ निर्णय क्र.७६५ (३) अन्वये पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधीत पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी घ्यावयाचे प्रात्यक्षिक, संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेणेकामी व सदर परीक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांची नियुक्ती करणेत आली होती. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देणेकामी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची सिमती गठीत करण्यात आली होती व समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करणेत येवून कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी असे म्हटले होते. तथापि, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मा.त्रिसदस्य समितीचे गठन दि.३०/०३/२०१२ पासून करणेत आलेले असल्यामुळे उपरोक्त पाच सदस्यांची समिती आपोआप बरखास्त झालेली आहे. त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संबंधीत कर्मचाऱ्यांची प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा घेणे अडचणीचे झाले आहे.

(२) म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ (३) व मा.त्रिसदस्य समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३३ नुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा घेणेसाठी कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी यांची समिती गठीत करावी लागेल. तसेच सदर परिक्षेचे आयोजन करण्यासाठी मा.श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांची सल्लागार म्हणून पुन्हा नियुक्ती करुन त्यांचे मानधन ठरवावे लागेल. व त्यानंतर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे आयोजन करावे लागेल.

(३) मंजुर आकृतीबंधानुसार शासनाकडे मान्यता मिळणेकामी प्रस्तावीत केलेल्या भरती नियमात सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रमाण ५०:५० दर्शविले आहे. तसेच नव्याने पदोन्नती अथवा सरळ सेवा भरती करावयाची झाल्यास जात-प्रवर्ग आरक्षण विचारात घेऊन कार्यवाही करावी लागेल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील डॉक्टर्स व पॅरामेडीकल स्टाफ तसेच शैक्षणिक संकुलाकडील शिक्षकीय पदे वगळता मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त पदांचा माहिती दर्शविणारा तक्ता सोबत **परिशिष्ट 'अ'** अवलोकनार्थ सादर केलेला आहे. सदरची पदे ही मंजुर आकृतीबंधातील अटी-शर्ती व ज्या त्या विभागाचे कामाची गरज विचारात घेऊन सरळसेवा व पदोन्नतीने भरणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८०७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयामधील पी.आय.एल.१८/ २०११, सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२०५६/ २०१२ वरील दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील 6 (d) या आदेशानुसार भरती करण्याच्या संदर्भात स्टेपस् घेऊ नयेत. नियमित रिक्त पदावर पदोन्नती देण्याच्या नियमांचे अधीन राहून त्याचबरोबर शासनाकडून सेवा नियमास येणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून विचार केल्यास असे दिसते की, पदोन्नतीने मंजूर रिक्त स्थायी पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना नेमणूका देणे, हे त्या दिशेने घेतलेली स्टेप झाली असे आढळल्यास, मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन व्यवस्थीत होणार नसल्याकारणाने दि.१६.१०.२०१२ चे आदेशामध्ये अशा प्रकारच्या पदोन्नतीने मंजुर स्थायी पदांवर पदोन्नतीने नेमणुका करण्याकरिता सदरील आदेशामध्ये योग्य ती सुधारणा करुन तशी परवानगी मिळण्याकरिता सिव्हील ॲप्लिकेशन करावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८०८** **(१)** संस्थानकडून विविध खरेदी केली जाते किंवा काही कामे कंत्राटी पध्दतीने करुन घेतली जातात. याकामी काही रकमेच्या मर्यादेपर्यंत कोटेशन्स मागविले जातात तर काही निविदा मागविल्या जातात. कोटेशन पत्रामध्ये व संस्थानच्या निविदा फॉर्ममध्ये पुढील अट नेहमीकरता समाविष्ट करावी. "कोटेशन/निविदेमध्ये नमूद केलेल्या अंतिम दराशिवाय कोटेशनधारकास/ निविदाधारकास श्री साईबाबांची सेवा म्हणून काही सवलत/ सूट देण्याची इच्छा असल्यास त्याने या रकमेपेक्षा किती टक्के सूट देऊ ते कोटेशन पत्रामध्ये /निविदा फॉर्ममध्ये स्पष्ट नमूद करावे. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**(२)** विधी विभागाने मा.व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्यांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे मा.उच्च न्यायालयाकडे सादर केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन्सचा पाठपुरावा करुन त्यावर मान्यता वेळेत घेणेबाबत सतर्क राहावे. महत्वाच्या सिव्हील ॲप्लीकेशन्सचा मसूदा मा.खंडपीठासमोर सादर करण्यापुर्वी मा.अध्यक्ष महोदय यांचे अवलोकनार्थ सादर करण्याची पध्दत ठेवावी.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र. ७४३ ते ८०८ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी